# काळे ढग - पांढरे ढग

## संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक

लेखक: श्रीनिवास शारंगपाणी



# काळे ढग-पांढरे ढग

## (संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक)

श्रीनिवास शारंगपाणी

ई साहित्य प्रतिष्ठान

# काळे ढग-पांढरे ढग

लेखक:- **श्रीनिवास शारंगपाणी.**

७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
बँक ऑफ इंडियासमोर,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com

मुखपृष्ठ – श्रीनिवास शारंगपाणी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १ एप्रिल २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्रीनिवास शारंगपाणी—साहित्यिक परिचय



| | |
|---|---|
| जन्म | ३० ऑक्टोबर १९४९ रत्नागिरी येथे |
| शिक्षण | इंजिनियरिंग पदवी |
| नोकरी | १९७३-२००९ वाहननिर्माण कंपन्यांमध्ये उत्पादन विकास क्षेत्रात. त्यानंतर तांत्रिक सल्लागार |
| लेखनप्रारंभ | १९६६ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान सुरुवात कविता आणि लेखांपासून. |
| प्रारंभीचे लेखन | स्वराज्य साप्ताहिकामध्ये कविता, वाङ्मयशोभा मासिकात लेख तसेच नवल मासिकामधून शास्त्रीय नवलकथा आणि गूढकथा. |
| नियमित लेखन | • मराठी/इंग्रजीतून विज्ञान/ विनोदी/ गूढकथा, कविता, गीते, कादंबऱ्या, नाटके इ. चे लेखन.<br>• रविवार दै. प्रभातच्या “रूपगंध” पुरवणीत मार्च २०१९पासून नियमित स्तंभलेखन |

**प्रसिद्ध साहित्य**

- सकाळ, साप्ताहिक सकाळ, केसरी, अमृत, मोहिनी आणि नवल यांसारख्या दर्जेदार अंकांतून लेख, कविता, कथा.
- मराठी कादंबरी—राजकीय रोमांचिका "षडयंत्र" १९९२मध्ये प्रसिद्ध. २०१९मध्ये पुनर्प्रकाशित
- चित्रपटसृष्टीवरील मराठी कादंबरी--"इये स्वप्नांचिये नगरी" २००९मध्ये प्रसिद्ध. २०१८मध्ये पुनर्प्रकाशित
- "Manipulations" ही "षडयंत्र"ची स्वत:च अनुवाद केलेली इंग्रजी कादंबरी अमेरिका / कॅनडा येथे २००२ मध्ये प्रसिद्ध
- "Brahma's Breath" ही इंग्रजी विश्व-उत्पत्तीविषयीची विज्ञानकाल्पनिका आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्था Smashwords यांनी २०११ मध्ये प्रसिद्ध केली
- "Our Distant Cousins" ही मंगळमोहिमेवरची भविष्यवेधी विज्ञान काल्पनिका जर्मन प्रकाशनसंस्थेने २०१३ मध्ये प्रकाशित केली.
- "Death of A Mad Mathematician" हे इंग्रजी नाटक विख्यात गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व अकाली मृत्यूवर लिहिले असून त्याचे स्वतंत्र थिएटर्स यांनी हिंदीमध्ये रूपांतरण करून ते २०१७मध्ये रंगमंचावर आणले. आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर आकाशवाणीवर् ८ भागात प्रसारित.
- "प्रीतिसंभव" हे मराठी संगीत नाटक लिहिले असून ते एका आयटी कंपनीतील हौशी कलाकार रंगमंचावर आणणार आहेत. करोनामुळे स्थगिती. त्यातील २७ नाट्यपदे मी लिहिली आहेत.
- काही मराठी नाटके व एक एकांकिका यांचे लेखन.
- शून्याचा शोध लावणाऱ्या ब्रह्मगुप्ताच्या जीवनावर इंग्रजी नाटक

"Value of Nothing" याचे लेखन चालू.

- "विज्ञान-गूढकथा" हा विज्ञान आणि गूढकथांचा संग्रह २०११मध्ये प्रकाशित.
- "पॉलिकिलर्स व इतर विज्ञानकथा" हा विज्ञानकथा २०१९ मध्ये विश्वकर्मातर्फे प्रकाशित.
- मराठी कथासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर
- इंग्रजी कादंबरी 'Shining Darkness' लवकरच प्रकाशित होत आहे.
- शालेय कुमारांसाठी आश्लेषा महाजन यांनी लिहिलेल्या ७० मराठी कवितांचे इंग्रजी गेय कवितांमध्ये मी रूपांतर केले असून ते "School दुनिया" या रूपात २०१३मध्ये प्रसिद्ध.
- मी लिहिलेल्या ९ गीतांचा "ओठात धुंद मदिरा" हा आल्बम उपलब्ध आहे. याचा गीतकार मी असून संगीतकार शरद करमरकर आहेत आणि गीते रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर आणि स्वत: शरद करमरकर यांनी गायलेली आहेत. त्यातील ५ गीते आकाशवाणीने स्वीकारली असून ती वरचेवर प्रक्षेपित केली जातील.
- पटकथा लिहिण्याचा अनुभव

**विशेष गौरव**

- षडयंत्र या कादंबरीचा साप्ताहिक सकाळच्या १९९२मध्ये प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट पुस्तकांच्या यादीत समावेश
- याच कादंबरीचा सातारा साहित्य-संमेलनात उत्कृष्ट पुस्तक असा नामोल्लेख
- "Brahma's Breath" साठी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप यांची प्रशस्ती.
- "Our Distant Cousins" या कादंबरीचे "अतिदूरचे बांधव" हे आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर ISROचे माजी संचालक सुरेश नाईक आणि विख्यात खगोलज्ञ अरविंद परांजप्ये यांनी गौरविलेले आहे.
- "विळखा" या कथेला पुणे पोस्ट पाक्षिकाने आयोजिलेल्या कथा स्पर्धेमध्ये पारितोषिक.
- Death of A Mad Mathematician या नाटकाच्या हिंदी रूपांतराच्या सादरीकरणाचा वृत्तपत्रांनी गौरव केला आहे.

**इतर उपक्रम**

सामान्यांसाठी उपयुक्त संशोधन आणि नवनिर्मिती, शास्त्रीय विषयांवर देश-विदेशातून व्याख्याने व सादरीकरणे. आकाशवाणीवर व इतरत्र अनेक भाषणे व कथाकथन. ४०हून अधिक देशांमध्ये प्रवास आणि अनेक देशात तज्ञ सल्लागार या नात्याने काम. शास्त्रीय संशोधनाबद्दल एक पेटंट प्राप्त व काही विचाराधीन.

## अर्पणपत्रिका

काळे ढग-पांढरे ढग हे सामाजिक
नाटक मी ‘मृच्छकटिक’ हे जगातील
पहिले सामाजिक नाटक लिहिणाऱ्या
‘शूद्रक’ या महान् नाटककाराला
समर्पित करीत आहे.

# मनोगत



माझ्या व्यावसायिक आयुष्यामध्ये माझ्या संपर्कात काही महत्त्वाकांक्षी आणि काही तत्त्वनिष्ठ माणसं पाहिली. मात्र कोणत्याही थराला जाऊ शकणाऱ्या अतिमहत्त्वाकांक्षी व्यक्तीचा तत्त्वनिष्ठ माणसाशी जेव्हा संघर्ष होतो तेव्हा त्याचा परिणाम वेदनादायक होतो. आपल्या करियरच्या चढत्या कमानीवर असताना माणसानं कुठे थांबायचं याचा सदसद्विवेकबुद्धीनं विचार केला नाही तर पश्चात्तापाची वेळ येते आणि कधी कधी मार्ग बदलण्याच्या किंवा परत फिरण्याच्या वाटाही बंद होतात. जीवनात तडजोड ही आवश्यक आहेच परंतु तडजोडीचा लेखाजोखा मांडल्याशिवाय निर्णयाप्रत जाणं हे धोक्याचं ठरू शकतं.

अशाच दोन व्यक्तींच्या संघर्षाचं हे नाट्य आहे.

*श्रीनिवास शारंगपाणी*

पुणे—मार्च २०२३

# प्रस्तावना

जेव्हा श्रीनिवास शारंगपाणी यांच्याशी फोन झाला आणि त्यांनी त्यांच्या "काळे ढग पांढरे ढग"च्या प्रकाशनाबाबतची बातमी दिली तेव्हा खूप आनंद झाला मात्र दुसऱ्याच क्षणी त्या नाटकासाठी प्रस्तावना लिहाल का असे विचारल्यावर मात्र मी बुचकळ्यात पडले!

त्याला कारण असे की शारंगपाणी सर म्हणजे अत्यंत brilliant पठडीतले! इंजिनिअर असले तरीही साहित्य लेखनावर त्यांचं प्रभुत्व. अत्यंत हरहुन्नरी असणारे श्रीनिवास शारंगपाणी हे नाट्य-लेखन, कादंबरी-लेखन, विज्ञानकथा-लेखन, गीत-लेखन अशा सर्वच लेखनप्रकारात सिद्धहस्त आहेत. वर्तमानपत्रात त्यांचे स्तंभलेखन असो किंवा हायड्रोपोनिक्स तंत्राच्या साहाय्याने त्यांनी घरातल्या बागेत उगवलेली वेगवेगळ्या भाज्यांची पिकं असोत, ते त्यांच्या कामाचा ठसा उमटवतातच. काम, कॉन्फरन्स, workshops आणि पर्यटन यांसाठी तब्बल चाळीसहून अधिक देश पालथे घातलेले आणि आपल्या बुद्धीच्या निकषावर टाटा नॅनो ते जॅग्वार, लँड रोव्हर अशा कार्सच्या संशोधनामध्ये मोलाचं योगदान देणारे श्रीनिवासजी जेव्हा नाटक लिहितात तेव्हा प्रज्ञा, रचनात्मकता आणि contentful content अनुभवण्याचा आनंद मिळतो हे वेगळे सांगायला नको!

शारंगपाणी आणि माझा परिचय साधारण २०१६ पासूनचा. स्वतंत्र थिएटर या पुण्यात कार्यरत एकमेव हिंदी नाट्य संस्थेची मी संस्थापक सदस्य आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर म्हणून २००६ पासून काम पाहते. शारंगपाणी यांनी गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्यावर 'Death of a Mad Mathematician' नावाचं इंग्रजी नाटक लिहिलं होतं, आणि ते

नाटक आम्ही करावं अशी त्यांची इच्छा होती. स्वतंत्र थिएटरमध्ये आम्ही केवळ हिंदी नाटकं सादर करत असल्यामुळे आम्ही त्यांना इंग्रजी नाट्यसंस्थांशी बोलावं असं सुचवलं. पण नाटक अत्यंत उत्कृष्ट होतं. आम्ही ते नाटक हिंदीत भाषांतरित करता येईल का यावर विचार करू लागलो आणि आमच्या टीमनं अपार मेहनत घेऊन ते नाटक हिंदीत भाषांतरित केलं. हे नाटक हिंदीमध्ये याच नावानं नोव्हेंबर २०१७ मध्ये रंगमंचावर आलं. Death of A Mathamatecian या नाटकाचं हिंदी रूपांतर अभिजीत चौधरी यांनी फारच सुरेख रीत्या दिग्दर्शित केलं आहे. त्यामध्ये रामानुजनची बायको जानकी अम्मल यांची भूमिका करण्याची संधी मला मिळाली. लोकांनी आमच्या सादरीकरणाला उचलून धरलं. अनेक वृत्तपत्रांनी देखील त्याचा गौरव केला.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये नाट्यशास्त्र हा पाचवा वेद मानला गेला आहे. नाट्याची शक्ती ही अमर्याद आहे. असं म्हणतात. सततच्या देव गण आणि असुर गण यांच्या युद्धाला कंटाळून ब्रह्मानं मनोरंजनाचं विज्ञान निर्माण करायची जबाबदारी भरत मुनी यांना दिली आणि नाट्यशास्त्र किंवा नाट्यवेदाची निर्मिती झाली. त्या काळी देखील वैमनस्य, राग, लोभ, दुःख, हिंसक वृत्ती अशा अवगुणांनी भरलेल्या पर्वात मनोरंजनाच्या माध्यमातून त्या वेळच्या समाजाला खऱ्या अर्थानं दिशादर्शन करण्याचं काम नाटकानं केलं. अर्थात नाट्यशास्त्राच्या व्याख्येत बसणाऱ्या त्या वेळी होणाऱ्या नाटकात आणि आजच्या नाटकात फरक आहे, आणि तो व्हायलाच हवा. कारण नाटक ही एक अत्यंत प्रवाही कला आहे. तर मनोरंजन, आनंद आणि दिशादर्शन करण्याचं कार्य नाटक दशकानुदशकं करीत आहे. नाटक समाजाचा आरसा आहे. समाजातल्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचं काम नाटककार करत असतो. म्हणूनच

शारंगपाणी यांचं "काळे ढग-पांढरे ढग" हे नाटक मला महत्त्वाचं वाटतं. हे नाटक विशिष्ट काळाचं प्रतिनिधित्व करत असलं तरीही त्यातील गर्भितार्थ कालबाह्य होणारा नाही.

आजच्या आपल्या मॉडर्न डे क्रायसिसचा अभ्यास करताना आपल्याला जाणवेल की आज समाजात मूल्यांपेक्षा किंमत, भावनेपेक्षा भौतिक गोष्टी, नात्यापेक्षा व्यवहार, शिक्षणापेक्षा शहाणपण, समूहापेक्षा व्यक्ती आणि विचारापेक्षा कृती महत्त्वाची ठरल्यानं घर, समाज, व्यक्ती यांच्या धारणेत आमूलाग्र बदल झाले. मनुष्य टोकाचा आत्मरत व आत्मकेंद्री झाला. म्हणूनच शारंगपाणी यांचं हे नाटक मला महत्त्वाचं वाटतं. अभिजीत आणि चिन्मय हे दोन विभिन्न विचारसरणीचे मित्र डोळ्यासमोर उभे राहतात. त्यांचं वा त्यांच्या पत्नी विशाखा आणि इरा यांचंही व्यक्तिचित्रण परिपूर्ण व दर्जेदार आहे. त्यांची मुलं विक्रम आणि इरा यांच्यातील सशक्त व्यक्तिचित्रण नाटकाला वेगळ्या उंचीवर घेऊन जातात. एक प्रभावी कथाबीज घेऊन त्याभोवती घटना व पात्रं गुंफलेली दिसतात. विशेषतः नेहाचं तिच्या आई वडिलांशी नातं, त्यांचे नेमके पण स्पष्ट संवाद यामुळे कथानक वैशिष्ट्यपूर्ण रचनेद्वारे रंगतदार होत जातं. आठ पात्रं असलेल्या या नाटकात सर्वांचेच जिव्हाळ्याचे विषय मांडलेले आहेत त्यामुळे प्रत्येक पात्र connect होत जातं. परस्परविरुद्ध स्वभाव, कृती व भाव-भावनांमधील तणाव यांमधून संघर्ष निर्माण होत जातो आणि शेवटी नाटकाचा शेवट एका आशादायी अशा निग्रहाकडे पोहोचतो. शेवटी, जैसे त्याचे कर्म तैसे। फळ देतो ईश्वर ॥ जसं कर्म असेल, तसं फळ मिळतं. कर्मानुसार फलप्राप्ती हा सृष्टीचा नियम व न्याय आहे. त्यामध्ये कोणीही ढवळाढवळ करू शकत नाही. सृष्टीचा निर्माता न्यायनिवाडा अचूक करत असतो. पृथ्वीवर न्यायालयाचे न्यायाधीश योग्य न्याय देणार नाहीत.

पैशाच्या जोरावर साक्षी पुरावे बदलले जातात. अपराधी सुटू शकतो. परंतु त्यावरही एक न्यायालय आहे. भ्रष्ट, आपल्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करणाऱ्या अभिजीत अग्निहोत्रीचं काय व कसं होतं हे वाचण्यातच खरी रसानुभूती आहे म्हणून इथे सांगत नाही.

मी सरतेशेवटी प्रकाशकांना धन्यवाद देते आणि आपल्या कार्यातून, लेखनातून आम्हाला एक व्यक्ती म्हणून, एक कलाकार म्हणून प्रेरणा देत राहिल्याबद्दल श्रीनिवास शारंगपाणी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

—***धनश्री हेबळीकर***
**संस्थापक सदस्य आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर**
**स्वतंत्र थिएटर आणि फिल्म्स – पुणे.**

# काळे ढग - पांढरे ढग

# काळे ढग-पांढरे ढग

(संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक)

## पात्र-परिचय

१. अभिजीत अग्निहोत्री: फार्मसीमधील ग्रॅज्युएट, महत्त्वाकांक्षी, महत्त्वाकांक्षेसाठी कुठल्याही थराला जाईल असा. क्युअरनेट फार्मास्युटिकल्स मध्ये उच्चपदावर.

२. विशाखा: अभिजीतची बायको. सुरुवातीला अभिजीतसारखीच ऐषारामाची आवड असणारी, पैशाला खूप महत्त्व देणारी. नंतर नंतर बदलू लागते—चिन्मयमुळे

३. चिन्मय खरे: बीएस्सी (केमिस्ट्री). अभिजीतबरोबर शाळा-कॉलेजात सहाध्यायी असलेला. २-३ नोकऱ्यांनंतर क्युअरनेट फार्मास्युटिकल्स मध्ये असिस्टंट मॅनेजर म्हणून जॉइन होतो. तिथंच अभिजीतबरोबर भेट होते आणि जुन्या मैत्रीला उजाळा मिळतो. तत्त्वनिष्ठ, ज्ञानी पण त्यामुळंच मागं पडलेला. शक्यतो तत्त्वाशी फारकत न घेणारा.

४. इरा: चिन्मयची बायको. सुरुवातीला अभिजीतच्या ऐश्वर्यामुळं खूप प्रभावित झालेली. अभिजीतसारखंच खुशामत करून वर जायला काय हरकत आहे असं मानणारी. पण पुढं चिन्मयचाच मार्ग बरोबर आहे असं पटलेली.

५. कोरडे: चिन्मयचा बॉस—अभिजीतच्या कंपूतला. चिन्मयला गोत्यात आणतो. चिन्मय कसाबसा सुटतो. अभिजीतची मदत होत नाही.

६. सुकुमारन: कोरडे सोडून गेल्यावर चिन्मयचा बॉस होतो. प्रामाणिक. चिन्मयची योग्यता ओळखून वरचा हुद्दा आणि जबाबदारीची कामं देतो, कौतुक करतो.

७. विक्रम: अभिजीतचा मुलगा. ऐश्वर्यात वाढलेला. हुशार पण वाया जात असलेला. ड्रग्जच्या विळख्यात सापडतो. चिन्मयच्या मुलीवर—नेहावर प्रेम करत असतो

८. नेहा: हुशार आणि वडिलांसारखीच तत्त्वनिष्ठ. विक्रमवर प्रेम करते पण त्याच्यापुढं पर्याय ठेवते. प्रेम टिकवून विवाह करायचा असेल तर ड्रग्ज सोडावी लागतील. विक्रम बदलतो.

९. डॉक्टर

—०0०—

## अंक पहिला

### प्रवेश १

*(श्रीमंती स्पष्ट दिसत असलेला अभिजीतच्या घरातील दिवाणखाना, उच्च सजावट, कोपऱ्यात बार आहे, मध्ये सोफा आहे)*

अभिजीत: (एकदा हातावरच्या घड्याळाकडे पाहत आणि एकदा भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहत) आता चिन्मय यायची वेळ झालेलीच आहे. त्याला बरोबर घर सापडेल ना?

विशाखा: (विंगमधून दिवाणखान्यात येत) इश्श, न सापडायला काय झालंय्? कितीतरी लोक आपल्याकडे येऊन गेलेत आपण या बंगल्यात राहायला आल्यापासून. आणि ते कसे येणार आहेत?

अभिजीत: कुणास ठाऊक. ते काही बोलला नाही चिन्मय.

विशाखा: आणि तुम्हाला तर केवढी आतुरता आहे त्याला भेटण्याची.

अभिजीत: मग आहेच तसं. शाळेत असल्यापासून आम्ही बरोबर होतो. कॉलेजातही एक-दोन वर्षं एकत्र होतो. मग पुढं फारकत झाली. मी दुसऱ्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली. तो मात्र त्याच कॉलेजात राहिला. मी पुढं अमेरिकेला एम. एस. करायला गेलो. आणि मग आता इतक्या वर्षांनी भेटलो.

विशाखा: पण तो आता तुमच्याच कंपनीत जॉइन झालाय् ना?

अभिजीत: हो. मी नव्हतो त्याचा इंटरव्ह्यू झाला तेव्हा. मी मध्ये जपानला नव्हतो का गेलो? पण त्याचं नाव मीच रेकमंड केलं होतं.

विशाखा: हां, हां. तुझी फ्लाइट चुकली होती..

अभिजीत: बरोब्बर.

विशाखा: मग आता जुन्या दोस्तांची नेहमी भेट होईल..

अभिजीत: छे ग विशू. म्हणून तर त्याला आज मुद्दाम बोलावलंय्.

विशाखा: पण का नाही तुम्ही भेटू शकत?

अभिजीत: अग आमची क्युअरनेट फार्मास्युटिकल कंपनी खूप मोठी आहे. आणि...

विशाखा: आणि काय?

अभिजीत: तसा तो मला रँकमध्ये बराच ज्युनियर आहे. त्याला बिचाऱ्याला बीएस्सी झाल्यावर लगेचच नोकरी करावी लागली. सुरुवातीला काही फुटकळ नोकऱ्या केल्यानंतर तो आता क्युअरनेटमध्ये आलाय्. असिस्टंट मॅनेजर म्हणून.

विशाखा: तुम्ही जनरल मॅनेजर आहात म्हणजे तुमच्यापेक्षा तो बराच खाली आहे.

अभिजीत: हां. तो तसा साधा आणि सरळ आहे. अगदी शाळा-कॉलेजपासून तसाच आहे. खूप तत्त्वनिष्ठ आहे. आता सग्गळ्या कंपन्यांमधून खूप पॉलिटिक्स चालतं. पण हा त्यापासून दूर. सरळमार्गी, प्रामाणिक. अजिबात खुशामत न करणारा. म्हणूनच मागे पडला.

विशाखा: अस्सं आहे होय.

(तेवढ्यात दारावरची बेल वाजते. अभिजीत जाऊन दरवाजा उघडतो. चिन्मय प्रवेश करतो. मागोमाग इरा.)

अभिजीत: या, या, या. अरे चिन्मय, किती वर्षांनी आणि योगायोगानं आपली भेट झाली नाही? कॉलेजनंतर कुणाकुणाकडून कळायचं पण परवा ऑफिसमध्ये इतक्या वर्षांनी भेटलो. म्हटलं हे काही खरं नाही. म्हणून तुला घरीच बोलावलं. सविस्तर गप्पा तरी होतील. (दोघेही एकमेकांना मिठी मारतात. इरा आणि विशाखा एकमेकींचे हात हातात घेतात.)

चिन्मय: होय रे. मलाही खूप आनंद झाला. मीही इराला म्हटलं—बाय द वे ही माझी बेटर हाफ इरा. (इराकडे वळून) आमच्या आता खूप जुन्या काळापासूनच्या गप्पा होतील. आणि...

अभिजीत: आणि काय?

चिन्मय: आणि या आपल्या बेटर-हाफ बोअर होतील..

(सगळे खळखळून हसतात.)

इरा: आमच्याकडे त्याचा उतारा आहे म्हटलं.

चिन्मय: घ्या. म्हणजे यांच्याकडे जर उतारे असले तर मग आमच्या औषध कंपन्यांचं कसं व्हायचं?

(सगळे पुन्हा जोरात हसतात.)

विशाखा: उतारा म्हणजे—आम्ही पण एकमेकींशी गप्पा मारू. काय ग इरा—ए, मी तुला इरा म्हणूनच हाक मारीन. काय? उगीच ते कृत्रिम अहो-जाहो नको.

इरा: नो प्रॉब्लेम. मीही तुम्हाला विशाखा म्हणून हाक मारीन.

विशाखा: अंहं. ‘तुम्हाला’ नाही—‘तुला’.

(दोघी हसून एकमेकींना टाळ्या देतात.)

अभिजीत: हां, इथं बसा असे आरामात. मी आता आपल्यासाठी ड्रिंक बनवतो. मी आपला स्कॉच व्हिस्की घेतो-ग्लेन्फिडिश. विथ सोडा अँड आइस. सर्वात महाग आहे सध्या ही—ट्वेंटी इयर्स ओल्ड. आपल्याला ही ट्वेंटी इयर्स ओल्ड एकदम ट्वेंटी इयर्स यंग बनवते. तू काय घेणार?

चिन्मय: मला सुद्धा व्हिस्की चालेल--पण कुठलीही चालेल—तुझी ट्वेंटी इयर्स ओल्ड नसली तरी चालेल. विथ सोडा अँड आइस. मी मनानं कायम ट्वेंटी इयर्स यंगच असतो.

अभिजीत: दॅट्स लाइक ए गुड बॉय. पण मी तुलाही ग्लेनफिडिशच देणार. इरा, तू काय घेणार?

इरा: मला जिन विथ लाइम कॉर्डियल आवडतं.

अभिजीत: नो प्रॉब्लेम. आहे आपल्याकडे मस्तपैकी इंपोर्टेड जिन. विशू, तुला वाईन?

विशाखा: नाही. मी पण इरासारखी जिनच घेईन.

चिन्मय: विक्रम कुठाय? (अभिजीत आणि विशाखा एकमेकांकडे पाहतात.)

विशाखा: (घाईघाईनं) मित्राकडे गेलाय्. अभ्यासाला.

चिन्मय: वा:.

(सर्व जण ड्रिंक घेत गप्पा मारत असतात. गप्पात काही वेळ गेलेला दाखवणे. मग स्पॉटलाइट अभिजीत आणि चिन्मयवर.)

अभिजीत: अरे, अनेक वेळा कॉँप्रोमाइज करावे लागतात. त्याशिवाय तुमची ग्रोथ कशी होणार?

चिन्मय: कॉंप्रोमाइज करावे लागतात हे मान्य आहे पण ते बेसिक तत्त्वांच्या विरुद्ध जात असतील तर नाही.

अभिजीत: म्हणजे?

चिन्मय: महात्मा गांधी म्हणाले होते की “As imperfect beings like us cannot practise perfection, we devise every moment, limits of its compromise in practice.”

अभिजीत: अरे पण आपल्या व्यावहारिक जीवनात कसं करायचं ते?

चिन्मय: म्हणजे, समजा तुम्हाला तुमच्या कुटुंबासमवेत सुट्टी घालवायची आहे. तुम्ही सगळी तयारी केलेली आहे. पण अचानक कंपनीचं एक महत्त्वाचं काम निघालं आणि तुमची उपस्थिती आवश्यक आहे. अशा वेळी कॉंप्रोमाइज करून तुम्ही बायका-मुलांना पुढं पाठवणं आणि नंतर त्यांना जॉइन होणं इज ओके.

अभिजीत: मग? व्हॉट इज नॉट ओके?

चिन्मय: आय विल टेल यू. समजा एक मोठी ऑर्डर आहे आणि ती वेळेत पुरी करायची आहे. ते शक्य नाही. प्रॉडक्शन डिपार्टमेंटकडून प्रेशर आहे. तुम्ही काही स्टेप्स गाळता आणि ऑर्डर पुरी करता. तुम्हाला कळतंय् की असं केलं तर ग्राहकांना धोका पोचू शकतो. हा कॉंप्रोमाइज चुकीचा आहे. गांधीजींना हेच अभिप्रेत आहे. आपण परफेक्ट नसल्यानं आपल्याला तडजोडीचे पर्याय शोधावे लागतात.

अभिजीत: हं. पण वरिष्ठांकडूनच तसा आदेश आला तर?

चिन्मय: तरी तो नाकारणं आणि ग्राहकांची सुरक्षा कॉंप्रोमाइज न करणं हे सर्वात महत्त्वाचं असेल.

अभिजीत: मला नाही वाटत हे बरोबर आहे असं? बॉसनं आदेश दिल्यावर त्यानं याचा विचार केलेला असणारच. आणि तो आदेश देतोय् याचा अर्थ त्याच्या दृष्टीनं ग्राहकांची सुरक्षा कॉंप्रोमाइज होत नाहीय्. आणि त्याच्या मनात पुढं येणाऱ्या प्रॉब्लेम्सची सोल्यूशन्स तयार असणारच ना?

चिन्मय: त्या-च्या दृ-ष्टी-नं!!

अभिजीत: हो, पण तो सीनियर आहे. त्यानं अशा परिस्थितीतले अनेक निर्णय यापूर्वी घेतलेले असणार. त्याला अनुभव आहे—म्हणूनच तो सीनियर पोझिशनला आहे.

चिन्मय: नॉट नेसेसरिली...

अभिजीत: म्हणजे? तुला काय म्हणायचंय?

चिन्मय: मला इतकंच म्हणायचंय् की अशा परिस्थितीत मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटेल तसाच निर्णय घेईन.

अभिजीत: चिन्मय, राग मानू नकोस पण हे सदसद्विवेकबुद्धी वगैरे सर्व अव्यावहारिक आहे. प्रत्येकजण आपापल्या स्वार्थासाठीच काम करत असतो आणि जसं जमेल तसं सदसद्विवेकबुद्धी वगैरे गप्पा मारतो. आइन रॅंडची पुस्तकं वाचलीस का? या रॅट रेस मध्ये पुढं जायचं म्हणजे स्वत:चा विचार करावा लागतोच.

चिन्मय: होय—पण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत. आइन रॅंडची विचारधारा सर्वांना पटेल अशी नाहीये. तू आयर्व्हिंग वॅलेसची पुस्तकं वाच म्हणजे तत्त्वं आणि त्यासाठी झगडणाऱ्या माणसांचे विचारही तुला कळतील.

(स्पॉटलाइट विशाखा आणि इरावर.)

विशाखा: मजा आली नाही? आपण छान शेअर केलं.

इरा: आणि ते दोघं काय बोलतायत त्याचाही कानोसा घेतला! (एकमेकांना टाळी देतात.)

विशाखा: चिन्मय म्हणतो ते पटण्यासारखं आहे. सगळंच काही आपण स्वार्थासाठी करत नाही. आपण बायका तर कुटुंबाकरता किती सॅक्रिफाइस करतो..

इरा: पण अभिजीत म्हणतोय् त्यातही अर्थ आहे. उगीच तत्त्वांना चिकटून बसून स्वत:चं नुकसान करून घेण्यात कसला आलाय् शहाणपणा? चिन्मयचं तर असल्या हट्टापायी किती नुकसान झालंय्. नाहीतर तो आत्तापर्यंत कुठल्या कुठं पोचला असता..

विशाखा: हं, काही कळत नाही काय खरं अन् काय खोटं.

इरा: आणि काय चांगलं अन् काय वाईट. (पुन्हा दोघी जोरात हसतात आणि एकमेकींना टाळी देतात.)

विशाखा: (घड्याळाकडे बघत) आता मला वाटतं जेवू या? काय?

इरा: हो, हो.

विशाखा: अभी, तुमचं झालंय् का? मी डिशेस गरम करून आणते.

अभिजीत: (दोघांच्या ग्लासमध्ये व्हिस्की ओतत) हो. हे शेवटचंच. तुझं गरम करून होईपर्यंत आमचं संपतंच आहे.

(स्टेजवरचे दिवे हळूहळू मंद होतात. पुन्हा स्टेज प्रकाशझोतात येतं तेव्हा सर्वजण सोफ्यावरच जेवण संपवताना दिसतात.)

चिन्मय: छया. या आइस्क्रीमनं तर पोट तुडुंब भरलं बुवा!

अभिजीत: यू एंजॉइड नो?

चिन्मय आणि इरा: येस, येस. ऑफ कोर्स.

## अंक पहिला

### प्रवेश २

*(चिन्मयचं मध्यमवर्गीय घर. बऱ्यापैकी सजवलेलं पण काटकसरीचा प्रयोग स्पष्टपणे दिसून येतोय्. वेताच्या खुर्च्यांमध्ये अभिजीत आणि विशाखा बसलेत आणि चिन्मय सोफ्यावर. इकडे-तिकडे—विशेषत: सोफ्यावर पुस्तकं पडलेली आहेत. विशाखा अनकंफर्टेबल. तिची चुळबूळ स्पष्ट दिसून येत्येय्.)*

अभिजीत: किती पुस्तकं आहेत रे तुझ्याकडे?

चिन्मय: असतील शे-दोनशे…

अभिजीत: वाचतोस का ती सगळी?

चिन्मय: वाचतो अधून-मधून—वेळ मिळेल तसं.

अभिजीत: कामापासून विरंगुळा म्हणून…

चिन्मय: छे, छे. पुस्तकं म्हणजे माझं सर्वस्व आहे. लोकमान्यांनी उगीच नाही म्हटलं “ग्रंथ माझे गुरू”

इरा: (दरवाज्यात येत) आमच्याकडे यांचे गुरू सगळीकडे पडलेले दिसतील. अगदी टॉयलेटमध्ये सुद्धा! मी आपली आवरत्ये सारखी. (सगळे हसतात.)

अभिजीत: (सोफ्यावरील एक पुस्तक हातात घेऊन) म्हणजे तू शेक्सपिअर पण वाचतोस वाटतं.

चिन्मय: होय, का रे?

अभिजीत: तो ज्या स्टोरीज् लिहितो ना त्या बोजड नाही वाटत का रे तुला?

चिन्मय: अभिजीत, शेक्सपिअरनं स्टोरीज् नाही लिहिल्या. त्यानं महान् नाटकं लिहिली. ती बोजड अजिबात वाटत नाहीत. त्याची भाषा सतराव्या शतकातली आहे त्यामुळं काहींना वेगळी वाटू शकते. पण त्यात जीवनाचा अर्क आहे—देअर्स लाइफ इन हिज प्लेज…

अभिजीत: (दुसरं एक पुस्तक हाताळत) अन् भगवद्गीतेचं पठणही करतोस वाटतं

चिन्मय: मी पठण कशाचंही करत नाही. भगवद्गीतेतही छान फिलॉसॉफी आहे—तिचा मी मधून मधून आस्वाद घेत असतो.

अभिजीत: हे असलं तर आपल्या डोक्यावरूनच जाणार.

चिन्मय: हं. तू आपला आइन रँडच वाच आपला.

अभिजीत: जे आपल्याला आवडतं ते वाचावं. मी आपला जनरली विरंगुळा म्हणून वाचन करतो.

विशाखा: नाहीतरी यांना वाचायला वेळ कुठं मिळतोय्?

चिन्मय: इरा, ते ग्लास आणि ट्रे घेऊन येत्येस् ना?

इरा: (आतल्या स्वयंपाकघरातून) हो, आले—आले.

अभिजीत: अरे, ठीक आहे काय घाई आहे एवढी?

विशाखा: अरे अभी, घाई नाही काय? उद्या दिल्लीला जायचंय् ना तुला?

अभिजीत: अग हो—पण उद्या अकरा वाजताचं प्लेन आहे आणि मी काही कंपनीत जाणार नाहीये. डायरेक्टच जाणारे मी एअरपोर्टवर.

*(विशाखा निराश. तेवढ्यात इरा ट्रे घेऊन येते आणि स्टीलच्या टीपॉयवर ठेवते आणि चिन्मयशेजारी बसते.)*

चिन्मय: आम्ही आपली भारतीय व्हिस्की आणल्येय् हं—गोड मानून घ्या. या दोघींसाठी पण भारतीय जिन आहे. आय ॲम शुअर दे विल एंजॉय... (विशाखा नाक मुरडते. सुस्कारा सोडत म्हणते "हं, चालेल..." चिन्मय ग्लासात ड्रिंक ओततो आणि सोडाही ओततो. नंतर तो एका जगमधून पाणी ओतायला लागतो.)

अभिजीत: अरे, अरे. मला आइस टाक ना.

चिन्मय: अरे, त्याचं काय आहे की आमचा फ्रिज जुना आहे.. त्यात बर्फ लौकर होत नाही. मी जवळून बर्फ घेऊन येऊ का?

अभिजीत: हॅत् तिच्या मारी. पण असू दे. एवढं काही नडलं नाहीये. अन् पाणीही चांगल्यापैकी गार आहे.

अभिजीत: ओके, ओके. समथिंग इज बेटर दॅन अजिबात नथिंग! (सर्वजण ग्लास उंचावून 'टोस्ट' करतात.)

चिन्मय: (ग्लासाकडे बोट दाखवीत) आणि विदाउट धिस अभिजीत इज नथिंग! (सर्वजण हसतात.)

अभिजीत: (चिन्मयच्या पाठीवर थाप मारीत) माझी नालस्ती करतोयस काय रे?

चिन्मय: तुझी आणि नालस्ती मी करणार? कसं काय शक्य आहे? उलटं होणार नाही ना एवढं बघ!

अभिजीत: नेहा कुठाय्?

चिन्मय: ती गेल्येय् तिच्या मावशीकडे.

अभिजीत: बरं, हे बघ—विशाखा काय म्हणत्येय् की आपण सर्व म्हणजे तुम्ही दोघं आणि आम्ही दोघं ट्रिपला जाऊ या. काय?

विशाखा: मी म्हणत्येय् काऽऽय? तुम्हीच सुचवत होतात मला.

अभिजीत: विशू, पण तू देखील हो म्हणालीस ना?

चिन्मय: ट्रिपला? ते कुठं?

अभिजीत: थायलंड—बँकॉक नि पट्टायाला.

इरा: अय्या, बँकॉक अन् पट्टायाला? कित्ती मज्जा येईल. आमच्या ग्रुपमधली केतकी जाऊन आली मध्ये. खूप छान आहे म्हणत होती.

चिन्मय: (वेडावून दाखवत) ॲहॅ.. म्हणे कित्ती मज्जा येईल.. परवडणार आहे का ते आत्ता आपल्याला? आणि पासपोर्ट आहे का आपल्याकडे, इरावतीदेवी?

इरा: (हिरमुसली होत) च् च्—नाही ना. मग कुठलं आमच्या नशिबात आलंय् थायलंड?

अभिजीत: इरा, एवढं निराश व्हायचं कारण नाही. पासपोर्ट काय? काढून टाकू. त्यात काय?

चिन्मय: अरे, पासपोर्ट काढायला सुद्धा दोन-तीन महिने लागतात. आणि खर्च? खर्च काय कमी येणाराय् का या ट्रिपचा?

अभिजीत: हे बघ, तू चिंता करू नकोस. एव्हरीथिंग कॅन बी अरेंज्ड.

इरा: आता ते बघतायत ना तर तू कशाला चिंता करतोयस चिन्मय?

अभिजीत: हां मग ठरलं तर. इराचा पासपोर्ट झाला रे झाला की आपण निघायचं—थायलंड ट्रिपला.

चिन्मय: अरे, असं काय करतोयस तू? अरे पैशाची जमवाजमव नको का करायला?

अभिजीत: अरे तू काय पळून चाललायस का? आपण एकाच कंपनीत तर कामाला आहोत. मी आहे ना?

इरा: चिन्मय, आता तरी हो म्हण ना. नाही तर कधी करायची आपण हौस?

चिन्मय: मला काही हे पटत नाही. आपली क्षमता आली की आपण जरूर जाऊ.

अभिजीत: (ड्रिंकचा एक घुटका घेत) आणि या क्षमतेबद्दलच मला तुझ्याशी बोलायचंय्.

चिन्मय: काय बोलायचंय् तुला माझ्या क्षमतेबद्दल?

अभिजीत: अरे, तुझ्यामध्ये फार मोठी क्षमता आहे तरी तू मागे पडलास. तुझ्या ज्ञानानं आणि कर्तृत्वानं तू माझ्या बरोबरीनं किंवा माझ्या पुढंही जायला हवं होतंस. पण गड्या तू मागं राहिलास.

इरा: चिन्मय तसाच आहे. (आवेशपूर्ण आविर्भावानं) तत्त्ववादी, प्रामाणिक, तडजोड न करणारा...

चिन्मय: चुकीचं आहे का ते?

अभिजीत: चुकीचं नक्कीच नाही. पण ते काम फार मोठ्या लोकांचं—गांधीजी, साने गुरुजी यांच्यासारख्यांचं. आपण सामान्य माणसं. आपण कायम ध्येयवादी वगैरे राहून कसं चालेल? आपल्याला नोकरी करायच्येय्, संसार करायचेत...

चिन्मय: पण मी असं ठरवलंय् की तत्त्वांना मुरड नाही घालायची.

अभिजीत: तेच तर तुला मी सांगतोय्. असं rigid राहून नाही चालत व्यवहारात. अनेकदा कॉँप्रोमाइज करावा लागतो. अन् आताही तुला तो करावा लागणार आहे..

चिन्मय: पण सॉरी, अभी. आम्ही नाही येऊ शकणार

अभिजीत: हे बघ. तू शांतपणे विचार कर. नाहीतरी इराचा पासपोर्ट व्हायला वेळ लागणारच आहे.

चिन्मय: मी पूर्ण विचार केलाय्. आत्तातरी आम्ही नाही येऊ शकणार.

(इराचा चेहरा हिरमुसला होतो.)

## अंक पहिला

### प्रवेश ३

*(चिन्मयचं घर. चिन्मय एकटाच सोफ्यावर पडून वाचतोय्. आतमधून भांड्यांचा आवाज—हळूहळू मोठा होत जाणारा. चिन्मय मधूनच पुस्तक खाली टाकतो आणि कपाळाला हात लावतो. असं दोन-तीनदा होतं. शेवटी पुस्तक ठेवून देऊन जोरात हाक मारतो.)*

चिन्मय: इरा, इरा, अग तुला झालंय् तरी काय?

(आवाज चालूच. शेवटी चिन्मय दारापाशी जातो.)

चिन्मय: इरा, व्हॉट इज युअर प्रॉब्लेम? काय चाललंय् काय?

(थोड्या वेळात इरा प्रवेश करते.)

इरा: काय चाललंय्? काही नाही आमचं मर-मर मरणं चाललंय्. दुसरं काय होणार या घरात!

चिन्मय: जरा मला समजेल असं बोलशील का इरे? अशी इरेला का पेटल्येयस?

इरा: काही नाही. उगीच फालतू विनोद करू नका. माझ्या नशिबात कष्ट करून मरणं हेच दिसतंय्. हौस-मौजेला काही जागाच नाही. सारखं काटकसरीनं जगायचं. तुमची तत्त्वं सांभाळायला...

चिन्मय: असं का म्हणतेस? काय हवंय् तुला ते सांग तरी.

इरा: काय उपयोग? देणार आहात थोडेच तुम्ही?

चिन्मय: सांग तरी तुला काय हवंय् ते.

इरा: मी म्हणत होते. किती तरी वर्षं झाली आपण कुठं बाहेर गेलो नाही,

चिन्मय: गेल्याच्या गेल्या वर्षी नाही का आपण जबलपूरला गेलो होतो...

इरा: हॅः. ती काय ट्रिप होती? तुमच्या मावसभावाच्या लग्नाला गेलो होतो आणि दोन दिवस जास्तीचे आजूबाजूला हिंडून आलो.

चिन्मय: ते भेडाघाट आणि नर्मदा...

इरा: ती कसली आल्येय् ट्रिप—नुसतं जाऊन चार फोटो काढून जेवून खाऊन परत यायची घाई...

चिन्मय: मग तुला कशी ट्रिप हवीय्?

इरा: परवा अभिजीत म्हणत नव्हता का? बँकॉक-पट्टायाच्या ट्रिपबद्दल?

चिन्मय: ओ: ते खूळ शिरलंय् काय तुझ्या डोक्यात?

इरा: काय हो खूळ कसं काय? मी दिवस-रात्र खस्ता खायच्या आणि एखाद्या चांगल्या आरामशीर ट्रिपचं स्वप्नही पाहायचं नाही का? हेच, हेच ते मी म्हणते—आमचं नशीबच फुटकं. (मुसमुसू लागते.)

चिन्मय: (जवळ जाऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत) अग, असं काय करत्येयस वेड्यासारखं?

इरा: (हात हिसडून देत) मी वेड्यासारखं करत्येय् काय? आणि तुमचं शहाण्यासारखं तत्त्वनिष्ठ वागणं? काय पडलं पदरात इतक्या वर्षांच्या कष्टांनंतर? तुमचे ज्युनियर सुद्धा फॉरेनला जाऊन आले आणि तुम्हाला इथंच कुजवत ठेवलं—तुमच्या तत्त्वांबरोबर. चुलीत घाला ती तत्त्वं तुमची.

चिन्मय: हे बघ तुला माहीत नाही की झटपट यशाच्या मार्गानं गेल्यावर काय-काय मानहानी सहन करावी लागते ते. शिवाय कधीतरी चौकशीलाही सामोरं जावं लागतं भ्रष्ट मार्ग स्वीकारला की.

इरा: आणि तत्त्वनिष्ठ राहिल्यावर काय उजेड पडलेत?

चिन्मय: कमीत-कमी स्वाभिमानानं जगल्याचं समाधान तरी मिळतं.

इरा: ते तुम्हाला. आम्हाला काय? धड हौस नाही की मौज नाही. अगदी साधा आरामही नाही.

चिन्मय: इरा तू अगदी इरेला पेटल्येयस…

इरा: हे बघा उगीच कोट्या करू नका. मला आता या तुमच्या तत्त्वनिष्ठ जगण्याचा कंटाळा आलाय्. अगदी उबग आलाय् या रेट्याचा.

चिन्मय: (डोकं हातानं अगदी गच्च धरून) मग आता मी काय करावं अशी तुझी अपेक्षा आहे?

इरा: काय वाटेल ते करा. मी आता काही तुम्हाला पुन्हा सांगायच्या फंदात पडायची नाही.

## प्रवेश ४

*(चिन्मयचं घर—घरात नेहा मध्येच येरझारा घालत्येय् तर मध्येच सोफ्यावर बसत्येय्. हातात एक पुस्तक. ते मिटून काहीतरी पाठ करत्येय्. दारावरची बेल वाजते.)*

नेहा: आत्ता घरात कोणी नाही तर कोण आलंय् तडमडायला? आधीच अभ्यास होत नाहीय् नीट अन् त्यात हे मधेच काहीतरी उपटतंय्. (चरफडत जाऊन दार उघडते. दारात विक्रम उभा.) क-कोण पाहिजे तुम्हाला?

विक्रम: इरा आँटी आहेत का?

नेहा: नाही. का काय काम होतं?

विक्रम: सांगतो-सांगतो पण आत तर येऊ द्याल की नाही?

नेहा: (दरवाजा अडवत) नाही. प्रथम तुम्ही कोण ते सांगा.

विक्रम: हं—तू नेहा ना?

नेहा: हो, पण आपण कोण ते सांगितलं नाहीत आणि एकदम अरे-तुरे करताय्.

विक्रम: मी विक्रम—अभिजीत अग्निहोत्रींचा मुलगा. मला त्यांनीच पाठवलंय्.

नेहा: ओहो. ते-ते विक्रम होय तुम्ही?

विक्रम: अजबच आहे. ते-ते विक्रम म्हणजे कोण?

नेहा: तसं नाही हो. म्हणजे बाबांनी तुमच्या बाबांबद्दल सांगितलं होतं— आणि तुमच्याबद्दल पण!

विक्रम: ए, प्लीज. आता हे आपण-तुमच्या वगैरे सोडशील का जरा? तू-तुझ्या असं म्हटलं तर नाही का चालणार? आणि आत यायला सांगणार की नाही आता?

नेहा: हां, हां. या ना—सॉरी, ये ना आत.

विक्रम: आता येऊ कसा मी आत? तू तुझा आडवा हात बाजूला करशील तेव्हा ना?

नेहा: ओ, सॉरी. या—ये ना आत. (आडवा हात बाजूला करते. विक्रम आत येतो अन् उभा राहतो.) अरे, उभा का तू? बस ना? (सोफ्यावर बसायला सांगते. विक्रम सोफ्यावरच्या वस्तू बाजूला करून बसतो.) मी पाणी घेऊन येते हं. (नेहा आत जाते.)

विक्रम: (तिथंच पडलेलं नेहाचं पुस्तक घेऊन चाळतो.) ग्रेट. भारी स्टडी चाललेला दिसतोय्. अगदी गीक दिसतेय् पोरगी. (हे म्हणत असतानाच नेहा येते.)

नेहा: काय म्हणालास?

विक्रम: नो, नो. यू सीम टु बी अ गीक?

नेहा: पण मग अभ्यास तर करायलाच हवा ना—कॉल मी गीक इफ यू सो विश्.

विक्रम: आपलं सगळं एकदम वेगळं आहे. अभ्यास दुय्यम—सेकंडरी. कॉलेजमधे मजा करायची.

नेहा: पण आपण ज्यासाठी कॉलेजला जातो ते कर्तव्य पुरं नको का करायला?

विक्रम: ओ, बाईसाहेब, कशाला तत्त्वज्ञान सांगताय्?

नेहा: जीवनाचं तत्त्वज्ञान जर पक्कं असेल तर कुठल्याही संकटावर मात करता येते.

विक्रम: अरे बाप रे. अजून मोठी फिलॉसॉफी. तू कुठल्या वर्षाला आहेस?

नेहा: फर्स्ट इयर.

विक्रम: हां म्हणजे अजून नवीनच आहेस.

नेहा: तू कॉलेजात जाऊन मग काय करतोस? फक्त मजा?

विक्रम: हो. पासापुरते मार्क मिळतील एवढी बुद्धी आहे इथं! (डोक्याला हात लावून दाखवतो.)

नेहा: पासापुढं जायचं नाहीये का?

विक्रम: डॅडी म्हणतात, मार्कांना काही महत्त्व नाही. ते विकत देखील मिळतात. हवी तिथं सूत्रं हलवली की काम होऊन जातं.

नेहा: म्ह-म्हणजे तू मार्क विकत घेऊन क्लास मिळवणार?

विक्रम: मी घेईन असं नाही पण मिळत असले तर का घेऊ नयेत? दुसरं कुणी तरी घेईलच ना? डॅडी म्हणतात, योग्य किंमत दिली तर काहीही मिळू शकतं.

नेहा: डॅडींच्या विचारांचा मोठा पगडा दिसतोय् तुझ्यावर.

विक्रम: यस्. ही इज माय हीरो.

नेहा: (विचारात पडते) ओके. पण काय काम होतं?

विक्रम: हां. डॅडींनी तुझ्या आईचा पासपोर्ट बनवण्यासाठी डॉक्युमेंट्स मागितली होती. म्हणजे आधी तसं बोलणं झालंय्.

नेहा: हां, आई म्हणत होती खरी. तिनं एका पिशवीत ती ठेवल्येयत. थांब हं बघते. (कपाट उघडून धुंडाळून एक पाउच काढते.) हेच ते कागद, सर्टिफिकिटं आणि फोटो पण दिसतायत..

विक्रम: हां बरोबर. हेच असणार. ठीक आहे. निघतो मी.

नेहा: अरे, असं काय करतोयस? थांब ना. चहा करते.

विक्रम: चहा नको. मी कोक पितो.

नेहा: कोक आमच्याकडे नाही. पण कोकमचं सरबत घेशील का?

विक्रम: आता अगदी तू प्रेमानं म्हणतेच आहेस तर घेईन मी.

नेहा: ए, प्रेमानं वगैरे नाही हं! घ्यायचं असलं तर घे—उगीच नखरे नकोत.

विक्रम: मग नको. कुठलीही गोष्ट उपचार म्हणून—फॉरमॅलिटी म्हणून असेल तर नको आपल्याला..

नेहा: (विक्रमला डिवचत) ए असं रे काय करतोस? घे ना.

विक्रम: प्रेमानं?

नेहा: ओके. प्रेमानं. (आत जाते.)

विक्रम: आयटम चांगला आहे पण साधी-सरळ दिसत्येय्. (इकडे-तिकडे हिंडून पाहणी करतो). आयला, सगळं साधं-सुधं असूनही नीट-नेटकं ठेवलंय्.

नेहा: (एका ट्रेमधून कोकमचे दोन ग्लास घेऊन येते. एक विक्रमला देते आणि एक स्वत: घेते आणि जवळच बेडवर बसते.) हं हे घे.

विक्रम: (एक घुटका घेऊन) बर्फ घालणार का थोडा बर्फ?

नेहा: अरे, बर्फ नाहीये. म्हणून गार पाणी टाकलंय् माठातलं. हवं तर फ्रिजमधलं गार पाणी घालू का थोडं?

विक्रम: म्हणजे? फ्रिज आहे पण बर्फ नाही?

नेहा: अरे हो. आमचा फ्रिज जुना आहे ना—बर्फ नीट होतच नाही त्याच्यात.

विक्रम: असू दे, असू दे. बाहेरून आल्यावर चिल केलेला कोक प्यायची सवय आहे मला…

नेहा: ते तब्येतीला चांगलं नसतं.

विक्रम: थँक्स फॉर द टिप. इथं कशा सगळ्या वस्तू अगदी नीट-नेटक्या ठेवल्यायत. नाहीतर माझ्या खोलीत सगळं अस्ताव्यस्त पडलेलं असतं… लाइक गार्बेज, यू सी. मॉम सारखी ओरडत असते माझ्यावर…

नेहा: आमची जागा लहान आहे ना. नीट-नेटकं ठेवायलाच लागतं आम्हाला.

विक्रम: मोठी जागा का नाही बघत? आमच्या बंगल्याजवळ एक पॉश सोसायटी आहे. तिथं काही फ्लॅट द्यायचेयत.

नेहा: पण आम्हाला परवडणार नाही रे.

विक्रम: अग, कमॉन, तुझे डॅड पण माझ्या डॅडच्या कंपनीतच आहेत ना?

नेहा: हो. क्युअरनेट फार्मामध्येच आहेत ते पण.

विक्रम: मग काय प्रश्नच नाही.

नेहा: म्हणजे?

विक्रम: रिलॅक्स. हे पण मॅनेज होऊ शकतं.

नेहा: हे पण म्हणजे?

विक्रम, डोंट बी सिली. मोठा पॉश फ्लॅट…

नेहा: हॅ: ते कसं शक्य आहे?

विक्रम: डॅड कॅन मॅनेज दॅट ईझिली. माय डॅड सेज—एव्हरीथिंग कॅन बी मॅनेज्ड.

नेहा: हे, हे… काही तरी भारीच दिसतंय्. मला नाही पटत.

विक्रम: माणसाला कशी उंच भरारी घ्यायची अँबिशन पाहिजे. अँबिशन इज एव्हरीथिंग इन लाइफ.

नेहा: अँबिशन पाहिजे. पण ते—एव्हरीथिंग कॅन बी मॅनेज्ड—ते पटत नाही. तुझं बरंच काही चुकतंय्.

विक्रम: असू दे. पण आता मला गेलं पाहिजे. (निघतो)

## अंक पहिला

### प्रवेश ५

*(विमानाचा अंतर्भाग दाखविणारा सेट. पुढच्या भागापासून ते मागच्या भागापर्यंत घेतलेला छेद—पण पूर्ण लांबीचा नाही. पुढच्या दोन सीटवर इरा आणि विशाखा बसलेल्या आहेत. मागच्या सीटवर चिन्मय आणि अभिजीत बसलेले आहेत. प्रेक्षकांना विमानाच्या खिडकीमधून पलीकडील दृश्य दिसत आहे. विमानाच्या इंजिनच्या आवाजाची पार्श्वभूमी. स्पॉटलाइट या चौघांवरच. बाकीच्या सीट्स अंधारात दाखवल्या तरी चालतील. विमान टेक-ऑफ करताना 'नोज-अप' म्हणजेच सेट थोडा तिरका झाला पाहिजे. मग 'क्रूझ' मध्ये परत सरळ दाखवला गेला पाहिजे.)*

अभिजीत: चला गंगेत घोडं न्हालं. ट्रिपची सुरुवात तर झाली. किती होय-नाही झालं रे तुझ्या बाजूनं.

चिन्मय: होय, अरे पैशाची व्यवस्था नको का व्हायला. मला नाही असं उधारीवर जगायला आवडत.

अभिजीत: अरे काय घाई आहे. बघू सावकाश.

इरा: (मागे तोंड करून) झाली का तुमची सुरुवात वादाला. निदान ट्रिपमधे तरी नको.

चिन्मय: अग, तुझ्या आग्रहामुळंच मी यायला तयार झालो. नाहीतर मी इथं नसतोच.

इरा: आणि आमच्या नशिबात मग अशी फॉरेन ट्रिप आलीच नसती.

अभिजीत: ते आता जाऊ दे. लेट अस एंजॉय द ट्रिप.

(काही वेळ कोणीच बोलत नाही. इंजिनाची घरघर वाढते. सीट बेल्ट बांधण्याची सूचना होते.)

अभिजीत: आता टेक-ऑफ होईल. पण काय घाणेरडी हवा आहे. सगळं काळंकुट्ट वातावरण आहे. हे साले काळे ढग आकाशात कसे गच्च दाटून राहिले आहेत. पण तिकडं वातावरण खूप छान असेल—सनी.

(सेट थोडा हलतो. विमान हललेलं दाखविण्यासाठी काही वेळ सेटची थोडी हालचाल.)

चिन्मय: चला—निघालो आता आपण!

(आवाज शिळेसारखा तीव्र आणि कर्कश—विमानानं घेतलेला वेग दाखविण्यासाठी. विमान ‘नोझ अप’ झाल्याचं दाखविण्यासाठी सेट किंचित तिरका—म्हणजे पुढची बाजू थोडी वर. खिडकीतून फक्त काळोख.)

अभिजीत: बाहेरचं वातावरण कसं अंधारलेलं, खिन्न, gloomy आहे नाही का?

चिन्मय: हो ढगाळलेलं अन् काळोखी आहे.

अभिजीत: मला नाही असलं काळोखी वातावरण आवडत…

चिन्मय: आवडो वा न आवडो—आपण ते काही बदलू शकत नाही.

अभिजीत: थोड्या-फार प्रमाणात बदलू शकतो आपण…

चिन्मय: ते कसं?

अभिजीत: हे बघ, ऑफिसमध्ये जेव्हा खिडकीतून असं ढगाळलेलं अन् अंधारलेलं आभाळ दिसायला लागतं तेव्हा मी पडदे लावून घेतो आणि सगळे दिवे लावून टाकतो. मग कसं सगळं लखलखणारं आणि प्रकाशमान् होऊन जातं!

चिन्मय: पण हे स्वतःला फसवणं झालं. बाहेर वातावरण तसंच राहतं. ते तू बदलू शकत नाहीस.

अभिजीत: हो. पण आपल्याला समाधान.

चिन्मय: हा समजुतीचा भाग झाला—वास्तवाशी अगदी विपरीत!

इरा: अरे, चिन्मय, कशाला तात्त्विक वाद घालत बसलायस आत्ता? Just enjoy the trip!

(थोडा वेळ कोणीच बोलत नाही. केवळ विमानाच्या इंजिनाची घरघर. अचानक काळोख नाहीसा होतो आणि लख्ख सूर्यप्रकाश खिडक्यांतून आत येतो. काही पांढरे ढगही खिडकीतून दृश्यमान होतात.)

अभिजीत: ते पाहा पांढरे ढग. आता कसं छान वाटतंय्. मला असंच व्हायचंय्.

चिन्मय: म्हणजे?

अभिजीत: असंच उंच उंच जायचंय्—माझ्या करियरमध्ये. त्या पांढऱ्या ढगांसारखं—तेजानं तळपून जायचंय्.

चिन्मय: हसून. आता आहेसच की तू उंचावर. डीजीएम आहेस तू कंपनीमध्ये…

अभिजीत: पण मला अजून खूप वर जायचंय्. त्या पांढऱ्या ढगांसारखं.

चिन्मय: पण किती वर जाशील? त्यालाही मर्यादा आहेतच.

अभिजीत: ती मर्यादा येईपर्यंत. ते पांढरे ढग बघ—कसे तेजानं तळपतायत—इतक्या उंचीवर! म्हणूनच मला ते काळे-कभिन्न ढग आवडत नाहीत साले. अंधकार निर्माण करतात—darkness, melancholy.

चिन्मय: पण एक सांगू?

अभिजीत: काय?

चिन्मय: ते पांढरे ढग—सिर्रस ढग म्हणतात त्यांना. कुचकामी आहेत. काळे ढग—त्यांना निंबोस्ट्रेटस असं नाव आहे—तेच खरे कामाचे असतात.

अभिजीत? म्हणजे?

चिन्मय: हे काळे ढग—निंबोस्ट्रेटस—पाऊस पाडतात. धनधान्य पिकवात आणि भूमी सुजलाम्-सुफलाम् करतात. सिर्रस ढग—तुझे पांढरे अन् तेजस्वी ढग—नुसते दिखाऊ. काही उपयोग नाही त्यांचा!

अभिजीत: ते काहीही असू दे. माझी अँबिशन मला फार महत्त्वाची वाटते.

चिन्मय: अँबिशन जरूर असावी पण…

अभिजीत: पण काय?

चिन्मय: जाऊ दे. तुला पटायचं नाही ते.

अभिजीत: अरे, ते साहित्यात आणि रूपकात ठीक आहे, पण वास्तवात अँबिशन हीच तुम्हाला पुढं घेऊन जाते.

चिन्मय: आणि त्यासाठी काहीही करायची तयारी पाहिजे असंच तुझं म्हणणं आहे होय ना?

अभिजीत: परफेक्ट! तू आइन रँडच्या नॉव्हेल्स वाचल्यायस का? तिची फिलॉसॉफी सांगते की स्वार्थ वाईट नाही आणि आपल्या करियरकरता तो आवश्यक आहे.

चिन्मय: हे शंभर टक्के खरं नाही—कारण तिचं तत्त्वज्ञान objectivism बद्दल आहे. पण तू म्हणतोस तेही खरं आहे कारण तिनं स्वार्थाला नुसतंच उपयुक्त नव्हे तर मखरात नेऊन बसवलंय्. अर्थात् ही फिलॉसॉफी सर्वांना मान्य होईल असं नाही आणि मला तर नाहीच नाही.

इरा: आता पुरेऽऽ. पुरे तुमची तात्त्विक चर्चा. आपल्याला ट्रिप एंजॉय करायचीय्.

(प्रकाश हळूहळू मंद होत जातो.)

## प्रवेश ६

*(अभिजीतचं पॉश ऑफिस. अभिजीतसमोर चिन्मय बसला आहे.)*

अभिजीत: हं, काय बोलायचं होतं तुला माझ्याशी की जे टेलिफोनवर बोलण्यासारखं नव्हतं?

चिन्मय: नशीब, तू भेटलास. इतक्या वेळा ट्राय केलं पण तुझी सेक्रेटरी सारखी “ते बिझी आहेत” किंवा “ते मीटिंगमध्ये आहेत” असंच सारखं सांगत होती.

अभिजीत: (घड्याळाकडे बघत) हं, बोल लौकर काय बोलायचंय् ते. आत्ताही मला मीटिंगला जायचंय् पाचएक मिनिटात.

चिन्मय: ओके. हे बघ पंधरा दिवसांपूर्वी मी तुला सल्फामेथॉक्सॅझोल या आपल्या प्रॉडक्टबद्दल बोललो होतो—होय की नाही?

अभिजीत: (आठवल्यासारखं करून) अं, अं. हां आठवलं. मग? काय त्याच्याबद्दल?

चिन्मय: अरे, त्याचा रिॲक्शन टाइम रिड्यूस करायची मी आयडिया तुला सांगितली होती ना?

अभिजीत: आँ, हं. असेल, असेल.

चिन्मय: अरे मी आत्ताच आपल्या कंपनीच्या मासिकात वाचलं की त्या आयडियाबद्दल कंपनीनं तुला मोठं बक्षीस दिलंय आणि तुझं कौतुक केलंय्.

अभिजीत: हो का? मला माहीत नाही. मी—मला ते आपलं मासिक—क्युअरनेट न्यूज—वाचायला वेळच मिळत नाही.

चिन्मय: अरे, असं काय करतोयस? एवढं मोठं बक्षीस मिळालं तर तुला मॅनेजमेंटनं कळवलं असणारच की.

अभिजीत: (पुन्हा आठवल्यासारखं करून) हां, हां. आत्ता आठवलं. माझ्या सेक्रेटरीनं मला एक लेटर दाखवलं होतं—चेअरमनकडून आलेलं. काहीतरी बक्षीस मिळाल्याचा उल्लेख होता—

चिन्मय: हे बघ, अभिजीत. ती आयडिया माझी होती—माझी.

अभिजीत: मग?

चिन्मय: मग काय? खरं तर ते बक्षीस मला मिळायला हवं—कौतुक माझं व्हायला हवं पण…

अभिजीत: (घड्याळाकडे पाहत) हे बघ, चिन्मय, मला आता मीटिंगसाठी निघायला हवं…

चिन्मय: अभिजीत, माझं म्हणणं टाळू नकोस. तुला पक्कं माहीत आहे की ती आयडिया माझी होती आणि—आणि…

अभिजीत: आणि काय?

चिन्मय: आणि ती तू तुझ्या नावावर खपवून बक्षीस मिळवलंस; क्रेडिट घेतलंस.

अभिजीत: तुला, त्या बक्षिसातला वाटा हवाय् का?

चिन्मय: वाटा? खरं तर पूर्ण बक्षिसाचा आणि कौतुकाचा मीच धनी व्हायला पाहिजे.

अभिजीत: चिन्मय, चिन्मय. असा आततायी होऊ नकोस.

चिन्मय: तू मला आततायी म्हणतोयस्? मी फक्त माझ्या हक्काबद्दल बोलतोय्.

अभिजीत: अरे असं हक्क-बिक्क प्रोफेशनल जीवनात नाही चालत.

चिन्मय: पण मग तू असं का केलंस?

अभिजीत: असं म्हणजे कसं?

चिन्मय: अभिजीत, उगीच वेड पांघरून पेडगावला जाऊ नकोस. माझी आयडिया तू—तू का च-चोरलीस?

अभिजीत: चिन्मय, तू—तू माझ्यावर चोरीचा आरोप करतोयस्? अरे, आपण जुने मित्र. मी असं करीन का तुझ्या बाबतीत?

चिन्मय: तेच तर मला आश्चर्य वाटतंय्. आपली जुनी घट्ट मैत्री असताना तू असं का करावंस? खरं सांगायचं तर मैत्री असो वा नसो असं करताच कामा नये. धिस इज क्रिमिनल—इम्मॉरल!

अभिजीत: अरे चिन्मय, तू कधी सुधारणार रे? मोरॅलिटी वगैरे प्रोफेशनल जीवनात विसरून जावं लागतं.

चिन्मय: अभी, मला समजत नाहीये—तू असं का केलंस ते.

अभिजीत: (पुन्हा घड्याळाकडे पाहत आणि थोडा विचार करून) बरं सांगतो. हे बघ, तुझी आयडिया तू तुझ्या नावावर मॅनेजमेंटकडे पाठवली असतीस ना तर ती ॲक्सेप्ट झाली नसती. ती *मी* पाठवली म्हणून मान्य झाली.

चिन्मय: असं तू कशावरून म्हणतोस?

अभिजीत: अरे, अनुभवावरून. मी इथं—क्युअरनेटमध्ये इतकी वर्षं काढलीयत. मला ठाऊक आहे ना.

चिन्मय: अभी, हे तुझं कृत्य मला काही आवडलेलं नाही. क्युअरनेटची जर हीच संस्कृती असेल तर तू—ॲज अ सीनियर एक्झिक्युटिव्ह—बदलण्याचा प्रयत्न करायला हवा होतास.

अभिजीत: अरे ते इतकं सोपं नाहीये. अन् तुझं दुःख मी समजू शकतो—कारण तू माझा जुना मित्र आहेस. म्हणूनच मी तुला ही ऑफर देतोय्. आय कॅन अँड विल शेअर द ॲवॉर्ड विद् यू.

चिन्मय: (कडवटपणानं) आय रिजेक्ट युअर ऑफर. गुड बाय.

अभिजीत: अरे चिनू—चिन्मय—डोंट गेट अपसेट...

चिन्मय: तुला अर्जंट मीटिंगला जायचं होतं ना?

*(मागे वळून निघून जातो. अभिजीत अवाक् होऊन पाहतच राहतो.)*

## प्रवेश ७

*(अभिजीतचं घर. रात्रीची वेळ. जेवण करून अभिजीत आणि विशाखा बेडवर पडले आहेत. दोघांची चुळबूळ चालली आहे. प्रेक्षकांच्या समोर बेडरूमचा दरवाजा आहे. त्याला पडदा आहे.)*

विशाखा: अभी, तू हल्ली जेवत नाहीस फारसा आणि ड्रिंक पण जरा वाढलंय् तुझं.

अभिजीत: काय करणार, तू हल्ली कंपनी देत नाहीस ना.

विशाखा: हे तुझं ड्रिंक वाढण्याचं कारण होऊ शकत नाही. पूर्वी आपण आठवड्यातून एकदा ड्रिंक घ्यायला बसत होतो तेव्हा मी कंपनी देतच होते की तुला. पण आता तुझं रोजचंच झालंय्. एनीथिंग इन एक्सेस इज नॉट डिझायरेबल.

अभिजीत: काय करू मी? कंपनीतल्या कामाचं टेन्शनच इतकं असतं की...

विशाखा: आणि तुझं ड्रिंक वाढलेलं पाहिलं की मलाही टेन्शन येतं. मला एक असं लक्षात आलंय् की तुझा कलीग चिन्मय—तो कधी टेन्शनमध्ये नसतो. मागच्या पार्टीमध्ये मी त्याला विचारलं की कामानंतर तू काय करतोस? तर तो म्हणाला की मधून मधून ड्रिंक घेतो त्याच्या बायकोबरोबर—आपल्यासारखंच. पण इतर वेळी तो

वाचतो, लिहितो, संगीत ऐकतो किंवा चक्क त्याचे आवडते जुने हिंदी / मराठी किंवा हॉलिवुडचे सिनेमे पाहतो.

अभिजीत: हो, तो लिहितो हे मलाही माहीत आहे. मागे कंपनीमध्ये त्याचा एकदा सत्कारही झाला होता. पण त्याचं काय—तो मागे पडला आणि त्याची तत्त्वं वगैरे आड येतात त्याच्या करियरमध्ये. त्यामुळं तो पुढं जाणं कठीण आहे. आपण बरं की आपलं काम बरं अशी त्याची वृत्ती आहे. त्याला कसलं आलंय् टेन्शन!

विशाखा: कधी कधी असं वाटतं की चिन्मयसारखंच टेन्शन-फ्री जीवन असतं तर किती बरं झालं असतं…

अभिजीत: पण मग ही मौज-मजा, हा कंफर्ट—हे सगळं मिळालं नसतं.

विशाखा: काय चाटायचाय् तो कंफर्ट? अन् बदल्यात कायम टेन्शन…

विशाखा: हल्ली चिन्मय आणि इराबरोबर बरेच दिवसात काही बोलणं झालं नाही; पार्टी झाली नाही. त्या दोघांशी बोललं की बरं वाटतं.

अभिजीत: तुलाच पूर्वी त्यांच्याशी जास्त संबंध ठेवलेले आवडायचे नाहीत.

विशाखा: यू आर राइट अभी. पण मी विचार केला आणि असं लक्षात आलं की—दे डू नॉट हॅव एनी हँगअप्स. किती साधं आणि सरळ आहे त्यांचं लाइफ. मला पहिल्यांदा ते खोटं वाटायचं—कृत्रिम वाटायचं. पण नंतर लक्षात आलं की त्यांचं जीवनच असं आहे—सरळ, निर्मळ. समटाइम्स आय एन्व्ही देम.

अभिजीत: अग पण आपली आणि त्यांची लाइफ-स्टाइल वेगळी आहे.

विशाखा: अभी, मला हल्ली जास्तच टेन्शन यायला लागलंय्.

अभिजीत: तुला कसलं आलंय् टेन्शन?

विशाखा: अभी, मला विक्रमची काळजी वाटत्येय्—खूप काळजी वाटत्येय्…

अभिजीत: ती कसली?

विशाखा: आता हेच बघ ना—रात्रीचे अकरा वाजायला आले पण ह्याचा पत्ता नाही. जेवण-खाण कशाचीच शुद्ध नसते त्याला हल्ली.

अभिजीत: अग, तरुण आहे तो—गेला असेल मित्र-मैत्रिणींबरोबर मजा करायला.

विशाखा: अरे पण रोज?

अभिजीत: अग हे वयच आहे त्याचं मजा करण्याचं.

विशाखा: अभी, तू हे सगळं फार लाइटली घेतोयस्. अरे हे त्याचं अभ्यासाचंही वय आहे.

अभिजीत: अग, नाही त्यानं अभ्यास केला तर कुठं बिघडतंय्? पास झाला म्हणजे पुरे आहे. हे सगळं आपण त्याच्याचसाठी ठेवणार आहोत ना?

विशाखा: अरे, पण त्यानं नको का काही करायला?

अभिजीत: अग, विशू, काळजी करू नकोस. करेल तो सगळं जबाबदारीची जाणीव झाल्यावर.

विशाखा: तीच कधी होणारे कळत नाहीये मला. आणि हल्ली तर मला वेगळीच शंका यायला लागल्येय्.

अभिजीत: ती कुठली?

विशाखा: आ-आपला विकी ड्रग्जमध्ये तर इन्व्हॉल्व्ह झाला नाहीये ना?

अभिजीत: काय बोलत्येयस काय तू? ड्रग्ज? कशावरनं वाटतंय् तुला असं?

विशाखा: एके दिवशी तो बाहेरून परत आला तेव्हा त्याच्या तोंडाला सिगारेटचा वास येत होता.

अभिजीत: अग, हल्ली कॉलेजची मुलं ओढतात सिगारेट अधूनमधून. आम्हीही ओढत होतो कॉलेजमध्ये असताना... अगदी चिन्मयही ओढायचा आमच्याबरोबर कधी कधी.

विशाखा: अरे अभी, पण एके दिवशी मला त्याच्या पँटच्या खिशात एक पुडी सापडली—पांढऱ्या पावडरची. मी त्याला विचारलं तर मला विकीनं उडवाउडवीची उत्तरं दिली. मित्रानं खिशात टाकली असेल म्हणाला. कसली आहे असं विचारलं तर माहीत नाही म्हणाला.

अभिजीत: एवढ्यावरून तो ड्रग्जवर आहे असं तुला वाटलं? कमालच आहे तुझी.

विशाखा: अभी, अरे असं काय करतोयस्. डोळ्यादेखत मुलगा वाया जाऊ नये असं मला वाटतं. मला काळजी वाटते रे.

अभिजीत: हं.

विशाखा: खरं सांगू अभी, मला हे सगळं नकोसं झालंय्.

अभिजीत: सगळं म्हणजे?

विशाखा: म्हणजे—हे ऐश्वर्य, समृद्धी, हाय प्रोफाइल जगणं...

अभिजीत: मग? मग कसं लाइफ हवंय् तुला?

विशाखा: अगदी साधं.

अभिजीत: म्हणजे—म्हणजे चिन्मयसारखं?

विशाखा: (दूरवर पाहत) हां, हां. तसंच म्हणालास तरी चालेल. त्यांचं कसं छान चाललेलं दिसतं. नो फ्रिल्स—स्ट्रेट लाइफ.

अभिजीत: पण आता ते शक्य नाही. आपण आता अशा वळणावर आलोय् की मागं वळणं शक्य नाही. वुइ आर ॲट अ पॉइंट ऑफ नो रिटर्न.

विशाखा: खूप भीती वाटते रे. एके दिवशी हे आपलं सगळं कोलॅप्स होईल की काय असं भय वाटतं.

अभिजीत: विशू, काळजी करू नकोस. सगळं ठीक होईल.

विशाखा: हे बघ, साडे-अकरा वाजलेत आणि अजून हा मुलगा आला नाहीय्. काळजी करू नको तर काय करू?

अभिजीत: तुला सांगू, मी त्याच्या वयाचा होतो तेव्हा असंच करायचो. त्यामुळं मला त्यात काही वावगं वाटत नाही.

विशाखा: असंच म्हणजे कसं?

अभिजीत. हेच—म्हणजे मित्रांबरोबर ड्रिंक पार्टी. कधी-मधी आम्ही चरस, गांजा असलं देखील करायचो. पण तरी आत्ता आहे ना सगळं व्यवस्थित? वाया गेलो नाही. अग अशी तरुण वयात बंडखोरी करतातच मुलं. तू झोप आता. चिंता करत जागू नकोस. (दिवा मालवतो. रंगमंचावरील प्रकाश हळूहळू कमी होत जातो. काही काळ स्तब्धता. नंतर समोरच्या दरवाज्यातील पडद्यावर विक्रमची तोल जात चालत जात असल्याची आकृती. त्याची चाहूल लागून काही क्षणांनी विशाखाची बेडवर चुळबूळ.)

विशाखा: विक्रमऽऽ विक्रमऽऽ ए विकी... (स्वगत) हा काही ओ द्यायचा नाही. अभी म्हणतो तसं असेल तर ठीकच आहे पण भीती वाटते. अभीच्या वेळेला धाक दाखवणारं कुणीतरी असेल—वडीलधारे, टीचर किंवा peer pressure सुद्धा असेल कदाचित् म्हणून तो वाया गेला नसेल. विकीच्या बाबतीत काय? त्याला कुणाचाच धाक नाही…

*(विक्रम 'ओ' देत नाही. रंगमंचावर शांतता. विशाखा चुळबूळ करीत झोपी जाते.)*

## अंक पहिला

### प्रवेश ८

*(बागेतील एक बाक आहे. नेहा तरातरा चालत आहे आणि मागोमाग विक्रम तिला गाठण्याचा प्रयत्न करतो आहे. बाकाच्या जवळ आल्यावर तो तिला खांद्याला धरून बाकावर बळेच बसवतो. तीही नाइलाजानं बसते.)*

विक्रम: नेहा, व्हॉट इज द प्रॉब्लेम?

नेहा: व्हॉट प्रॉब्लेम?

विक्रम: हे बघ नेहा, वेड पांघरून पेडगावला जाऊ नकोस. आजपर्यंत तीन-चार वेळा आपण बाहेर भेटलो किंवा दिसलो एकमेकांना. प्रत्येक वेळी तू हसून "हाय", "हॅलो" केलंस. अन् आजच काय झालंय् तुला? खरं तर मी तुला कॉफी प्यायला चल म्हणणार होतो पण तू थांबायलाच तयार नाहीस. शेवटी मी बाइक मागच्या चौकातच ठेवून तुझ्या मागं धावतोय्.

नेहा: काही नाही. मला तुझ्याशी बोलायचं नाहीय्.

विक्रम: पण का? परवापर्यंत तो हसून रिस्पॉन्स देत होतीस अन्...

नेहा: आता नाही.

विक्रम: पण का?

नेहा: हा प्रश्न तू स्वतःलाच विचारून पाहा. आस्क युअरसेल्फ.

विक्रम: तेच तर कळत नाहीय्. डोंट टॉक इन पझल्.

नेहा: जरा आठवून पाहा. आज सबंध दिवसात या यूथ फेस्टिव्हलमध्ये काय-काय केलंस ते.

विक्रम: काय-काय केलं ते तुला माहीत आहे. कॉलेज आयडॉलमध्ये रनर-अप झालो. मग माझी मुलाखत झाली. आणि मग—मग काही नाही. थोडं-फार सेलिब्रेशन—दंगा मस्ती…

नेहा: थोडं-फार?

विक्रम: हां—येस्. अग हे चालतंच.

नेहा: अरे, मुलाखतीत तू सांगितलंस की तू शाळेत सगळ्या क्षेत्रात पुढं होतास. मला आता सांग मग आता का तू चांगला वागत नाहीस? ती मारामारी…

विक्रम: ती दंगामस्ती तू एवढी का सीरियसली घेत्येयस्?

नेहा: सीरियसली घेऊ नको तर काय सोडून देऊ? तू अन् तुझ्या मित्रांनी दारू पिऊन बाटल्या फोडून मारामारी केलीत. आणि कुणाशी तर त्या मिस्टर युनिव्हर्सिटी झालेल्या मुलाशी आणि त्याच्या मित्रांशी? यू कुड हॅव किल्ड समवन्… (विक्रमला तसाच सोडून चालती होते.)

## अंक पहिला

### प्रवेश ९

*(चिन्मयचं घर. चिन्मय वाचत बसला आहे. आतून इरा हात पुसत पुसत येते.)*

इरा: काय वाचतोयस् चिनू?

चिन्मय: चिनू? त्या अभिजीतचं वारं लागलेलं दिसतंय् थायलँडमधे. त्यांचं नाही का सारखं चाललं होतं अभी, विशू, विशू, अभी. बोल इरू—नाही, नाही इरा हेच छान आहे.

इरा: मी म्हटलं काय वाचतोयस्?

चिन्मय: काऽही नाही. नुस्तंच चाळतोय् आपलं काहीतरी. वाचण्यापेक्षा वाचतोय् की नाही हे महत्त्वाचं आहे सध्या.

इरा: म्हणजे? समजले नाही मी!

चिन्मय: सांगतो. अग ऑफिसात मधे काय झालं माहित्येय् का? माझी एक आयडिया मी अभिजीतबरोबर शेअर केली होती. ती त्यानं स्वतःची म्हणून मॅनेजमेंटला सादर केली. मी त्याच्याशी भांडलो तर म्हणतो कसा की माझी म्हणून ती पुढं गेली असती तर रिजेक्ट झाली असती. त्याच्या नावावर गेल्यामुळं ती accept झाली म्हणे. म्हंजे माझं क्रेडिट गेलं ना? मी भांडून बाहेर आलो खरा पण बॉस लोकांशी असा पंगा घेतल्यामुळं अनेक लोक बाहेर गेलेत. माझंही तसंच व्हायचं. म्हणून म्हणतो मी वाचतोय् की नाही हे माहीत नाही.

इरा: मला नाही वाटत तुला काही धोका आहे म्हणून. गेल्या कित्येक महिन्यात तू खूप चांगलं काम केलंयस्. त्याचा तुला फायदा होईलच—मला तर वाटतंय् की तुला आता लौकरच प्रमोशन मिळेल. अभिजीत तसा चांगला आहे. काही मजबूरी म्हणून त्या आयडियाबद्दल त्यानं तसं केलं असेल पण मला नाही वाटत तो तुझ्याशी वाईट वागेल असं.

चिन्मय: बघू या.

(तितक्यात नेहा आत येते. पर्स भिरकावून देते आणि दिवाणवर मटकन् बसते.)

इरा: काय ग नेहा, काय झालं. अशी कावल्येयस् का?

नेहा: काही नाही गं—तो विकी—विक्रम…

इरा: त्याचं काय?

नेहा: अग तो माझा तसा चांगला मित्र आहे. पण…

इरा: पण काय?

नेहा: पण तो—तो जरा वाह्यात आहे.

इरा: (तोंडाचा आ वासून) अग बाई… म्हणजे त्यानं तुला काही…

नेहा: (किंचित् स्मित करून आणि हाताचे पंजे दाखवीत) नाही, तसं तुला वाटतंय् तसं काऽही झालेलं नाही.

इरा: हुश्श. मग काय झालं? काय वाह्यातपणा केला त्यानं? (चिन्मय जवळ येतो आणि तिच्याशेजारी बसतो.)

नेहा: अगं तो कॉलेज आयडॉल कॉंटेस्टमधे रनर अप झाला. त्यानं त्याच्या मित्रांसोबत धुमाकूळ घातला. ते सगळे दारू प्याले अन् नंतर मारामारी झाली. हा सगळ्यात पुढं होता. मग माझ्या मागं आला. मी त्याला चांगला सुनावला अन् त्याला तसाच सोडून घरी आले.

इरा: अग बाई. तू जपून राहा हं.

चिन्मय: आय ॲम शुअर यू नो बेटर. तू तुझे निर्णय घेण्याइतकी सक्षम आणि सज्ञान आहेस.

नेहा: आई, मी काही आता लहान नाहीये आणि मला भलं बुरं कळतं. बाबा म्हणतात त्याप्रमाणे माझे निर्णय घ्यायला मी सक्षम आहे.

चिन्मय: दॅट्स माय बेबी.

इरा: अगदी तुमचा वरदहस्त आहे तिच्यावर. तुमच्यावरच गेल्येय् ही पोर.

नेहा: आई मी पोर नाहीये. आय ॲम अ ग्रोन अप गर्ल.

चिन्मय: देअर यू आर.

इरा: मला काही कळतच नाही. तू तिला बेबी म्हटलेलं चालतं पण मी पोर म्हटलेलं चालत नाही.

चिन्मय: तुला नाही कळायचं ते. (नेहा आत जाते.)

इरा: चिन्मय, तुला एका बाजूनं स्वतःच्या करियरची चिंता आहे पण स्वतःच्या मुलीची चिंता नाही. किती चमत्कारिक आहे हे.

चिन्मय: यू नो, शी इज अ स्मार्ट गर्ल. ईव्हन स्मार्टर दॅन आय…

## अंक पहिला

### प्रवेश १०

*(अभिजीतचं पॉश ऑफिस. अभिजीतसमोर चिन्मय बसला आहे.)*

चिन्मय: येस बॉस? मला बोलावलंत तुम्ही?

अभिजीत: हे काय चिन्मय? हे बॉस वगैरे खूळ कुठून काढलंयस्?

चिन्मय: हे मी काढलं नाहीये—तू—तुम्हीच काढलंय्.

अभिजीत: ते कसं काय बुवा?

चिन्मय: माझ्याऐवजी तुमच्याकडून मॅनेजमेंटला आयडिया गेली तर ती मान्य होते हे जेव्हा कळलं तेव्हापासूनच हे नातं निर्माण झालंय्.

अभिजीत: ओ हो... अजून तेव्हाचा राग गेला नाहीये वाटतं.

चिन्मय: इथं राग-लोभाचा प्रश्न नाही. इथं आपलं नातं व्यवस्थापक आणि त्याच्या हाताखालचा अधिकारी असं आहे—आणि लेट अस बी ट्रू टु दॅट.

(अभिजीत खुर्चीवरून उठतो आणि चिन्मयसमोर उभा राहतो.)

अभिजीत: मी तुझा रोष समजू शकतो पण माझी एक विनंती आहे—झालं गेलं गंगेला मिळालं. आपलं नातं पूर्वीसारखंच मित्रत्वाचं राहावं अशी माझी इच्छा आहे.

चिन्मय: आणि माझ्या इच्छेचं काय?

अभिजीत: तूच सांग, तुझी क्षमा मागू की पाय धरू?

चिन्मय: असलं काहीही करू नकोस. पण अशी वेळ पुन्हा आणू नकोस.

अभिजीत: ओके. डन्.

चिन्मय: ज्या क्षणी तू असलं काही आपल्या नात्याला तडा देणारं करशील त्या क्षणी आपलं मित्रत्वाचं नातं संपलं म्हणून समज.

अभिजीत: अंडरस्टँड. नाउ लेट अस हॅव सम कॉफी.

चिन्मय: ओके.

(टेलिफोन करून कॉफी मागवतो.)

अभिजीत: अरे सध्या मी भलताच टेन्शनमध्ये आहे रे.

चिन्मय: टेन्शन? कसलं टेन्शन?

अभिजीत: अरे एक मोठा प्लॅन आहे—एका नव्या फॉर्म्युलेशनचा. सध्या थ्रॉंबॉसिसचं प्रमाण खूप वाढलंय् ना?

चिन्मय: मग त्याचं काय?

अभिजीत: अरे त्याचे प्रयोग चाललेयत. हेपॅरिन आणि मॉर्फिन यांचं मिश्रण आणि जमलं तर अॅट्रोपिनबरोबर सुद्धा. आलं का लक्षात?

चिन्मय: हेपॅरिन अँटिकोअॅग्युलंट म्हणजे रक्ताच्या गुठळया न होऊ देणारं ना?

अभिजीत: आणि मॉर्फिन पेन-किलर

चिन्मय: अॅट्रोपिन तर नर्व्ह ब्लॉकिंग एजंट आहे.

अभिजीत: काय झालंय्, हल्ली डॉक्टर लोकांना वेगवेगळी इंजेक्शन्स देण्यापेक्षा तयार मिश्रणं द्यायला आवडतात. त्यांचंही बरोबर आहे. त्यांचं काम सुकर होतं.

चिन्मय: अरे पण एकाच टाइपचं मिश्रण अनेक रुग्णांना कसं चालेल?

अभिजीत: तीच तर गोची आहे. वेगवेगळ्या प्रकारची मिश्रणं तयार करून दिली की त्यांच्या उड्या पडतील.

चिन्मय: अरे पण कंपॅटिबिलिटी नको का बघायला? मिश्रण घातक ठरलं तर?

अभिजीत: अरे ते चेक झालंय्. मिश्रणामध्ये एकामुळं दुसऱ्यावर काहीही अपायकारक परिणाम होत नाही असं संशोधन प्रसिद्ध आहे. पण—

(तेवढ्यात कॉफी येते. दोघं कॉफी घेऊ लागतात.)

चिन्मय: पण काय?

अभिजीत: हेपॅरिन आणि अॅट्रोपिन बाजारात फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. जे उपलब्ध आहे ते अवाच्या सवा किंमतीला आणि हमीचं नाहीय्.

चिन्मय: मग जेव्हा पुरवठा सुरळीत होईल तेव्हाच उत्पादन करावं ना?

अभिजीत: नाही रे. सध्या मागणी भलतीच तेजीत आहे. तू शेअर बाजार बघतोस की नाही?

चिन्मय: नाही बाबा. तो आपला प्रांत नाही.

अभिजीत: अरे, आपण अशी मिश्रणं बाजारात आणतोय् या नुसत्या बातमीनं—खरं तर अफवेनं, कारण आपण असं कुठलंही निवेदन दिलेलं नाही—क्युअरनेट फार्मास्युटिकल कंपनीचे शेअर्स गगनाला जाऊन भिडलेत. माझ्याकडे बरेच शेअर्स आहेत—आता विकले

तर-तर खूप फायदा होईल. (कॉफीचा जोरदार घुटका घेतो आणि समाधान दर्शवतो.)

चिन्मय: मग विकून टाक ना… (चिन्मयही कॉफी संपवतो.)

अभिजीत: छे, वेडा आहेस का? अरे ते अजून वर जातील तेव्हा बघू.

चिन्मय: अजून कसे वर जातील?

अभिजीत: आपलं मिश्रणाचं उत्पादन सुरू झालं की!

चिन्मय: अरे पण रॉ मटेरियल सप्लाय होत नाहीये ना?

अभिजीत: ते बघू रे—काही तरी मार्ग काढूच. वरच्या साहेबांनी चॅलेंज दिलाय् मला.

चिन्मय: वरच्या साहेबांनी?

अभिजीत: इतका कसा रे तू भोळा? अरे आपले चेअरमन आणि एमडी आहेत ना त्यांनी…

चिन्मय: ओ हो.

अभिजीत: तेव्हा तुलाही खूप काम आहे—आणि मलाही… आय ॲम रिलाइंग ऑन यू.

चिन्मय: ऑफ कोर्स. (उठतो आणि निघतो.)

अभिजीत: वन मोअर थिंग.

चिन्मय: काय?

अभिजीत: हे आपल्यातलं संभाषण कुणालाही कळता कामा नये बरं का?

चिन्मय: येस…

## अंक पहिला

### प्रवेश ११

*(बागेमधील बाकावर नेहा वाचत बसली आहे. थोड्या वेळानं तिथं विक्रम येतो.)*

विक्रम: हॅलो! काय चाललंय्?

(नेहा नुसतीच मान डोलावते. बोलत नाही.)

विक्रम: अजून राग गेला नाही वाटतं?

नेहा: आणि कधीही जाणार नाही.

विक्रम: अगदी क्षमा मागितली तरी?

नेहा: अं हं.

विक्रम: पण का? काय केलं असं मी?

नेहा: आपलं मागच्या वेळेचं संभाषण आठवून बघ.

विक्रम: (डोक्याला बोट लावून विचार करीत) हां ते आपलं बोलणं झालं होतं कॉलेज आयडॉल पेजंटनंतर झालेल्या सेलेब्रेशनबद्दल ते होय?

नेहा: हं. तेच ते.

विक्रम: अजून विसरली नाहीस तू?

नेहा: नाहीच विसरणार.

विक्रम: पण मी क्षमा मागायला तयार आहे ना.

नेहा: तुला माझी मैत्री हवी असेल तर…

विक्रम: तर काय?

नेहा: तुला हे सगळं बंद करावं लागेल?

विक्रम: म्हणजे?

नेहा: हेच दारू पिऊन मारामाऱ्या करणं वगैरे.

विक्रम: म्हणजे ड्रिंक पण घ्यायचं नाही?

नेहा: अरे, मौज म्हणून घेतलेलं—आय कॅन अंडरस्टँड. पण वाहावत जाऊन मारामारी…

विक्रम: ओके. ओके. नाही करणार तसलं काही. प्रॉमिस.

नेहा: सो यू व्हॅल्यू माय फ्रेंडशिप.

विक्रम: ऑफ कोर्स.

नेहा: ठीक आहे.

विक्रम: मागल्या वेळेस तू इथंच आली होतीस. तुझी आवडती जागा दिसत्येय्.

नेहा: येस. इथं कसं सगळं शांत—सिरीन आहे. कधी कधी अभ्यासाला आणि वाचन करायला पण येते मी इथं.

विक्रम: बरं झालं कळलं ते.

नेहा: काऽऽय?

विक्रम: काही नाही. काही नाही.

(काही वेळ कोणीच बोलत नाही. पुन्हा विक्रमच बोलतो.)

विक्रम: ए नेहा, कॉफी प्यायला जाऊ या का?

नेहा: अंहं. नको. त्यापेक्षा इथंच बोलू.

विक्रम: ओके. (बाकावर तिला चिकटून बसायला लागतो. नेहा त्याच्याकडे एक तीव्र कटाक्ष टाकते. विक्रम गडबडतो आणि अंतर राखून बसतो.) नेहा, तुला छंद काय आहेत?

नेहा: (स्मित करते.) खास असे काही नाहीत—वाचन, ट्रेकिंग, म्युझिक.

विक्रम: अरे वा. निदान दोन तरी छंद कॉमन आहेत.

नेहा: कुठले?

विक्रम: ट्रेकिंग आणि म्युझिक.

नेहा: मला असं जंगल, डोंगर-दऱ्यांमधून हिंडायला आवडतं.

विक्रम: मी टू. पुढच्याच महिन्यात आमच्या ग्रुपचा ट्रेक आहे उत्तराखंडमध्ये. येशील का तू?

नेहा: बघते. बाबांना विचारलं पाहिजे.

विक्रम: पण नक्की विचार हं. आणि म्युझिकचं काय? कुठलं आवडतं?

नेहा: (एकदम आनंदून) पण मला जुनी गाणी आवडतात. वेस्टर्नमध्ये बॉबी डॅरिन, फ्रँक सिनात्रा, कॉनी फ्रान्सिस, बीटल्स तसंच सेलिन डिऑन. अलीकडची मेलडी असलेली काही आवडतात पण नुसती बीट असलेली नाही आवडत फारशी.

विक्रम: वा, वा. छानच. माझीही आवड तशीच आहे. पण मला बीटची पण आवडतात.

नेहा: हे बघ उगीचच आपली आवड सारखी असल्याचं दाखवू नकोस. मला माहित्येय् मुलं पटवा-पटवी करण्यासाठी काय-काय आयडिया करतात ते.

विक्रम: अग खरंच. (गाऊ लागतो) Let's forget about tomorrow. For tomorrow never comes. याच्यातली गंमत माहित्येय् का?

नेहा: काय?

विक्रम: डोमानी असा शब्द आहे गाण्यात.

नेहा: हो. माहित्येय् का त्याचा अर्थ?

विक्रम: नाही.

नेहा: हा इटालियन शब्द आहे.

विक्रम: मग त्याचा अर्थ टुमॉरो असाच असला पाहिजे. कारण डोमानी नेव्हर कम्स असंही म्हटलंय् गाण्यात आणि टुमॉरो नेव्हर कम्स असंही म्हटलंय्.

नेहा: अगदी बरोबर. अन् सेलिन डिऑनचं प्रसिद्ध गाणं ऐकलंयस्?

विक्रम: (गाणं गुणगुणतो) Near, far, wherever you are / I believe that the heart does go on / Once more you open the door / And you're here in my heart and my heart will go on and on…

नेहा: (गुंगून जाते. तन्मय होऊन तंद्रीत जाऊन तीही गाऊ लागते) and my heart will go on and on… (तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. विक्रमचं त्याकडे लक्ष जातं.)

विक्रम: (गाणं थांबवून) नेहा हे काय? (नेहा भानावर येते. झट्कन डोळे पुसते.)

नेहा: हं... काही नाही. अरे हे गाणं ऐकलं की मला ना रडूच यायला लागतं.

विक्रम: Really the heart does go on.

नेहा: (हसते. विक्रमही हसतो.) काही गाणी ना अगदी हृदयाला भिडतात. काही हिंदी आणि मराठी गाणी पण माझ्या अंतःकरणात शिरतात.

विक्रम: (सरकून जवळ बसतो) कुठली?

नेहा: बरीच आहेत. महंमद रफी, मुकेश, तलत आणि लताची काही गाणी अगदी हृदय हलवून सोडतात.

विक्रम: मग म्हण की एखादं.

नेहा: ए, मला म्हणता-बिणता येणार नाही हं.

विक्रम: मग गुणगुणून तरी दाखवशील की नाही?

नेहा: हं. (आठवण्याचा प्रयत्न करते आणि गुणगुणू लागते.) *एहसान तेरा होगा मुझपर दिल चाहता है वो कहने दो मुझे...*

विक्रम: वा लाजवाब. (तोही गुणगुणू लागतो) *तुमसे मुहब्बत हो गयी है तो पलकोंके ख्वाबमें रहने दो...*

नेहा: खरंच तुझ्या नि माझ्या म्युझिकमधल्या आवडी-निवडी सारख्या आहेत. पण...

विक्रम: आता पण काय?

नेहा: अशी मेलडी आवडणारी मंडळी खरं तर मनस्वी—म्हणजे इमोशनली सेन्सिटिव्ह असतात अन् तू तर—

विक्रम: मी तर काय?

नेहा: अँबिशस आहेस असं म्हणतोस…

विक्रम: मग?

नेहा: अरे असं काय करतोस? हे जुळत नाहीय्. मॅच होत नाही.

विक्रम: अग हे असंच आहे. डॅड म्हणतात—Ambition is the key to success.

नेहा: ते खरं आहे काही अंशी पण प्रयत्न तर करायला पाहिजेतच—अभ्यासही हवा. या सगळ्या छंदाच्या गोष्टी नंतर.

विक्रम: डॅड म्हणतात—काही काळजी नकोय्. तुझी सोय करण्याइतकी माझी पोच आहे. You know he has connections with top people.

नेहा: पण तू स्वतंत्र विचार करायला कधी शिकणार—की कायम under your dad's shadow?

विक्रम: डॅडनी एवढं कमावून ठेवलंय् की ते म्हणतात मी काही नाही केलं तरी चालेल.

नेहा: मग तू काहीच करणार नाहीस का?

विक्रम: ओ नो. तसं नाही. मी होईन ग्रॅज्युएट कसाही. मग डॅड मला एक बिझनेस काढून देणार आहेत.

नेहा: कसला बिझनेस?

विक्रम: काही प्रॉडक्टसची एजन्सी. त्यांच्याच हातात आहे सगळं.

नेहा: अरे पण तू स्वतः धडपड करून काही करू इच्छित नाहीस का?

विक्रम: ओ येस. सगळं मी स्वतःच धडपड करून मिळवणारे. सुरुवातीला डॅडचं हँडहोल्डिंग असणाराय्.

नेहा: (सुस्कारा सोडते) हं. काहीतरी चुकतंय्. नॉट अ गुड आयडिया...

विक्रम: काही म्हणालीस का?

नेहा: अंहं.

विक्रम: पण आत्ता मला तुझं हँडहोल्डिंग हवंय्. (तिचा हात हातात घेतो. नेहाही त्याच्या हातावर आपला हात ठेवते.)

## प्रवेश १२

*(चिन्मयचं ऑफिस. रसायनांच्या बाटल्या आणि उपकरणं बाजूच्या टेबलावर आहेत. चिन्मय टेबलासमोर खुर्चीवर बसलेला. टेबलावर काही कागदपत्रं. चिन्मय कागदपत्रं चाळत बसला आहे. तेवढ्यात दारावर टकटक.)*

चिन्मय: (दाराकडे पाहत) ओ हो कोरडेसाहेब, या ना. आत या ना. (कोरडे येतात आणि समोरच्या खुर्चीत बसतात. कोरड्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्य.)

कोरडे: मि. खरे, तुम्ही हे काय चालवलंय्?

चिन्मय: कोरडेसाहेब, मी समजलो नाही—जरा स्पष्ट बोलाल का?

कोरडे: ओके. स्पष्टच बोलतो. खरे, तुम्ही तो मागचा पायोनियर केमिकल्समधून आलेला लॉट रिजेक्ट केलात. आणि आपल्या कंपनीचं नवीन फॉर्म्युलेशन आहे त्याचं पण सँपल तुम्ही रिजेक्ट केलंय्. काय चालवलंय् काय तुम्ही हे? अशानं कंपनी कशी पुढं जाणार? नव्या फॉर्म्युलेशनमुळं कंपनीचा केवढा मोठा फायदा होणाराय् ते माहीत आहे ना तुम्हाला? का खोडा घालताय् तुम्ही?

चिन्मय: कोरडेसाहेब मला आश्चर्य वाटतंय्—तुम्ही माझं कौतुक करण्याऐवजी माझी कानउघाडणी करताय्. अहो, मी काही वैयक्तिक कारणांसाठी नाही ती सँपल्स रिजेक्ट केली. त्यात खरोखरच कमतरता होती म्हणून ती रिजेक्ट केल्येयत.

कोरडे: पण कंपनीचा प्रॉजेक्ट रखडला ना त्यामुळं.

चिन्मय: मग कंपनीचा प्रॉजेक्ट वेळेवर पुरा व्हावा म्हणून अ‍ॅक्सेप्ट करू का चुकीचं फॉर्म्युलेशन? प्रॉडक्टची क्वालिटी काय राहील मग?

कोरडे: मि. खरे, या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकत नाही. मला फक्त एवढंच कळतं की तुम्ही कंपनीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये खीळ घालताहात.

चिन्मय: कोरडे सर, तुम्ही माझे म्हणजे पर्यायानं क्वालिटी फंक्शनचे बॉस—वरिष्ठ अधिकारी—आहात मग क्वालिटीच्या बाबतीत तुम्ही असे कोरडे कसे राहू शकता?

कोरडे: काय म्हणालात?

चिन्मय: काही नाही. म्हणजे मला असं म्हणायचंय् की तुम्हीसुद्धा क्वालिटीला बांधील आहात. म्हणून अशा संघर्षात खरं तर तुम्ही माझ्यामागे भक्कमपणे उभं राहायला हवं.

कोरडे: (इकडे तिकडे पाहत) कंपनीचे प्रकल्प सुरळीतपणे चालले पाहिजेत—याची जबाबदारी तुमच्यावरही आहे मि. खरे.

चिन्मय: सॉरी सर. मी पायोनियर कंपनीकडून आलेली रसायनं दोनदा तपासून पाहिली आहेत. त्यात त्रुटी आहेत आणि प्रॉडक्शनचं सँपलही रीचेक केलेलं आहे. ही दोन्ही रिजेक्ट करण्याशिवाय मी काही करू शकत नाही.

कोरडे: (संतापानं उठून उभे राहत) यू आर डिफाइंग मी—इनसबॉर्डिनेशन... मि. खरे तुम्हाला याचे परिणाम भोगावे लागतील. (जातात.)

चिन्मय: (टेबलावर मूठ आपटीत) कंपनीसाठी चांगलं आणि काहीतरी उपयोगी करावं तर असे कोरडे पडतात. एनी वे—आपण आपल्या मार्गानं चालत राहावं—एकला चलो रे.

## अंक पहिला

### प्रवेश १३

*(एक तंबू—नेहा तिच्या मैत्रिणीबरोबर हा तंबू शेअर करत्येय्. नेहा चुळबुळते आहे. तंबूतल्या मंद प्रकाशात ती पुस्तक वाचत्येय् आणि तिची मैत्रीण शेजारीच झोपली आहे असं सावल्यांवरून प्रेक्षकांना दिसत आहे. तंबूचं झापड बाजूला करून किंचित् धडपडत विक्रम आत जातो. आता केवळ आवाज आणि सावल्यांनी दृश्य साकार होत आहे.)*

विक्रम: (काहीशा अस्पष्ट आणि धुंदलेल्या आवाजात) हाय नेहा, झोपली नाहीस अजून?

नेहा: (नाखुषीच्या स्वरात) नाही.

विक्रम: म-मग चल ना बाहेर—किती छान वातावरण आहे बाहेर—श-शांऽऽत.

नेहा: अरे, बाहेर थंडी आहे.

विक्रम: अग पण आ-आपण शेकोटी पेटवून बसूयात. मऽऽस्त. रूप तेरा मस्ताना…

नेहा: काऽऽय? हे बघ कोमल इथं झोपल्येय्. तिला डिस्टर्ब होतंय्. मी शाल पांघरते आणि आपण टेंटबाहेर बोलू.

विक्रम: (गडबडून जात) प-पण नेहा—चल ना लांब कु-कुठं तरी. बाकी सगळे-सगळे बघ क-कशी मजा करतायत्.

नेहा: हे बघ विक्रम, मी लांबवर मुळीच येणार नाही. (नेहा शाल पांघरते. ती आणि विक्रम बाहेर येतात. नेहा एका खडकावर बसते)

विक्रम: (धडपडत तिच्या शेजारी बसत तिला कवेत घेण्याचा प्रयत्न करतो.) ए च-चल की. नाही, नाही क-का म्हणत्येयस्? आत्तापर्यंत त-तर सगळं ठीक होतं क-की. म-मग आत्ताच...

नेहा: (विक्रमकडे रोखून बघत) आत्तापर्यंत सगळं ठीक होतं?

विक्रम: हं-हां.

नेहा: हे बघ विक्रम, यू आर नॉट इन युअर सेन्सेस. यू आर ऑन अ हाय. काय घेतलंयस् तू?

विक्रम: क-क-काही नाही—घेतलीय् आपली थोडीशी उगाच?

नेहा: थोडीशी? उगाच? आणि तू नुसतंच ड्रिंक घेतलं नाहीयेस्... तुझ्या त्या दाढीवाल्या मित्राबरोबर... ती कसली पावडर हुंगत होतास? ती तिथे हुंगलीस आणि इथं काय हुंगायला आलायस्?

विक्रम: ए-ए—क-कायतरी काय बोलत्येयस्?

नेहा: नाहीतर काय? तुला झिंग आल्येय् आणि तू इथं धडपडत आलायस् तर याचा अर्थ काय? यू आर ऑन अ मिश्चीफ...

विक्रम: नाही ग. नो, नो... आ-आय जस्ट वाँटेड टु—टु

नेहा: व्हॉट डिड् यू वाँट टु डू...

विक्रम: (तिच्याजवळ तोंड नेत) कमॉन नेहा—डोंट बी नाईव्ह. एव्हरी—एव्हरीबडी इज एंजॉइंग अ-आउट देअर.

नेहा: ओ नो. विक्रम, तू चांगलीच घेतल्येयस. यू आर नॉट इन युअर सेन्सेस.

विक्रम: फ-फरगेट इट. तू येत्येस क-की नाही?

नेहा: नो. आय हेट जंकीज.

विक्रम: कमॉन नेहा. आ-आय जस्ट जस्ट टेस्टेड इट—नथिंग म-मोअर.

नेहा: नाही. विक्रम, तू काय प्रॉमिस केलं होतंस आठवतंय्?

विक्रम: हो. दारू पि-पिऊन वाहवत ज-जाणार नाही म-म्ह णू न.

नेहा: मग?

विक्रम: तूच म्हणाली हो-होतीस की मजा करा-करायला म्हणून घ्यायला ह-हरकत नाही.

नेहा: पण ही तू घेतल्येयस् ना ती मजा म्हणून नाहीये. यू आर ड्रंक. आणि ड्रग्ज? नेव्हर. आय विल नॉट टॉलरेट दॅट.

विक्रम: अग पण—ते सुद्धा मी ज-जस्ट गंमत म्हणून—म्हणून…

नेहा: लुक. ते मला अजिबात चालणार नाही—इफ यू वाँट माय फ्रेंडशिप.

विक्रम: ओके. अ-आय ॲग्री. आ-आता तर चल-चलशील न-ना?

नेहा: नो—अ बिग नो.

विक्रम: पण आता आता तर म-मी कबूल केलंय् न-ना तू म्हणत्येयस् त-त्याप्रमाणं मग…

नेहा: तू जेव्हा पूर्ण शुद्धीवर असशील ना तेव्हाच मी तुझ्याबरोबर येईन—समजलं?

विक्रम: ओ—यू आर डी-डी-डिक्टेटिंग. तू क-कशी येत ना-नाहीस ते ब-बघतोच मी.

नेहा: काय करणारेस?

विक्रम: त-तुला ओ-ओढून घ-घेऊन जा-जाणारेय् म-मी. (हेलपांडत उठतो)

नेहा: ट्राय इट.

(विक्रम तिला ओढण्याचा प्रयत्न करतो. नेहा त्याला ढकलते. विक्रम खाली पडतो पण कसाबसा उठतो. नेहाकडे डोळे विस्फारून काही वेळ पाहतो आणि हेलपांडत निघून जातो. नेहा काही वेळ तशीच बसून राहते. हुंदके देते आणि तंबूत परत जाते.)

नेहा: (स्वतःशीच) आय हेट हिम! आय हेट हिम! आय हेट हिम! (डोळे पुसत) बट आय ऑल्सो लव्ह हिम!!

## प्रवेश १४

*(चिन्मय त्याच्या ऑफिसमध्ये बसलेला आहे. रिपोर्ट चाळत आहे.)*

चिन्मय: आता हा प्रॉडक्शनमधल्या सँपलचा रिपोर्ट. यातही हेपॅरिन आणि ॲट्रोपिनचं प्रमाण खूप कमी आहे. रिपोर्टमधेही काही चूक दिसत नाहीये. मग प्रॉडक्शन चालू कसं आहे? काहीतरी घोळ दिसतोय्. प्रॉडक्शन सुपरवायझरला फोन करून जाब विचारलाच पाहिजे.

(फोन लावतो)

हॅलो कोण नाईक का? अहो मी प्रॉडक्शन सँपल चेक केलंय्. माझ्या हातात रिपोर्ट आहे आत्ता. हेपॅरिन आणि ॲट्रोपिन दोन्हीचं प्रमाण कमी असताना तुम्ही प्रॉडक्शन कसं चालू ठेवलंयत?

(थोडा वेळ ऐकतो)

अहो असं कसं शक्य आहे. मी प्री-प्रॉडक्शन सँपलही चेक केलं आहे. त्याच्यातही या दोन्हींचं प्रमाण खूपच कमी आहे. माझ्याकडे रिपोर्टदेखील आहे... काय म्हणताय्? तुमच्याकडे ओके रिपोर्ट आहे? माझ्या सहीचा? अहो कसं शक्य आहे? मी दोनदा सँपल चेक केलंय्—कोरडेसाहेबांना फोनवर सांगितलंय् आणि रिपोर्ट पाठवलाय् देखील माझ्या सहीचा. बघा, बघा. तुमच्याकडचा रिपोर्ट काढून पुन्हा एकदा बघा.

*(फोन कानाला लावून थांबतो. टेबलावरच्या कागदांशी चाळा करीत राहतो.)*

काय माझ्या सहीचा ओके रिपोर्ट आहे? अहो कसं शक्य आहे? मी स्वतः... बरं बरं... मी तुमच्या ऑफिसमधे येऊन जाईन थोड्या वेळानं.

(कपाळावर हात मारून घेतो.) काही तरी घोळ आहे. नक्कीच कुठंतरी पाणी मुरतंय्. छडा लावला पाहिजे.

(फायलिंग कॅबिनेटपाशी जाऊन एक फाईल काढतो, टेबलापाशी घेऊन जातो आणि चाळतो.) अरेच्चा, त्या रिपोर्टच्या अलीकडचा आणि पलीकडचा पण रिपोर्ट आहे. नेमका हाच रिपोर्ट—म्हणजे त्याची ओरिजिनल मिसिंग आहे. म्हणजे हे प्रकरण दिसतं त्यापेक्षा जास्त गंभीर आहे. मि. चिन्मय खरे, यू हॅव टु बी केअरफुल—व्हेरी केअरफुल.

(हातांमध्ये डोकं ठेवून काही वेळ बसतो. अचानक एक टिचकी वाजवतो.) मी प्रत्येक रिपोर्टची अजून एक ओरिजिनल एक वेगळ्या फाईलमध्ये ठेवत असतो. ते कुणालाच माहीत नाहीय्. त्या फाईलमधे बघितलं पाहिजे.

*(पुन्हा फायलिंग कॅबिनेटपाशी जाऊन एक फाईल काढतो, टेबलापाशी घेऊन जातो आणि चाळतो. आनंदानं टाळ्या वाजवतो.)* दॅट्स इट मि. खरे. यू आर केअरफुल. बट यू हॅव टु बी मोअर केअरफुल इन फ्यूचर... हा सापडला तो रिपोर्ट. जपून ठेवला पाहिजे. (थोडा विचार करतो) ओ नो. याचा फोटोही काढून ठेवला पाहिजे. (खिशातून मोबाईल काढतो—ॲडजस्ट करतो आणि रिपोर्टचे फोटो काढतो.) नाउ आय रिअलाइझ व्हॉट हॅज हॅपन्ड. आता त्या नाईककडे जाऊन त्याच्याकडच्या रिपोर्टची कॉपी पाहिली पाहिजे. पण तसं कशाला? त्यालाच कुणाबरोबर तरी रिपोर्ट पाठवून

द्यायला सांगतो. (फोन लावतो) हॅलो, हां नाईक ना? अहो जरा अर्जंट काम निघालं त्यामुळं येता आलं नाही. हो हो. तुमचंही अर्जंटच आहे—मान्य आहे मला. पण एक काम करता का? कुणाबरोबर तरी पाठवून देता का तुमची रिपोर्टची कॉपी. म्हणजे माझ्या रजिस्टरमधल्या व्हॅल्यूज आणि रिपोर्टमधल्या व्हॅल्यूज टॅली करून पाहता येतील. ओके, ओके. दहा मिनिटात पाठवताय्? ठीक आहे. मी इथंच आहे ऑफिसमधे माझ्या. चला तोपर्यंत एक चहा घेऊन यायला हरकत नाही. (जातो. रंगमंचावर काही काळ अंधार. पुन्हा प्रकाश होतो तेव्हा चिन्मय टेबलापाशी बसलेला आहे.) आता कसं फ्रेश वाटतंय्. हां या एन्व्हलपमधे नाईकनं पाठवलेला रिपोर्ट दिसतोय्. (लिफाफा उघडून रिपोर्ट बाहेर काढतो आणि न्याहाळतो.) अरेच्चा, हा प्रिंटआउट दिसतोय्—हां सही पण माझीच आहे—अगदी सही सही. पण सँपल ओके आहे असं यात म्हटलंय्. ओ आय सी... म्हणजे या लोकांची मजल इथपर्यंत गेली म्हणायची. माझ्याच रिपोर्टमधे फेरफार करून तो अधिकृत म्हणून सगळीकडे फिरवायचा आणि माझा मूळ रिपोर्ट माझ्याच ऑफिसमधून गायब करायचा. चांगलंच षडयंत्र आहे हे. पण मी अजून एक कॉपी जपून ठेवली आहे म्हणून ठीक. नाहीतर... मि. चिन्मय खरे, तुम्ही मृण्मय खोटे झाला असतात—खोटे आणि मातीमोल...

## अंक पहिला

### प्रवेश १५

*(चिन्मयचं घर. चिन्मय वाचत बसलेला आहे. इरा आतून येते आणि त्याच्या शेजारी बसते.)*

इरा: चिन्मय, नेहाचं लक्षण काही ठीक दिसत नाही.

चिन्मय: का?

इरा: अरे, ती आणि विक्रम खूप जवळ आलेले आहेत…

चिन्मय: खूप जवळ?

इरा: अरे, असं काय करतोयस्? खूप जवळ म्हणजे—दे मे बी इन क्लोज फिजिकल काँटॅक्ट…

चिन्मय: खरंच? हाउ डु यू नो?

इरा: एकदा मी स्वत: त्या दोघांना हातात हात घालून बसलेलं पाहिलंय्…

चिन्मय: ओ, असा फिजिकल काँटॅक्ट होय?

इरा: (किंचित् चिडून) अरे, असं काय करतोयस्? अजून पुढं ऐक ना…

चिन्मय: सांग ना.

इरा: ते मी स्वत: पाहिलं होतं. आणि काही दिवसांपूर्वी नेहा काही मित्रांबरोबर ट्रेकिंग कँपला गेली होती आठवतंय् का तुला?

चिन्मय: हो मला तिनं परवानगी विचारली होती आणि मी ती दिली होती.

इरा: करेक्ट. त्या कँपला विक्रम देखील होता. त्या कँपला गेलेल्या दुसऱ्या एका मुलीनं मला सांगितलं की—की दे वेअर—विक्रम आणि नेहा—इंटिमेट—एका तंबूत.

चिन्मय: खरं?

इरा: होय.

चिन्मय: ती मुलगी जेलस असू शकेल…

इरा: जेलस? कशाबद्दल?

चिन्मय: हे बघ, विक्रांत मोठ्या बापाचा मुलगा आहे. त्याच्यावर डोळा ठेवणाऱ्या अनेक मुली असतील. नेहाची आणि विक्रांतची मैत्री अशा मुलींना खुपत असेल.

इरा: शक्य आहे. पण आपण नेहाला याबाबत बोललंच पाहिजे.

(नेहा प्रवेशते. कोपऱ्यात पर्स आणि स्टोल इ. भिरकावते आणि सोफ्यात चिन्मयशेजारी येऊन बसते.)

इरा: नेहा, काय झालं? थकल्येयस् का? कॉफी घेऊ या का?

नेहा: ओ येस. आय लव्ह कॉफी… एनी टाइम.

चिन्मय: मी पण घेईन थोडी. (इरा चिन्मयच्या दिशेनं नेहाशी बोलण्याबद्दल खाणाखुणा करते आणि आत जाते.)

चिन्मय: नेहा, तुझं आणि विक्रमचं कसं चाललंय्?

नेहा: कसं म्हणजे? वुइ आर फ्रेंडस… ठीक चाललंय्.

चिन्मय: इराला असं समजलं की—की तुम्ही ट्रेकला गेला होतात तेव्हा—तेव्हा यू बिकेम इंटिमेट…

नेहा: कुणी सांगितलं तुम्हाला?

चिन्मय: कुणी सांगितलं हे महत्त्वाचं नाही. टेल मी इज देअर ट्रुथ इन दॅट?

नेहा: (चिन्मयच्या डोळ्यात पाहत) व्हॉट डु यू थिंक?

चिन्मय: (गडबडून जात) अं—अं—आय थिंक यू विल ॲक्ट रिस्पॉन्सिब्ली…

नेहा: (चिन्मयच्या गळ्यात हात गुंफून) एक्झॅक्टली… तसंच केलं मी.

चिन्मय: म्हणजे नक्की काय केलंस?

नेहा: ही वॉज ड्रंक. त्यानं माझ्याशी जबरदस्ती करायचा प्रयत्न केला. पण मी त्याला दूर ढकललं. मी त्याला म्हटलं—तू जेव्हा तुझ्या ॲडिक्शनमधून बाहेर येशील तेव्हाच मी—मी—

चिन्मय: तेव्हाच काय?

नेहा: तुम्हाला समजलंय्…

चिन्मय: समजलं पण… खरंच असं केलंस तू?

नेहा: बाबा तुम्हालाच विश्वास होता ना की मी जबाबदारीनं वागले असणार म्हणून मग आता पुन्हा विचारताय् की मी खरंच असं केलं का…

चिन्मय: (नेहाला जवळ घेऊन छातीशी कवटाळीत) नो, नो. मला खात्री आहे माझ्या या परीबद्दल.

(इरा कॉफी घेऊन येते)

इरा: तुमच्या परीला सांगा की अगदी तो व्यसनमुक्त झाला तरीही इंटिमेट व्हायचं नाही.

नेहा: (इराकडून कॉफीचा एक कप चिन्मयला देते आणि एक स्वत: घेते) हे बघ आई मला सगळं समजतं. कधी काय करायचं आणि कधी नाही ते…

इरा: (स्वत: कॉफीचा एक कप हातात घेऊन) कोण सांगणार या पोरीला. परी ना तुमची.

नेहा: आई, बाबांचे मित्र आहेत अभिजीतकाका. मला माहित्येय् त्यांच्यातलं तात्त्विक युद्ध. मीही बाबांच्याच मुशीत घडलेली आहे—पण एक फरक आहे.

*(चिन्मय कान टवकारून पाहू लागतो आणि इराही आपल्या बोल्ड मुलीकडे डोळे विस्फारून पाहू लागते)*

चिन्मय: ओ आय सी. मला तरी कळू दे.

इरा: कोणता फरक?

नेहा: बाबा इज पॅसिव्ह इन धिस वॉर. म्हणजे ते अभिजीतकाकामध्ये बदल घडवून आणत नाहीयेत्. ते फक्त स्वतःला वाचवतायत.

चिन्मय: हाउ कॅन यू से लाइक दॅट? मी अभिजीतला अनेक वेळा सांगितलंय् आणि सांगतोय् की त्याचा मार्ग चुकीचा आहे आणि तो केवळ नाशाकडेच घेऊन जाईल.

नेहा: एक्झॅक्टली. हेच ते पॅसिव्ह वॉर. बाबा, नुसतं असं बोलून आणि सांगून ते बदलतील असं वाटतंय् तुम्हाला?

चिन्मय: व्हाय नॉट. पॉवर ऑफ पर्स्वेजन…

नेहा: आय डोंट बाय दॅट. मला नाही पटत ते. तसं असतं तर महात्मा गांधींच्या मनं वळवण्यानं हा देश केव्हाचा सुधारला असता—लाचलुचपत, गुन्हेगारी हे सगळं संपलं असतं. केव्हाच.

इरा: मग तुला काय म्हणायचंय?

नेहा: मला एवढंच म्हणायचंय् की मी विक्रमला व्यसनमुक्त करीन. आत्मसन्मानानं जगायचं असतं हे त्याच्या मनावर ठसवीन आणि…

इरा: पण हे सगळं कशाला? तुला दुसरा चांगला मुलगा नक्की मिळेल.

नेहा: नो. आई माझं त्याच्यावर प्रेम आहे. पण माझा चांगुलपणावर पण विश्वास आहे—बाबांच्याप्रमाणे.

(चिन्मय उठतो आणि नेहाला जवळ घेऊन थोपटतो)

चिन्मय: मग मी माझ्या परीच्या मागं खंबीरपणे उभा राहीन.

## अंक पहिला

### प्रवेश १६

*(अभिजीतचं पॉश ऑफिस. अभिजीतसमोर चिन्मय बसला आहे.)*

अभिजीत: येस, चिन्मय—आफ्टर अ लाँग टाइम. तू असा सीरियस का दिसतोयस्?

चिन्मय: मला तुला काही विचारायचंय्.

अभिजीत: मग बोल ना. यू आर फ्री टु आस्क एनीथिंग अँड यू नो दॅट.

चिन्मय: आय विल कम स्ट्रेट टु द पॉइंट. हे बघ मला कळत नाहीय् की रिजेक्ट झालेला माल प्रॉडक्शनमध्ये कसा काय वापरला जातोय्?

अभिजीत: व्हॉट डु यू मीन बाय दॅट? कशाबद्दल बोलतोयस् तू?

चिन्मय: (किंचित् चिडून) ओके. आपलं नवीन ड्रग हेपॅट्रॉपिन उत्पादनात आहे ना?

अभिजीत: हो ते आपलं नवीन इंट्रोडक्शन आहे. मी बोललो होतो तुझ्याशी त्याबद्दल.

चिन्मय: ते ठीक आहे पण—

अभिजीत: पण काय?

चिन्मय: त्याचे घटक मी पास केलेले नसताना सुद्धा वापरले गेलेत…

अभिजीत: कसं शक्य आहे? तुझ्या ओके रिपोर्टनंतरच मटेरियल प्रॉडक्शनला घेतलं जातं.

चिन्मय: येस. आय नो. पण या केसमध्ये मी मटेरियल रिजेक्ट केल्यावरही वापरलं गेलंय्.

अभिजीत: थांब. लेटेस्ट बॅच ना? आत्ता रिपोर्ट पाहू या. (टेबलावरच्या लॅपटॉपवर काही कीज दाबतो,) हां हा बघ. तुझाच रिपोर्ट आहे. थांब हं झूम करतो—स्कॅन केलेला आहे ना... तुझीच सही आहे बघ. रिपोर्ट ओके आहे. (लॅपटॉप सरकवून चिन्मयला दाखवतो. चिन्मय तो निरखून पाहतो.)

चिन्मय: हं. हा मीही पाहिलाय्. इट इज अ डॉक्टर्ड रिपोर्ट.

अभिजीत: व्हॉट डु यू मीन?

चिन्मय: पुन्हा पुन्हा तोच प्रश्न करू नकोस अभिजीत. आय मीन व्हॉट आय से. मी रिजेक्ट केलेल्या रिपोर्टमध्ये बदल करून—माझी सही तशीच ठेवून हा रिपोर्ट तयार केलेला आहे. मला माहीत नाही कुणी केलाय् ते. पण हे सगळं तुझ्या माहितीशिवाय—तुझ्या ॲप्रुव्हलशिवाय होणं शक्य नाही एवढंच मला कळतं.

अभिजीत: अरे चिन्मय, असं काय करतोयस्? हा रिपोर्ट तुझ्यासमोर आहे ना? बघतोयस् ना तू तुझ्या डोळ्यांनी?

चिन्मय: (संतापून) मी बनवलेला रिपोर्ट मला माहीत आहे. हा रिपोर्ट बदललेला आहे. मी माझ्या रिपोर्टमध्ये मटेरियल नामंजूर केलं होतं—रिजेक्ट केलं होतं.

अभिजीत: ओके, ओके. काम डाउन. आपण सगळ्या प्रकाराची चौकशी करू या मग तर झालं?

(क्षणभर शांतता)

चिन्मय: मला नाही वाटत चौकशी प्रामाणिकपणानं आणि पारदर्शक होईल असं…

अभिजीत: हे बघ चिन्मय, तुला कुठं तरी विश्वास ठेवायलाच हवा, नाही का?

चिन्मय: अभिजीत, मला हे असले खोटे उद्योग आवडत नाहीत हे तुला चांगलं माहीत आहे. तेव्हा तुला काय हवं ते कर पण मला असं गोवण्याचा प्रयत्न करू नकोस.

अभिजीत: गोवण्याचा? म्हणजे मी या सगळ्यात आहे असं तुला म्हणायचंय्?

चिन्मय: मी तुला मघाशीच सांगितलं—तुझ्या explicit किंवा implicit involvement शिवाय हे होणं शक्यच नाही हे माझ्यासारख्या तुझ्यापेक्षा खालच्या लेव्हलच्या माणसालाही कळतं.

अभिजीत: हे लेव्हल वगैरे विसरून जा—अरे आपण मित्र आहोत. माय डिअर, वरिष्ठांना काय पाहिजे ते दिलं की कसं सगळे खूष. हे मी तुला मागंच सांगितलं होतं ते विसरलास वाटतं?

चिन्मय: आणि माझ्या बाबतीत तू असला काही उद्योग करणार नाहीस असं तू मला वचन दिलं होतंस ते तू विसरलायस्.

अभिजीत: हे बघ मी तुला कसलंही प्रॉमिस केल्याचं मला स्मरत नाही.

चिन्मय: तुला आठवत नाही? “ज्या क्षणी तू असलं काही आपल्या नात्याला तडा देणारं करशील त्या क्षणी आपलं मित्रत्वाचं नातं संपलं म्हणून समज” असं मी तुला म्हटल्यावर तू मला म्हणालास—आय अंडरस्टँड. नाउ लेट अस हॅव सम कॉफी. आठवतंय् का? आणि समजा नसलं आठवत तरी आय डोंट केअर.

अभिजीत: ओके. आठवतंय् मला थोडं थोडं पण ते काही प्रॉमिस नव्हतं.

चिन्मय: ऑल राइट बट नाउ आय अंडरस्टँड यू पर्फेक्टली. यू आर नॉट टु बी ट्रस्टेड.

अभिजीत: अरे पण…

चिन्मय: गुड-बाय, अभिजीत.

## <u>अंक पहिला</u>

### प्रवेश १७

*बागेमधील बाकावर नेहा वाचत बसली आहे. थोड्या वेळानं तिथं विक्रम येतो आणि तिच्याजवळ येऊन उभा राहतो. ती दुर्लक्ष करते.)* (

विक्रम: नेहा, माझ्याशी बोलणार नाहीयेस का?

नेहा: (मान डोलावते) अंहं.

विक्रम: मानेनं नाही म्हणत्येयस् पण प्रत्यक्ष बोलत्येयस्.

नेहा: (मान झटकते) हुं:

विक्रम: हे बघ आय ॲम सॉरी. तू मला माफ करणार नाहीस का?

नेहा: प्लीज लीव्ह मी अलोन. तू इथून जा, विक्रम.

विक्रम: मी जाईन पण प्लीज माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.

नेहा: हे बघ नुसतं सॉरी म्हणून केलेल्या चुकीचं परिमार्जन किंवा प्रायश्चित्त होऊ शकत नाही.

विक्रम: परिमार्जन? प्रायश्चित्त? म्हणजे काय?

नेहा: (फणकाऱ्यानं) हुं: ज्याला या शब्दांचा अर्थही माहीत नाही तो काय प्रायश्चित्त करणार?

विक्रम: नेहा, प्लीज. सांग ना.

नेहा: Atonement. चुकीबद्दल—पापाबद्दल स्वतःला शिक्षा करणं म्हणजे परिमार्जन कळलं?

विक्रम: ओके. ओके. मी परि-परिमार्जन करीन ना. मग तर तू मला क्षमा करशील ना?

नेहा: विक्रम, ते एवढं सोपं नाहीये.

विक्रम: म्हणजे?

नेहा: तुला माझी मैत्री हवी असेल तर—

विक्रम: तर काय?

नेहा: तर तुला ड्रग्जपासून कायमची फारकत घ्यावी लागेल आणि—

विक्रम: आणि काय?

नेहा: ड्रिंक सुद्धा एकदम माफक प्रमाणातच आणि तेही occasionally…

(विक्रम विचारात पडतो. नेहा उठून उभी राहते.)

नेहा: तू विचार करत बैस. मी निघते.

(विक्रम तिच्या मागे-मागे जातो.)

विक्रम: नेहा, आय लव्ह यू. प्लीज मी काय—

नेहा: हे बघ तू माझी अट ऐकल्येयस्. यू हर्ड मी.

विक्रम: पण माझं ऐकून तर घेशील की नाही?

नेहा: नो. प्रथम माझी अट मान्य आहे की नाही ते सांग आणि मगच पुढचं बोलणं.

विक्रम: ओके. नेहा, मला मान्य आहे तुझी अट. पण तू मला मदत केली पाहिजेस.

नेहा: माझी कसली मदत हव्येय् तुला?

विक्रम: हेच की... ड्रग्ज सुटण्याकरता...

नेहा: म्हणजे?

विक्रम: जर तू माझ्याबरोबर जास्त काळ राहिलीस तर माझं व्यसन सुटायला मदत होईल.

नेहा: अं—पण प्रयत्न तुलाच करायला हवा.

विक्रम: या सगळ्यातून एक गोष्ट मात्र तू कबूल केल्येयस्.

नेहा: ती कोणती?

विक्रम: की तुझंही माझ्यावर प्रेम आहे.

नेहा: काही काही गोष्टी समजून घ्यायच्या असतात.

*(विक्रम नेहाचा हात हातात घेतो. नेहा केली क्लार्कसनचं "Sober" हे गाणं गुणगुणते—I don't know... This could break my heart or save me. विक्रम स्मितहास्य करीत तिचं गुण्गुणून झाल्यावर एमिनेमचं "Going Through Changes" हे गाणं गुणगुणतो—I'm going through changes, I'm going through changes)*

## <u>अंक दुसरा</u>

### प्रवेश १

*(चिन्मयचं घर. चिन्मय आरामखुर्चीत एकटाच वाचत पडला आहे. दारावरची बेल वाजते. चिन्मय दाराकडे जातो आणि उघडतो.)*

चिन्मय: अरे—विशाखा तू? व्हॉट अ सरप्राइज. ये ना आत. (तिच्यामागे डोकावून पाहत) अभिजीत कुठाय्?

विशाखा: (आत येत) अभी दिल्लीला गेलाय्. आय थॉट यू नो. मी इकडूनच चालले होते म्हटलं डोकावून पाहावं आहे का जुन्या लोकांची अजून ओळख. इरा कुठाय्?

चिन्मय: इरा आणि नेहा नाशिकला गेलेत इराच्या बहिणीकडे—तिला बरं नाही म्हणून. बस ना. (विशाखा सोफ्यावर बसते.)

विशाखा: मग तू नाही गेलास?

चिन्मय: मला रजेवर जाऊ दिलं नाही **<u>साहेबांनी</u>**. (साहेबांनी या शब्दावर जोर देऊन.) एक इन्क्वायरी चालल्येय्. मला माहीत नव्हतं अभिजीत दिल्लीला गेलाय् ते. त्याची माझी गाठच होत नाही अलीकडे.

विशाखा: गाठ होत नाही की…

(चिन्मय चमकून बघतो.)

चिन्मय: विशाखा, मी तुझ्यापासून काही लपवून ठेवीत नाही. येस्, अलीकडे अभिजीतचे आणि माझे संबंध काही फारसे मित्रत्वाचे राहिले नाहीयेत.

विशाखा: मला कल्पना आहे त्याची.

चिन्मय: (आश्चर्यानं) काऽऽय?

विशाखा: चिन्मय, अलीकडे अभी खूपच टेन्शनमध्ये असतो. माझ्याशीही त्याचा संवाद खूपच कमी झालाय्. रात्री उशिरा येतो—ड्रिंक घेतो—कधी कधी जेवतही नाही आणि झोपून जातो. मी त्याला म्हटलंही की आपलं आणि खरे फॅमिलीबरोबर पूर्वीसारखं येणं-जाणं होत नाही.

चिन्मय: मग?

विशाखा: तेव्हाच त्याच्याकडून काढून घेतलं अन् मला समजलं…

चिन्मय: काय समजलं?

विशाखा: तुझी आयडिया अभीनं स्वतःची म्हणून मॅनेजमेंटकडे मांडली ते. मीच त्याला सांगितलं की चिन्मयचं क्रेडिट चिन्मयला मिळालंच पाहिजे आणि त्याच्याकडून तसं वचनही घेतलं.

चिन्मय: ओ गॉड. म्हणजे त्या दिवशी तो मला थोडंफार क्रेडिट द्यायला तयार झाला होता ते—

विशाखा: पण—पण अभी फार टेन्शनमध्ये आहे रे. मला फार भीती वाटते. शिवाय…

चिन्मय: शिवाय काय?

विशाखा: विक्रमही स्वच्छंद वागायला लागलाय्. ही इज ऑन ड्रग्ज टू.

चिन्मय: ही इज क्लोज टु नेहा. नेहा मला सांगत होती.

विशाखा: (अचानक स्फुंदून रडायला लागते) आय ॲम सो लोनली, चिन्मय.

चिन्मय: (तिच्याजवळ जातो आणि तिला रुमाल देतो) आय अंडरस्टँड. विशाखा, रडू नको. सगळं ठीक होईल.

विशाखा: (एकदम चिन्मयला मिठी मारते) चिन्मय, चिन्मय प्लीज हेल्प मी.

चिन्मय: (तिच्या पाठीवरून हात फिरवतो आणि हलकेच तिची मिठी सोडवतो.) वुड यू लाइक अ ड्रिंक?

विशाखा: (पुन्हा चिन्मयला ओढते आणि जवळ बसवते) चिन्मय, इथं बस आधी. टॉक टु मी.

चिन्मय: ओके, ओके.

विशाखा: (स्फुंदत) चिन्मय, अरे माझं आयुष्य अगदी भरकटत चाललंय्. निरर्थक आणि शून्य.

चिन्मय: अग पण शून्यातूनच सगळं निर्माण होत असतं. काही काळ जाऊ दे—होईल सर्व नॉर्मल.

विशाखा: माझ्या जीवनात केवढी पोकळी निर्माण झाल्येय्... काय करू मी? आय ॲम फ्रस्ट्रेटेड. विक्रम आणि अभी दोघेही हाताबाहेर चाललेयत.

चिन्मय: विक्रम आमच्या नेहाच्या प्रेमात पडलाय. माझी खात्री आहे त्याचं प्रेम जर खरंच असेल तर ती त्याला ड्रग्जच्या विळख्यातून बाहेर काढील.

विशाखा: तुला कसं माहीत?

चिन्मय: मला नेहानंच सांगितलं. ती खरंच एक खूप हुषार आणि स्मार्ट मुलगी आहे. तिनं आजपर्यंत म्हटल्याप्रमाणं करून दाखवलंय्.

विशाखा: खरंच? खरंच असं होईल?

चिन्मय: येस. व्हाय नॉट.

विशाखा: आणि अभी?

चिन्मय: त्याला आता केवळ तू आणि नशीबच त्याला योग्य मार्गावर आणू शकेल. पण मला कधी कधी अशी भीती वाटते की तो कदाचित् या सगळ्या षडयंत्रात इतका खोल रुतलाय् की बाहेर त्यातून येणं खूप अवघड आहे. मी त्याच्याशी बोललो मार्ग बदलण्याबद्दल. पण एकदा का भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला की तिथून मागं फिरणं खूप अवघड आहे.

विशाखा: अरे पण तू विक्रमबद्दल जो आशेचा किरण दाखवलायस ना त्यामुळं माझ्यावरचं ओझं खूप कमी झालंय् रे चिन्मय. (त्याला ओढून त्याच्या गालाचं चुंबन घेते. चिन्मय चमकतो.) नाउ मेक मी अ नाइस ड्रिंक.

चिन्मय: विशाखा, विशाखा—हे बरोबर नाहीये—धिस इज व्हेरी रॉंग. (तो तिला दूर करण्याचा प्रयत्न करतो पण ती त्याला ओढत राहते. शेवटी चिन्मय वेगळा होतो आणि तिला एक ड्रिंक बनवून आणून देतो. स्वतःही एक छोटा पेग घेतो.)

विशाखा: चिन्मय, मला तू विमानात अभीला सांगितलेलं चांगलं आठवतंय्.

चिन्मय: काय आठवतंय्?

विशाखा: उंचावरचे पांढरे ढग तेजस्वी दिसतात पण कुचकामी असतात—नुसतेच दिखाऊ. त्यापेक्षा कमी उंचीवरचेच खरे उपयोगी—काळे पण पाऊस देणारे. किती खरंय्.

चिन्मय: हं. सिर्रस आणि निंबोस्ट्रेटस.

*(विशाखा पुन्हा त्याला जवळ ओढते. दिवे मंद होत पडदा पडतो. पहिला अंक समाप्त.)*

## <u>अंक दुसरा</u>

**प्रवेश २**

*(अभिजीतचं ऑफिस. अभिजीत, कोरडे एका बाजूला बसले आहेत. दुसऱ्या बाजूला चिन्मय बसला आहे.)*

कोरडे: चिन्मय खरे, तुम्हाला इथं का बोलावलं आहे हे माहीत आहे ना?

चिन्मय: होय.

कोरडे: कशाकरता?

चिन्मय: चौकशीकरता—इन्क्वायरी.

कोरडे: ॲक्चुअली आमच्या बाजूनं चौकशी संपलेली आहे. तुम्हाला सफाईसाठी काही सांगायचं असल्यास सांगा.

चिन्मय: कसली सफाई? मला कसलीही सफाई द्यायची आवश्यकता नाहीये.

कोरडे: म्हणजे? तुम्ही मेमो नीट वाचला नाही का?

चिन्मय: मी तुमच्या मेमोला दिलेलं उत्तर *तुम्ही* नीट वाचलेलं दिसत नाहीये.

अभिजीत: चिन्मय, प्लीज डोंट मेक धिस डिफिकल्ट. जरा नीट उत्तरं दे.

चिन्मय: तुम्ही केलेल्या खोट्या आरोपांवर मी सफाई देऊ इच्छित नाही. मी कोणतीही चूक किंवा गुन्हा केलेला नाही त्यामुळे मी सफाई किंवा बचाव करण्याचा प्रश्नच येत नाही.

(कोरडे आणि अभिजीत एकमेकांकडे पाहतात.)

अभिजीत: ही इज मेकिंग इट डिफिकल्ट फॉर अस.

कोरडे: नो. ही इज मेकिंग इट डिफिकल्ट फॉर हिमसेल्फ.

अभिजीत: हे बघ चिन्मय, तुझी अशीच ॲटिट्यूड राहिली तर—

चिन्मय: तर काय?

अभिजीत: आम्हाला कारवाई करणं भाग पडेल. आमच्या दोघांशिवाय बद्रिनारायण हेही इन्क्वायरी कमिटीवर आहेत पण ते पुढील काही दिवस रजेवर आहेत. त्यांनी आम्ही जो काय घेऊ तो निर्णय त्यांना मान्य असेल असं आधीच कळवलं आहे.

चिन्मय: तुम्ही हवी ती कारवाई करू शकता कारण मी नियमांनुसार वागलो आहे आणि केमिकलचे लॉट दर्जा बरोबर नसल्यानं पास केलेले नाहीत हे तुम्हाला पक्कं माहीत आहे.

कोरडे: आमच्याकडे असलेल्या पुराव्यानुसार तुम्ही ते लॉट पास केलेले आहेत. (पुराव्याचे निदर्शक कागद समोर धरतो.)

चिन्मय: तुमचे पुरावे मी पाहिलेले आहेत. ते सर्व बनावट आहेत. मी लॉट पास केलेले नाहीत. खरं तर मी ते दोनदा परीक्षण करून मग रिजेक्ट केलेले आहेत.

अभिजीत: चिन्मय, तू चूक कबूल केलीस ना तर आम्ही दोघेही (कोरडे आणि अभिजीत पुन्हा एकमेकांकडे बघतात) तुमच्यावरची कारवाई सौम्य होईल अशी तरतूद करू.

चिन्मय: मी चूक केलेली नसल्यानं कबूल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुम्हाला जी काय कारवाई करायची ती खुशाल करा.

कोरडे: (विस्मयानं एकदा चिन्मयकडे तर एकदा अभिजीतकडे पाहत) ही इज अ‍ॅडमंट.

अभिजीत: पण मग तुझ्याकडे काही तुझ्या बाजूचा काही पुरावा आहे का?

चिन्मय: असू शकेल, मि. कोरडे आणि मि. अभिजीत अग्निहोत्री. समजा, मी आज जरी चूक कबूल करून होणारी शिक्षा अगदी टाळू शकलो तरी माझी खात्री आहे की तुम्ही चालवीत असलेले उद्योग चालूच राहतील आणि माझ्यासारख्याला काम करणं मुष्किल होऊन जाईल. तेव्हा मला असं वाटतं की तुम्ही माझ्यावर अ‍ॅक्शन घेतलेलीच बरी. माझी सुटका तरी होईल.

अभिजीत: आर यू इन सेन्सेस? तुझ्यावर कारवाई झाली तर तुझ्या पर्सनल फाईलमध्ये तसा रिमार्क येईल आणि तुला दुसरी नोकरी मिळणं अवघड होऊन बसेल.

कोरडे: येस. सो कम टु युअर सेन्सेस. कबूल करून टाकणं हेच तुझ्या हिताचं आहे.

चिन्मय: माझ्या हिताची काळजी करण्यापेक्षा तुम्ही स्वतःच्या हिताची काळजी करणं मला वाटतं योग्य ठरेल.

अभिजीत: म्हणजे? व्हॉट डु यू मीन?

चिन्मय: म्हणजे असं की मला कळून चुकलंय् की इथं तुम्हा लोकांची एक सिंडिकेट आहे—तुमचा एक ग्रुप आहे. स्वतःचे स्वार्थी हितसंबंध जपण्याकरता तुम्ही कुठल्याही थराला जाऊ शकता. त्यामुळं मी आता जरी या तुम्ही माझ्याविरुद्ध जुळवलेल्या षडयंत्रातून बाहेर पडलो तरी पुन्हा माझ्यासारखा प्रामाणिक मनुष्य तुमच्या जाळयात कधीही सापडू शकतो. मला तुमच्या या कृष्णकृत्यांचा वास

आधीच आल्यानं मी सावध झालो. माझ्या योग्य आणि प्रामाणिक कामाचे पुरावे मी आधीच जमा करून सुरक्षित ठेवले आहेत. तुम्ही खुशाल मला कंपनीतून काढून टाका. पण मग मी माझे पुरावे न्यायालयात दाखल करीन तेव्हा तुम्ही तुमच्या हिताची काळजी करू शकणार नाही. तेव्हा ती आताच केलेली बरी.

कोरडे: मि. खरे तुम्ही आम्हाला धमकी देताय्?

चिन्मय: खरं सांगायचं तर तुम्हीच मला मघापासून धमकीवजा इशारे देत आहात. पण तुम्हालाही मी काय म्हणतोय् ते चांगलंच कळलेलं आहे.

अभिजीत: (दोन्ही हातांनी दोघांना शांत करीत) हे बघा, तुम्ही दोघंही ही धमकी-बिमकीची भाषा बंद करा बघू. अशा तप्त वातावरणात मीटिंग पुढं चालू ठेवणं योग्य होणार नाही तेव्हा आपण नंतर सावकाश भेटू. (घड्याळाकडे पाहत) मलाही आता एका महत्त्वाच्या मीटिंगला जायचंय् तेव्हा... (चिन्मय आणि कोरडे उठून दरवाज्याकडे जाऊ लागतात) कोरडे, त्या मीटिंगबद्दल मला तुमच्याशी दोन मिनिटं बोलायचं होतं. (चिन्मय जातो. अभिजीत खुणेनंच कोरडेला बसायला सांगतो.) कोरडे, आपल्याला जरा दमानं घ्यायला हवं. चिन्मयकडे आपल्याविरुद्ध पुरावे दिसतायत्.

कोरडे: तो काही कोर्टात जाईलसं वाटत नाही.

अभिजीत: तुम्हाला माहीत नाही. तो तत्त्वाला जागणारा माणूस आहे. मला खात्री आहे की आपण जर ॲक्शन घेतली आणि त्याला नुसता सस्पेंड जरी केला ना तरी तो कोर्टात जाईल आणि

आपल्याविरुद्धचा पुरावा सादर करून आपल्याला गोत्यात आणील.

कोरडे: खरंच?

अभिजीत: शंभर टक्के. तेव्हा आपण सध्या हे प्रकरण दाबून ठेवू या. त्यातच आपलं हित आहे. ओके?

कोरडे: ओके.

## अंक दुसरा

### प्रवेश ३

*(हॉस्पिटल रूम. बँडेज बांधलेल्या अवस्थेत विक्रम सोफ्यावर पडलेला आहे. नेहा फुलं घेऊन येते.)*

नेहा: कसा आहेस तू विक्रम? मी नाशिकला गेले होते आईबरोबर. आल्यावर हे सगळं कळलं (विक्रमच्या दिशेनं हातवारे करते). तुझे आईबाबाही भेटले होते आताच बाहेर.

विक्रम: मी बरा आहे. काही दिवसांनी सोडतील घरी. हो, ममी-डॅडी होते आतापर्यंत इथं. आताच गेले काही वेळापूर्वी.

नेहा: (फुलं देते) अजून मार्गावर येत नाहीयेस ना? कायम अशाच मारामाऱ्या करत राहणारेस का?

विक्रम: (फुलांचा वास घेत) थँक यू. पण तसं नाहीये, नेहा. ॲक्चुअली मी यातनं बाहेर पडलोय् ना म्हणूनच माझ्यावर हल्ला झाला. तुला सांगतो—दोज बास्टर्ड्स... (बरळायला लागतो) या—या तुम्ही समोर आ-आय विल किल यू ऑल... (नेहा लटपटते)

नेहा: हां. मला वाटलंच होतं. यू आर सेम ओल्ड फेलो. विक्रम, तू काही सांगू नकोस. मी तुला चांगली ओळखून आहे. तुला अशा दांडगाईची आवडच आहे. यू आर गुड फॉर नथिंग—यू विल नेव्हर चेंज...

विक्रम: (स्वतःशीच) आ-आय लव्ह नेहा. पण ती का असं तुटक वागते माझ्याशी? (मध्येच normal होऊन) अग नाही ग—माझ्यावर हल्ला झालाय्. प्लीज, ट्राय टु अंडरस्टँड...

नेहा: आय हॅव अंडरस्टूड यू लाँग लाँग अॅगो... (निघून जाते)

विक्रम: (स्वतःशीच) ओ नो नेहा. आता माझी बाजू ऐकून न घेताच चालती झाली. ओन्ली गॉड कॅन हेल्प मी नाउ. माझं तिच्यावर इतकं प्रेम आहे—आणि तिचंही आहे. पण तिचा माझ्यावर विश्वास नाही. पण का असावा? मी तिचा विश्वास बसेल असं तरी काय केलंय्? नशिबात असेल तर होईल माझं प्रेम यशस्वी. पण ते यशस्वी होवो किंवा न होवो—तिला वचन दिल्याप्रमाणे मी या ड्रग्जच्या लफड्यातून बाहेर पडणार म्हणजे पडणार. किती एकटं अन् सुनं-सुनं वाटतंय्! अग आई ग. हे मला काय होतंय्? आतडी पिळवटून निघतायत् माझी... आणि डोकं पण भणभणायला लागलंय्. अरे बाप रे... परमेश्वरा सुटका कर माझी या यातनांच्यातून... *(बरळत राहतो. पडद्यावर काही काळ अंधार. पुन्हा प्रकाश होतो तेव्हा सोफ्याशेजारी नेहा आणि इरा बसलेल्या आहेत. विक्रम अजून बरळतोच आहे. Lonely I'm so lonely—I have nobody—To call my own... Akonच्या "Lonely" या गाण्याच्या काही ओळी पार्श्वसंगीत म्हणून वाजतात.)*

नेहा: आई, तू खरंच सांगत्येयस् का?

इरा: अग हो. मी काल आले होते ना तेव्हा पोलीस स्टेटमेंट घेत होते. त्यानंतर मी इन्स्पेक्टरना विचारलं तर ते म्हणाले की खरंच विक्रमवर हल्ला झालाय्. त्याच्या जुन्या सहकाऱ्यांनी त्याच्यावर हल्ला केला...

नेहा: जुन्या सहकाऱ्यांनी म्हणजे—हिज जंकी फ्रेंड्स? आणि कदाचित् त्याच्या बाबांनी पोलिसांना...

इरा: नाही. तसं दिसत नाहीये. ते इन्स्पेक्टर तर मला म्हणाले की त्याच्या हल्लेखोर मित्रांची कसून चौकशी चालू आहे आणि एक ड्रग रिंगच त्यांना या माध्यमातून हुडकून तिचा नायनाट करायचा आहे. ते सगळे सिन्सियरली सांगत होते.

नेहा: लेट अस होप सो.

इरा: पण तुला का विक्रमबद्दल एवढी काळजी?

नेहा: (मान खाली घालून पुटपुटते) अं, अं… मी—माझं

इरा: विक्रमवर प्रेम आहे—असंच ना?

नेहा: आईऽऽ

इरा: अग इन फॅक्ट मी तुम्हा दोघांना कुठं तरी पाहिलंही होतं एकत्र. नंतर तूही सांगितलंस की ट्रेकला त्याला वाह्यात वागू दिलं नाहीस तू. तुझ्या बाबांनी माझी समजूत घातली आणि त्यांचं म्हणणं अखेर मला पटलं.

नेहा: आई, तुला बाबांचं म्हणणं पटलं म्हणजे आश्चर्यच आहे!

इरा: चल, माझी फिरकी घेऊ नकोस हं नेहा!

नेहा: पण आई. तो खरंच चांगला मुलगा आहे. त्याला म्युझिकमध्ये खूप इंटरेस्ट आहे. तो खरंच काहीतरी चांगलं करू शकेल फक्त—

इरा: अग तुझ्या बाबांना तू त्याला योग्य मार्गावर आणू शकशील याची खात्री आहे. मला आधी खूप शंका होत्या पण चिन्मयनं मला व्यवस्थित समजावलं. तुझ्याबद्दल त्याला एवढा दांडगा विश्वास आहे ना!

नेहा: खरंच?

इरा: येस. त्यांना माहीत आहे तुझं प्रेम.

नेहा: म्हणजे त्यांची संमती आहे.

इरा: आणि माझीही. पण विक्रम मात्र मार्गावर आला पाहिजे.

नेहा: मीही जोरदार प्रयत्न करतेय्.

विक्रम: (कुशीवर वळून बरळतो) कु—कुणाला माझं खरंच व-वाटत नाहीय्. ए—दूर जा—डोंट कम निअर मी यू जंकी.

नेहा: हा—हा असा का बरळतोय्?

इरा: डॉक्टर म्हणत होते की याला withdrawal symptoms असं म्हणतात.

नेहा: म्हणजे?

इरा: म्हणजे जी व्यक्ती व्यसन सोडत असते ती ते सुटण्याआधी अशाच प्रकारे अस्वस्थ होते.

नेहा: याचा अर्थ विक्रम ॲडिक्शन सोडण्याच्या प्रयत्नात खरंच आहे. (एकदम जोरात ओरडते) येऽऽय.

इरा: ए: नेहा, हळू. हे हॉस्पिटल आहे.

नेहा: पण विक्रमनं माझं ऐकलंय्. वॉव. आई, मी डॉक्टरांशी बोलू का?

इरा: ओ येस. पण नंतर. उद्या-परवा. ते मोकळे असतील तेव्हा.

नेहा: ओके. *(पार्श्वभूमीवर किंवा रूममधील टीव्हीवर "दिल जो न कह सका..." हे गाणं.)*

## अंक दुसरा

### प्रवेश ४

*(हॉस्पिटलमधली विक्रमची खोली. विक्रम झोपलेला आहे. विशाखा शेजारी खुर्चीवर बसलेली आहे. डॉक्टर येतात.)*

विशाखा: गुड मॉर्निंग डॉक्टर.

डॉक्टर: गुड मॉर्निंग मिसेस अग्निहोत्री.

विशाखा: कसा आहे आता विक्रम, डॉक्टर?

डॉक्टर: ही इज रिकव्हरिंग—बट स्लोली. ही सगळी औषधं (शेजारच्या टेबलावरच्या औषधांकडे बोट दाखवीत) वेळच्या वेळी द्यायला हवीत. आमची नर्स ती काळजी घेईलच पण तुमचं पण थोडंफार लक्ष असू द्या.

विशाखा: (औषधांकडे पाहते) कुठली औषधं आहेत ही डॉक्टर?

डॉक्टर: बेसिकली ही मेथॅडोन आणि ब्युप्रेनॉर्फिन औषधं आहेत. यांच्यामुळे विथड्रॉअल सिंप्टम्स हळूहळू कमी होतील. वेळ लागेल पण परिणाम होईल. (घड्याळाकडे बघतात) पण मला आता राउंडमध्ये पेशंटस् पाहिले पाहिजेत. (जातात.)

विशाखा: ओके. थँक्स डॉक्टर. (थोडा वेळ बसून राहते. मध्येच ट्रेमधली औषधं पाहते आणि एकदम दचकते.) ओ माय गॉड—ही तर क्युअरनेटची औषधं आहेत. डेंजरस. ही बदलली पाहिजेत. पण कशी बदलणार? डॉक्टरांना क्युअरनेटमधल्या भानगडी सांगून

उपयोगी नाही. चिन्मयला विचारलं पाहिजे. (मोबाइल काढून फोन लावते.) क्काय कटकट आहे मेली... लौकर लागत का नाहीय्... हां हां, चिन्मय, मी विशाखा बोलत्येय्... काही नाही एक विचारायचं होतं... सांगते ना... विक्रमला डॉक्टरांनी औषधं दिल्येयत... विथड्रॉअल सिंप्टम्ससाठी... पण ही क्युअरनेट फार्माची दिसतायत... नाही, मला चान्स घ्यायचा नाही... भीती वाटत्येय्... क्युअरनेटमध्ये जे काही चाललंय् ना... बरं ते जाऊ दे पण याला सब्स्टिट्यूट औषधं असतीलच ना?... चांगल्या क्वालिटीची... मग सांग ना... ओके... त्याच डोसेजची आणीन... थांब हं लिहून घेते... (पर्समधून कागद-पेन्सिल काढून लिहायला लागते...) पहिली औषधं नाहीशी करून डॉक्टरांकडून या दुसऱ्या औषधांसाठी संमती मिळवली पाहिजे... *(टेबलावरची औषधं आणि इंजेक्शनं जमिनीवर टाकून सँडल्सखाली चिरडून टाकते आणि बाहेर जाते.)*

## अंक दुसरा

### प्रवेश ५

*(हॉटेलमधील रूम. चिन्मय आणि विशाखा बसलेले आहेत.)*

विशाखा: चिन्मय, मी अतिशय डिस्टर्ब झाल्येय्. अभिजीतच्या कंडिशनबद्दल मला खूप काळजी वाटत्येय्—आय डोंट वॉंट टु बॉदर यू बट...

चिन्मय: विशाखा, मला तू इथं का बोलावलंस? आपण असं भेटणं योग्य नाही.

विशाखा: का बोलावलं ते सांगितलं की आत्ताच. आणि असं भेटणं म्हणजे कसं?

चिन्मय: हेच की इथं येऊन एकांतात भेटणं.

विशाखा: (स्फुंदत) मला—मला तुझ्या खांद्यावर डोकं ठेवून रडायचंय्. हे काय मी तुझ्या घरी करू शकते का? तुला फोन करून माझ्या घरी बोलावलं तर तू येत नाहीस. मग दुसरा उपाय काय?

चिन्मय: विशाखा, तुला माहीत आहे की माझे आणि अभिजीतचे संबंध आता मित्रत्वाचे राहिलेले नाहीत. मी तुझ्याकडे आलो आणि तो किंवा विक्रम आले तर उगीच तमाशा नको. पण तुझा काय प्रॉब्लेम आहे?

विशाखा: अरे काय सांगू तुला? अभी भ्रमिष्टासारखाच वागायला लागलाय्. माझ्याशी त्याचं बोलणं जवळजवळ संपल्यातच जमा

आहे. तुला माहीतच आहे—विक्रमचा ड्रग प्रॉब्लेम. तोही हॉस्पिटलमधून घरी आलाय् तरी झोपूनच असतो. डॉक्टर म्हणतात—ही रिकव्हरी आहे. अरे मी वेडी व्हायचंच बाकी आहे. तूच मला एक जवळचा वाटतोस. (रडायला लागते आणि आवेगानं चिन्मयला मिठी मारते.)

चिन्मय: (विशाखाला थोपटत) अग, संकटांतून रिकव्हर व्हायला वेळ लागतो. आणि रडून काही होणार आहे का?

विशाखा: मग मी काय करू, चिन्मय? तूच सांग.

चिन्मय: हे बघ दोघांशी संवाद साधणं तुझं काम आहे—ते तुला करायलाच लागणार. अगदी ते उत्सुक नसले तरी. दॅट इज द ओन्ली वे.

विशाखा: मी तुला अजून एक गोष्ट सांगितली नाहीये…

चिन्मय: ती कोणती?

विशाखा: अरे, विक्रमच्या ड्रग रिंगबद्दल चौकशी करता करता पोलिस अभीचीही चौकशी करायला लागलेत. आणि तेव्हापासून अभी आणखीनच घाबरल्यासारखा झालाय्.

चिन्मय: त्याला काय घाबरायचं कारण आहे? विक्रम आता रिकव्हरी करतोय् आणि अभिजीतला त्याला कसं सोडवायचं ते चांगलं माहीत आहे. मागं तोच मला सांगत होता…

विशाखा: अरे, तुला माहीत नाहीये. त्या ड्रग्जचं मूळ—सोर्स—शोधत शोधत पोलिस अभीच्या कंपनीपर्यंत येऊन पोचलेत.

चिन्मय: ओ माय गॉड. तरीच मला वरच्या लेव्हलला काही तरी गडबड चालली आहे असं कानावर पडत होतं.

विशाखा: म्हणजे?

चिन्मय: अग, आमच्या क्युअरनेट फार्मामध्ये काहीतरी बेकायदेशीर चाललंय् अशी कुजबूज होती पण…

विशाखा: पण काय?

चिन्मय: बट माय वर्स्ट फिअर्स आर कमिंग ट्रू.

विशाखा: चिन्मय, तुला याची कल्पना होती?

चिन्मय: विशाखा, मला अभिजीत आणि त्याचा गट मिळून एका प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न करत होते. तेव्हाच मला शंका आली होती की काहीतरी संघटित प्रकारानं वेडेवाकडे उद्योग चाललेत.

विशाखा: तुला त्यांनी अडकवायचा प्रयत्न केला होता?

चिन्मय: येस. मी रिजेक्ट केलेलं हलक्या दर्जाचं केमिकल पास केल्याचं दाखवून तसा पुरावाही माझ्याविरुद्ध त्यांनी तयार केला होता. पण मी त्यांना पुरून उरलो आणि त्यांना—म्हणजे अभिजीत आणि त्याचे साथीदार यांना—उलट सांगितलं की माझ्याकडेच असा पुरावा आहे की तुम्हीच त्यात अडकाल. शेवटी त्यांनी माझी चौकशी करायचा फार्सच गुंडाळला.

विशाखा: अरे बाप रे! पण तू अभिजीतला वेळोवेळी का नाही थोपवलंस?

चिन्मय: मी अनेकदा सांगितलं—तुला आठवत असेल… आपल्या थायलंड ट्रिपच्या वेळी झालेला वाद… त्याच्या दृष्टीनं पांढरे ढग हेच उंचावर जाऊ शकतात. तेव्हापासून मी त्याला सुचवत आलोय् की प्रामाणिकपणा फार महत्त्वाचा आहे. पण प्रामाणिक राहून उच्चपदापर्यंत पोचणं अशक्य आहे असं त्याचं मत आहे.

विशाखा: ते तत्त्वज्ञान जाऊ दे रे पण तुला तो या प्रकरणात असल्याचा संशय आल्यावर त्याला वेळीच त्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न का नाही केलास तू, चिन्मय?

चिन्मय: बट हाउ कुड आय? ते सगळे माझ्याच जिवावर उठले होते. त्यांना मी तुम्हीच यात अडकाल असं सावध केलं होतं पण अभिजीत तर मला अधिकारानं खूप सीनियर आहे. तो मला काहीही करू शकला असता. मी त्याला सुचवण्यापलीकडे काहीही करू शकत नव्हतो. आणि… आणि…

विशाखा: आणि काय?

चिन्मय: खरं सांगू? मी त्याला योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करत असताना तू देखील त्याचीच तरफदारी करत होतीस असं माझ्या लक्षात येत होतं.

विशाखा: (चिन्मयच्या हाताला आपल्या दोन्ही हातांनी वेढून) हो रे. तेव्हा मला त्याचं ऐश्वर्य, तो दिमाख सगळं पाहून हा सगळा त्याच्या कर्तृत्वाचाच भाग आहे असं वाटायचं. तुझ्याशी संपर्क झाल्यानंतर मात्र मला त्यातला फोलपणा दिसून आला. तुला माहित्येय्? तुझी आयडिया टॉप मॅनेजमेंटला दाखवण्याचा अभीचा जो उद्योग चालला होता ना त्याला मीच खीळ घातली.

चिन्मय: हो, तू म्हणाली होतीस मला तसं.

विशाखा: होय. त्यानं मला तुझ्या त्या कल्पनेबद्दल सांगितलं आणि हेही सांगितलं की ती आयडिया त्याची म्हणूनच ॲक्सेप्ट करायला हवी. मी पहिल्यांदाच त्याचं असं करणं चूक आहे असं ठणकावून सांगितलं.

चिन्मय: हो. नंतर अभिजीत अगदी माझे पाय धरायला निघाला होता. सो यू डिड ट्राय टु रीझन विथ हिम.

विशाखा: येस. (चिन्मयच्या गळ्याला विळखा घालून) पण आता अवघड दिसतंय् मला सगळं. चिन्मय, मी तुझ्या पाया पडते पण काहीतरी सुचव अभिजीतला यातून बाहेर काढण्यासाठी...

चिन्मय: हे बघ असलं काही बोलू नकोस. आणि—आणि मला असं वाटतं की आता फार उशीर झालाय्...

विशाखा: (स्फुंदू लागते) आता मी काय करू रे?

(चिन्मय तिला थोपटत राहतो.)

चिन्मय: मलाही समजत नाहीये. काही गोष्टी योग्य वेळेला जर नियंत्रणात आणल्या नाहीत तर कायमचं नुकसान होतं. ही इज ओव्हर द हिल. आता गाडी उताराला लागल्येय्. मला वाटतं तू आता कमीत कमी वाईट परिणाम होईल असं काहीतरी करायला हवंस.

विशाखा: म्हणजे काय करायचं?

चिन्मय: म्हणजे... (विचार करीत) असं बघ. तू अभिजीतला पोलिसांसमोर सर्व खरं काय ते सांगायला भाग पाड. माफीचा साक्षीदार असतो ना तसं. म्हणजे मोठे मासे गळाला लागण्यासाठी पोलीसही कधी कधी लहान माशांना सोडून देतात—म्हणजे भक्कम पुरावा हाती आल्यावर. मला तर हाच मार्ग दिसतोय्.

विशाखा: अवघड आहे रे. (चिन्मयकडे हेतुपूर्वक पाहत) मला तर असं वाटतंय् की हे सगळं सोडून तुझ्या कुशीत शिरावं.

चिन्मय: अग वेडे, तसं करून कसं चालेल? मी माझा संसार कसा वाऱ्यावर सोडू? तू जा आता आणि मी सांगितल्याप्रमाणे कर म्हणजे संकटाची तीव्रता कमी होईल.

विशाखा: चिन्मय, नको रे दूर जाऊस असा माझ्यापासून…

चिन्मय: नाही. मला आता गेलंच पाहिजे. (तिच्यापासून दूर जातो. ती त्याला आपल्यापाशी ओढते आणि घट्ट मिठी मारते.)

## अंक दुसरा

### प्रवेश ६

*(कोरडे आणि अभिजीत अभिजीतच्या केबिनमध्ये बसलेले आहेत.)*

अभिजीत: मग कोरडेसाहेब चहा घेणार की कॉफी?

कोरडे: चालेल... काहीही चालेल.

अभिजीत: (फोन उचलून) दोन गरमागरम कॉफी पाठवा माझ्या ऑफिसात. थँक यू कोरडे तुम्ही केलेल्या मदतीबद्दल.

कोरडे: नुसतं कोरडं थँक यू नाही चालणार?

अभिजीत: म्हणजे?

कोरडे: या वर्षीच्या यादीत माझं नाव आलं पाहिजे—प्रमोशनच्या.

अभिजीत: (कोरडेकडे विस्फारून पाहत) बघू ना.

कोरडे: बघू ना नाही. यावेळी काम झालंच पाहिजे...

अभिजीत: (कपाळावरचा घाम पुशीत) अहो पण ते डिसीजन वरती होतात.

कोरडे: ते माहीत आहे मला. मी तुमचं काम मॅनेज केलं ना आता तुम्ही माझं करायचं.

अभिजीत: हे म्हणजे ब्लॅकमेल झालं.

कोरडे: आणि तुमचं चाललं होतं तो काय धर्मादाय होता का? मला केवढा डोंगर हलवायला लागला तुमच्यासाठी.

अभिजीत: आपल्यासाठी. तुम्हीही या सगळ्या भानगडीत आहातच पहिल्यापासून.

कोरडे: पण इन्क्वायरी तुमची—आणि तुमच्या चिरंजीवांची झाली होती. तुमचे चिरंजीव तर चांगलेच अडकले होते ड्रग चेनमध्ये.

अभिजीत: (दबक्या आवाजात) होय—पण आपण सगळेच यामध्ये भागीदार आहोत.

कोरडे: मला निंबोरे साहेबांच्या समोर सतरा वेळा नाक घासावं लागलं माहित्येय् का?

अभिजीत: निंबोरे?

कोरडे: निंबोरे-पाटील. राज्यमंत्री आहेत. भारी कनेक्शनवाला माणूस. कॅबिनेट मंत्री होतील लौकरच आणि फ्यूचर सीएम.

अभिजीत: काय केलं त्यांनी?

कोरडे: काय केलं? लगोलग फोन लावले आणि तुमच्या चिरंजीवांची केस काही तासात फाईलमध्ये गेली.

(केबिनच्या दारावर टकटक.)

अभिजीत: कोण आहे?

बाहेरून आवाज: कॉफी आणल्येय् साहेब.

अभिजीत: हां, हां. या आत. (कोरडेकडे पाहून तोंडावर बोट ठेवून गप्प राहायची खूण करतो. सेवक कॉफी ठेवून जातो.) मग?

कोरडे: मग काय? तुमचे चिरंजीव सहीसलामत सुटले आणि पोलिसांनी तुमची इन्क्वायरी पण गुंडाळून ठेवली हे तुम्हाला माहीतच आहे की.

अभिजीत: घ्या कॉफी घ्या. थंड होईल.

कोरडे: साहेबांचं म्हणणं आहे की आता सप्लाय दुप्पट झाला पाहिजे—चार महिन्यात. इंटरनॅशनल मार्केटमध्ये डिमांड खूप वाढल्येय्.

अभिजीत: म्हणजे? मला नाही समजलं. कोण साहेब?

कोरडे: अहो असं काय करताय्? साहेब म्हणजे तुमचे संकटमोचक—निंबोरे…

अभिजीत: ओ माय गॉड. म्हणजे हे—हे निंबोरे सुद्धा आहेत याच्यामध्ये?

कोरडे: शू, शू. असं मोठ्यांदी नाव घ्यायचं नाही. अहो त्यांची कनेक्शन कुठं नाहीत? पण लक्षात घ्या प्रॉडक्शन दुप्पट व्हायला पायजे हां…

अभिजीत: (वैतागून) अरे पण वरून तसं शेड्यूल आलं पाहिजे ना?

कोरडे: त्याची काळजी नको. ते येईल आपसूक. तुम्ही कपॅसिटी वाढवायला घ्या.

अभिजीत: (हलक्या आवाजात) च्यायला, आता मी कोरडेचा बॉस की हाच माझा बॉस…

कोरडे: काय म्हणताय्? (कॉफी संपवतो)

अभिजीत: अं, अं. काही नाही. आता त्या दिशेनं विचार करायला हवा असं म्हणतोय्.

कोरडे: हां मग ठीक आहे. आणखी एक गोष्ट.

अभिजीत: आता काय?

कोरडे: पुढच्या महिन्यात स्पेनमध्ये एक फार्मा प्रॉडक्शन कंट्रोलवर कॉन्फरन्स आहे. मला ती अटेंड करायची इच्छा आहे. तेव्हा… (जाण्यासाठी उठतो)

अभिजीत: समजलं. तुम्ही पण एक काळजी घ्या.

कोरडे: काय?

अभिजीत: आपल्या खरे साहेबांना सांभाळा. नाहीतर ते या वाढीव प्रॉडक्शनमध्ये काहीतरी खोडा घालतील.

कोरडे: हां. बरं झालं तुम्ही आठवण केलीत ते. तेही काम तुम्हालाच करायचंय्.

अभिजीत: (दचकून) आँ? ते कसं काय बुवा?

कोरडे: तुम्हाला माहीत आहे तो चिन्मय खरे कसा बदमाश माणूस आहे ते. तो खोडा घालणारच. नाकासमोर चालणारा “स-र-ळ” माणूस आहे ना तो. या माणसांची ती खोडच असते—कुठलंही व्यवस्थित चाललेलं काम नीट होऊ द्यायचं नाही म्हणून.

अभिजीत: मग?

कोरडे: तेव्हा अशा माणसाची ब-द-ली करायची!

अभिजीत: बदली? कुठे करायची त्याची बदली?

कोरडे: आता हे काय मी सांगायचं? तुम्ही मोठे साहेब आहात. आपल्या कंपनीत खूप डिपार्टमेंटस् आहेत. सिक्युरिटी, कँटीन… बागकामाचं पण डिपार्टमेंट आहे आपल्याकडे.

अभिजीत: पण कोरडे, चिन्मय खरे वेल क्वालिफाइड माणूस आहे.

कोरडे: मग काय झालं? या कंपनीत खूप "वेल-क्वालिफाइड" माणसं भलभलत्या डिपार्टमेंटमध्ये आहेत. देऊ का यादी. किती जण तरी सडतायत बिचारे. त्यात अजून एक… (जातो.)

अभिजीत: (कपाळावर हात मारून घेतो) ओ माय गॉड… हे प्रकरण मारुतीच्या शेपटासारखं वाढतच चाललंय्.

## अंक दुसरा

### प्रवेश ७

*(चिन्मय आणि विशाखा हॉटेलच्या कोपऱ्यातल्या टेबलापाशी शेजारी-शेजारी बसून कॉफी आणि सँडविचचा आस्वाद घेत आहेत.)*

चिन्मय: विशाखा, तू पुन्हा मला बोलवलंस. मला कळत नाहीये. तू तर चांगल्या मूडमध्ये दिसत्येयस् मग…

विशाखा: चिन्मय, आत्ता तरी सगळं ठीक दिसतंय् पण मला भीती वाटत्येय्.

चिन्मय: भीती? भीती कसली? मला तर असं कंपनीत असं दिसतंय् की अभिजीतवरचं संकट टळलंय्.

विशाखा: त्याचीच तर भीती वाटत्येय् मला.

चिन्मय: विशाखा, नीट सांगशील का मला? संकट टळलंय् तर भीती कसली?

विशाखा: कदाचित् ही वादळापूर्वीची शांतता असेल अशी मला भीती आहे.

चिन्मय: का?

विशाखा: संकट टळल्यासारखं दिसतंय् खरं पण ते तात्पुरतं असू शकेल.

चिन्मय: तुला असं का वाटतं?

विशाखा: (चिन्मयचा हात हातात घेऊन) अरे त्याचं फोनवर जे बोलणं ऐकलं ना त्याच्यावरून मला असं मनात येतंय् की ही जी सुटका झालीय् ती तात्पुरती असू शकेल.

चिन्मय: काय ऐकलंस तू?

विशाखा: क्युअरनेटचे डायरेक्टर अभिजीतला सांगत होते की त्यांचे संबंध मंत्र्यांशी असल्यानं काहीही होणार नाही.

चिन्मय: अरे बाप रे.

विशाखा: का रे असं का म्हणतोस?

चिन्मय: म्हणजे हे रॅकेट फार वरपर्यंत पोचलंय्.

विशाखा: (चिन्मयच्या हातात हात गुंफून) कशावरून?

चिन्मय: वेडी आहेस का? मंत्री उगीच कुणाला सोडवणार नाहीत प्रकरण दाबून. त्यांचाही हात असला पाहिजे या सगळ्या प्रकरणात.

विशाखा: खरंच की. माझ्या लक्षातच आलं नाही हे. पण आत्ता तरी अभी रिलॅक्स्ड दिसतोय्.

चिन्मय: तू आत्ताच ही संधी साधून अभिजीतला ही नोकरी सोडायला सांग. एकदा प्रकरण जुनं झालं की त्याला त्यातून निसटणं सोपं जाईल. रॅकेटचा संशय आल्यामुळंच नोकरी सोडली असा काही तरी बचाव पुढं तशी वेळ आलीच तर करता येईल.

विशाखा: खरंच—चिनू, यू आर ग्रेट! (चिन्मयला घट्ट मिठी मारण्याचा प्रयत्न करते)

चिन्मय: (मिठीतून सोडवून घेतो) मलाही तुला एक सांगायचंय. मी अजून ते कुणालाही सांगितलं नाहीये… अगदी इराला सुद्धा!

विशाखा: सांग ना, सांग.

चिन्मय: अग, मी आता क्युअरनेट सोडण्याच्या विचारात आहे.

विशाखा: ओ माय गॉड... खरंच?

चिन्मय: येस. तू सांगू नकोस कुणाला—आणि अभिजीतला तर सांगू नकोसच...

विशाखा: अरे, कुठं आमचं एवढं बोलणं होतंय्? तुला सांगितलंवतं ना? आमच्यातला संवादच गायब झालाय्. नाही म्हणायला हल्ली अभी जरा थोडं बोलतो—कारण त्याला संकट टळल्यासारखं वाटतंय्. पण मी नाही सांगणार कुण्णाला.

चिन्मय: तुला डॉ. सुकुमारन् माहित्येयत का?

विशाखा: कोण? डॉक्टर...

चिन्मय: सुकुमारन्

विशाखा: (वरती पाहून आठवते) पूर्वी क्युअरनेटमध्ये होते ते? असे उंच आणि बारीक...

चिन्मय: हां, हां तेच. म्हणजे मी ते असताना क्युअरनेटमध्ये नव्हतो पण त्यांचं या फील्डमधलं म्हणजे फार्मामधलं—रेप्युटेशन खूप मोठं आहे. आम्ही पूर्वी एकत्र काम केलेलं आहे माझ्या आधीच्या कंपनीत. ते मला चांगलं ओळखतात.

विशाखा: बरं मग?

चिन्मय: ते आता एका कंपनीमध्ये डायरेक्टर आहेत. एकदम सरळ माणूस—स्ट्रेट. विशाखा, या लोकांचं आजूबाजूला—म्हणजे इतर कंपन्यांतल्या लोकांकडे लक्ष असतं.

विशाखा: त्यांनी तुला ऑफर दिलेली दिसत्येय्.

चिन्मय: करेक्ट. अ‍ॅज इट इज मला इथल्या म्हणजे क्युअरनेटच्या लोकांनी—इन्क्ल्युडिंग युअर हजबंड—जगणं अवघड करून टाकलंय्. माझी नॉन-टेक्निकल खात्यात बदली करण्याचं घाटतंय्, मी त्यामुळं विचार करतोय्…

विशाखा: पण तू इथंच राहणारेस ना?

चिन्मय: मोठं जबाबदारीचं काम आहे. त्यामुळं अनेक शहरांत जावं लागेल—अगदी फॉरेनला सुद्धा. पण इथं देखील यावं लागेल अधून-मधून.

विशाखा: (चेहरा पडतो) आय विल मिस यू. शिवाय तू बिझी राहणार. म्हणजे आपली भेट कधी व्हायची?

चिन्मय: बघू या. आत्ता इथं क्युअरनेटमध्ये मला बाजूलाच केलंय् बरंचसं. त्यामुळं इथं मला जबाबदारीचं तर सोडाच—फारसं कामच नाहीय्. त्यामुळं नवीन कंपनीत काम तर असणारच पण तरी त्यातून वेळ मिळाला तर…

विशाखा: चिन्मय, यू आर डिसपॉइंटिंग मी.

चिन्मय: हे बघ त्याला नाइलाज आहे. इथं मी सडतोय्. मला चांगली अपॉर्च्युनिटी मिळत्येय् तर तुला खरा आनंद व्हायला हवा.

विशाखा: हो, अरे आनंद तर आहेच पण… तू भेटणार नाहीस ना.

चिन्मय: पण आता अभिजीतचं गाडं रुळावर येतंय्. शिवाय विक्रमही सुधारतोय्. आता जर विक्रम नॉर्मल झाला तर आमची नेहा त्याला स्वीकारणार आहे तेव्हा आपली भेट होईलच. आणि तसं झालं तर

आपण व्याही-विहीण होणार तेव्हा आपल्याला सांभाळूनच राहायला हवं. इतके दिवस मी तुला गरज होती म्हणून साथ दिली पण आता…

विशाखा: (स्फुंदत, रडत) हे असंच होईल असं मला सांगता येत नाहीये रे. अभी कसा आहे तुला माहीत आहे ना—तो अँबिशस आहे. मला भीती वाटत्येय् की तो माझं ऐकणार नाही. तो पुन्हा त्याच मार्गानं गेला तर?

चिन्मय: तर—तर काय? आपलं नशीब दुसरं काय?

विशाखा: मग काय करायचं?

चिन्मय: लेट्स होप फॉर द बेस्ट.

## अंक दुसरा

### प्रवेश ८

*(अभिजीतची केबिन. चिन्मय समोर बसला आहे.)*

अभिजीत: चिन्मय, मॅनेजमेंटनं असं ठरवलंय् की कंपनीला तुझ्या ज्ञानाचा अधिक उपयोग व्हायला हवा. त्या दृष्टीनं...

चिन्मय: हिअर इट कम्स.

अभिजीत: (दुर्लक्ष करीत) तुझी बदली करायची असं ठरलं आहे.

चिन्मय: म्हणजे निर्णय झाला आहे.

अभिजीत: हां—यू कॅन से लाइक दॅट.

चिन्मय: कट आउट एव्हरीथिंग. मला तसं लेटर असेल तर द्या.

अभिजीत: ऑफ कोर्स. नो नीड टु बी कर्ट. (टेबलावरच्या कागदांतून कागद काढून देतो.)

चिन्मय: (वाचतो) हं. नॉलेज डिस्ट्रिब्यूशन. वा: छान गोंडस नाव आहे. म्हणजे कुठून तरी आलेल्या मेल सर्वांना पाठवायच्या एवढंच काम. पण आत्ता काहीच काम नाहीये त्यापेक्षा बरंय्.

अभिजीत: चिन्मय, यू डोंट नीड टु बी सरकॅस्टिक. हे बघ हा मॅनेजमेंटचा निर्णय आहे.

चिन्मय: हं. मॅनेजमेंट—अ कोटेरी ऑफ सेल्फिश गाइज्...

अभिजीत: हे बघ तुला ही बदली आवडत नसेल तर तू तसं कळवू शकतोस. आणि मॅनेजमेंटच्या मर्जीत राहायचं असेल तर थोडी फार तत्त्वांना मुरड घालावीच लागते हे मी तुला मागेच सांगितलं होतं.

चिन्मय: थोडी फार? की पूर्ण तिलांजली? मीही तुला—नव्हे तुम्हाला—मागेच सांगितलं होतं की तत्त्वांना मूठमाती देऊन या असल्या मॅनेजमेंटच्या हितासाठी काम केलं की काय होतं ते. इट ओन्ली लीड्स टु डिझास्टर. आणि मला वाटतं यू जस्ट टेस्टेड इट अ फ्यू डेज अगो…

अभिजीत: तुला पटायचं नाही चिन्मय पण बोल्ड मुव्ह किंवा बोल्ड डिसीजन घेतले की खूप फायदेशीर होतं—इट्स ॲडव्हेंचर!

चिन्मय: फायदेशीर? पण कुणासाठी? आणि ज्याला तू बोल्ड मुव्ह किंवा ॲडव्हेंचर म्हणतोयस् ना ते मिसॲडव्हेंचर आहे. यू आर अ रेकलेस फेलो.

अभिजीत: अरे रेकलेस होण्यातही काय मजा आहे ना ती तुझ्यासारख्या तत्त्ववादी माणसाला नाही कळणार. रेकलेस वागणं म्हणजे कसं बेभान आणि बेधुंद झाल्यासारखं वाटतं.

चिन्मय: हं! बेंजामिन फ्रँकलिन याबाबत काय म्हणतो ते माहीत आहे का?

अभिजीत: काय?

चिन्मय: तो म्हणतो—Reckless youth makes rueful age. तुझ्या लक्षात कसं येत नाही की तरुणपणातलं बेबंद, उच्छृंखल वागणं हे पुढील काळात वेदनादायक ठरतं.

अभिजीत: अरे असं तत्त्वांनी चालायला हे काय सत्ययुग आहे का?

चिन्मय: नाहीये पण ते आपल्याला आणायचंय्.

अभिजीत: हा आपला वाद न संपणारा आहे. तेव्हा तू या बदली नोटीसवर सही कर किंवा मान्य नसल्यास तसं लिहून दे.

चिन्मय: म्हणजे याहीपेक्षा बुद्रुक काम किंवा माझ्या कौशल्याशी निगडित नसलेलं नवीन काहीतरी तुम्हाला शोधून काढावं लागेल.

अभिजीत: का उगीच मॅनेजमेंटशी पंगा घेतोयस्?

चिन्मय: मी मॅनेजमेंटशी पंगा घेतोय् की मॅनेजमेंट—किंवा तुमचा ग्रुप माझ्याशी पंगा घेतोय्? पण ते जाऊ दे. द्या तो कागद इकडं. कुठं सही करायचीय्? नाहीतरी काही दिवसांचाच प्रश्न आहे.

अभिजीत: (आश्चर्यानं) म्हणजे?

चिन्मय: म्हणजे—मॅनेजमेंटचं नाही ऐकलं तर माझ्यावर इनसबॉर्डिनेशनचा ठपका ठेवला जाईल आणि ऐकलं तर अपमानास्पद वागणूक सहन करावी लागेल. म्हणजे इकडे आड आणि तिकडे विहीर असंच की नाही? तेव्हा काही दिवसातच इथून निघून जावं हेच बरं नाही का?

अभिजीत: कुठं जाणारायस्?

चिन्मय: ते मी कसं सांगणार?

अभिजीत: चिन्मय, तुझा जुना मित्र म्हणून सांगतो. का उगीच अशी टोकाची भूमिका घेतोस? अरे तू दुसरीकडे जॉइन झालास आणि मॅनेजमेंटनं ठरवलंच तर ते तुला दुसऱ्या कंपनीतही नोकरी मिळवणं दुरापास्त करू शकतील.

चिन्मय: अस्सं?

अभिजीत: खरंच. मला माहीत आहे अशा केसेस. अरे अनदर नेम ऑफ लाइफ इज काँप्रमाइज…

चिन्मय: काँप्रमाइज म्हणजे थोडक्यात मी या कंपनीत तुम्हा लोकांचा गुलाम म्हणून काम करत राहायचं. स्वतःची अस्मिता, स्वत्व हे सगळं गहाण ठेवून. आता मी तुझा माजी मित्र म्हणून एक अनुभवाची गोष्ट सांगतो. इथल्या मॅनेजमेंटच्या सल्ल्याला काडीमात्र किंमत न देता स्वच्छ व्यवहार करणाऱ्या कंपन्याही जगात आहेत. आणि तिथं माझ्यासारख्याला आपल्या ज्ञानाचा उपयोग करून बरंच काही कमावता येतं—अगदी पैसा आणि खोटी नव्हे तर खरीखुरी प्रतिष्ठा.

अभिजीत: चिन्मय…

चिन्मय: आणि तू ऐकणार नसलास तरी मित्र म्हणून सांगणं माझं कर्तव्य आहे. ज्या मार्गावर तू वाटचाल करतोयस्—दॅट विल लीड यू टु डिझास्टर. आय होप द डे डजंट डॉन.

अभिजीत: यशस्वी माणसाचा हेवा करणारी माणसंही जगात खूप असतात. त्यांनी मिळवलेलं यश, मानमरातब काही लोकांच्या डोळयात खुपत असतो हे मला माहीत आहे.

चिन्मय: तू भ्रमात आहेस. तुझं हे सो कॉल्ड यश हे तात्पुरतं—सत्तेनं मिळवलेलं असल्यानं अळवावरचं पाणी आहे. एक दिवस असा येईल की तुला हे माझं म्हणणं आठवेल आणि आपली चूक तुझ्या लक्षात येईल. आय कॅन ओन्ली प्रे दॅट द डे डजंट डॉन. (अभिजीतनं समोर ठेवलेल्या कागदावर सही करतो) गुडबाय मि. अभिजीत अग्निहोत्री.

(अभिजीत पाहतच राहतो)

अभिजीत: अरे चिन्मय, वुइ कॅन स्टिल बी…

चिन्मय: (दारातून बाहेर जाताना क्षणभर मागे वळून) तुला थॉमस बेकेटची गोष्ट माहीत आहे का?

अभिजीत: हां, हो कॉलेजात असताना वाचलेली. त्याचा पिक्चर पण पाहिला होता.

चिन्मय: मग अजून एकदा नीट वाच. पीपल वरशिप थॉमस बेकेट—नॉट किंग हेन्ऱी द सेकंड. बेकेट तर संत झाला… (जातो.)

## अंक दुसरा

### प्रवेश ९

*(एका पार्क बेंचवर विक्रम आणि नेहा बसलेले आहेत)*

विक्रम: तुला कॉफी आवडते हे मला माहीत आहे. आज तू माझ्याबरोबर कॉफी घ्यायचीस.

नेहा: ओके. पण आपण इथंच बसू. मला इथं छान वाटतंय्. तू कॉफी घेऊन ये.

*(विक्रम कॉफी आणायला जातो)*

नेहा: (स्वतःशीच) सो फार सो गुड. विक्रम आता ड्रग्जच्या विळख्यातून व्यवस्थित सुटलाय्. आता पुढचं सगळं कसं करतोय् ते बघायचं. तो स्वतःच्या कर्तृत्वावर पुढं आला पाहिजे. मी आईबाबांना चॅलेंज दिलाय्.

*(विक्रम कॉफी घेऊन येतो. एक कप तिला देऊन नेहाशेजारी बसतो.)*

विक्रम: नेहा, नेहा.

नेहा: येस?

विक्रम: मला तुला एक गोष्ट सांगायच्येय्.

नेहा: मग सांग की.

विक्रम: अंहं. कानात सांगायचीय्.

नेहा: (कान पुढं करते) बरं मग कानात सांग.

विक्रम: (कानात पुटपुटतो) आय लव्ह यू, नेहा.

नेहा: (त्याच्याकडे निरखून पाहत) ओ आय सी.

विक्रम: बट डु यू…

नेहा: (सावकाशपणे खेळवीत म्हणते) आय—आय लव्ह—यू—टू!

विक्रम: ओ गॉड! (कप बाजूला ठेवतो आणि नेहाला घट्ट मिठीत घेतो. नेहा मिठी सोडवते.)

नेहा: विक्रम, स्टॉप इट्.

विक्रम: काय झालं? यू सेड…

नेहा: आय सेड आय लव्ह यू. दॅट डझंट मीन यू कॅन टेक लिबर्टीज् विथ मी.

विक्रम: का पण असं?

नेहा: हे बघ तू मला जुन्या वळणाची म्हण नाहीतर काही म्हण पण तू अजून काही गोष्टी मला हव्या तशा केल्यास तरच…

विक्रम: तरच काय?

नेहा: तरच आय विल हॅव रिलेशनशिप विथ यू.

विक्रम: (कपाळाला हात लावतो) आता काय तुझ्या कंडिशन्स आहेत? तुझ्या इच्छेप्रमाणे मी ड्रग्जच्या तावडीतून बाहेर पडलो ना. अगदी तुला शंका असून सुद्धा? त्यामुळं डॅडींनाही त्रास सहन करावा लागला.

नेहा: त्यांना त्रास झाला तो तुझ्या ड्रग्ज सोडण्यामुळे नव्हे तर वेगळ्या कारणासाठी. पण माझी अशी कंडिशन आहे की जोपर्यंत तू

स्वतंत्रपणे तुझ्या पायांवर उभा राहत नाहीस तोपर्यंत मी तुझ्याशी लग्न करणार नाही आणि आपली रिलेशनशिपही होणार नाही.

विक्रम: पण डॅडींपर्यंत पोलीस जरी पोचले तरी ते त्यांना काहीही करू शकले नाहीत. माझ्या इन्फ्लुएन्शिअल डॅडींची मी मदत घेतली तर काय हरकत आहे?

नेहा: यू डोंट नो—ऑर यू आर शोइंग दॅट यू डोंट नो. ते त्यांच्या हाय कनेक्शन्समुळं वाचले. पण ते कधीही अडकू शकतात.

विक्रम: तू काय बोलत्येयस् ते तुला समजतंय् ना?

नेहा: व्हेरी मच. तुला हे मान्य होत नसेल तर मी तुझ्यापासून दूर जाईन—फॉरेव्हर.

विक्रम: पण त्यांनी असं काय केलंय्? ही इज अ बिग बॉस इन हिज कंपनी...

नेहा: ऐकायची तयारी आहे तुझी?

विक्रम: बोल तू. मी ऐकतोय्.

नेहा: तू ज्या चक्रात सापडला होतास तो चक्राचा एक वेगळाच भाग आहे. तुझे डॅडी—ते त्यांच्या कंपनीत मोठे बॉस असले तरी—तेही या चक्राचा एक भाग आहेत—द ड्रग रिंग...

विक्रम: (ताडकन् उठतो आणि हातात डोकं धरून पुन्हा खाली बसतो) काय? टेरिबल—इफ इट इज ट्रू.

नेहा: इट इज ट्रू...

विक्रम: तुला कसं माहिती?

नेहा: माझे बाबा निष्कारण या चक्रात अडकत होते पण ते वेळीच सावध झाले म्हणून वाचले. आणि आता तर ते क्युअरनेट सोडताहेत.

विक्रम: आय डोंट बिलीव्ह इट.

नेहा: देन डोंट. आणि मग ही आपली शेवटची भेट असं समज. (उठून उभी राहते)

विक्रम: (ताडकन् उठतो) प्लीज, प्लीज. नेहा, डोंट डू धिस टु मी. तूच माझी सर्व काही आहेस. (तिला खाली बसवतो.)

नेहा: तू तुझ्या डॅडींची मदत न घेता स्वतःच्या पायावर उभा राहा आणि मग मी तुझी होईन. बट नॉट अंटिल देन.

विक्रम: ओके. ओके. पण मग मी एक सामान्य माणूस होऊ शकतो. चालेल तुला?

नेहा: चालेल काय पळेल! कारण तू सामान्य असलास तरी ***माणूस*** होशील ना! (दोघेही हसतात.)

## अंक दुसरा

### प्रवेश १०

*(मागील प्रवेशापासून जवळजवळ एक वर्षाचा अवधी लोटलेला आहे. चिन्मय आणि इरा एका नव्या अधिक 'पॉश' घरात राहायला आलेले आहेत. दोघेही सोफ्यावर बसून बीअर पीत बसलेले आहेत.)*

इरा: काळ कसा भराभर निघून जातो नाही? काही महिन्यांपूर्वीच तुझ्यावर क्युअरनेटमध्ये संक्रांत आली होती. आणि आता?

चिन्मय: मला अभिजीत, कोरडे आणि गँगच्या कारवायांबद्दल संशय यायला लागलाच होता. मी खबरदारीचे सर्व उपाय घेतले म्हणून त्यांच्या षडयंत्रातून सहीसलामत सुटलो. नाहीतर आत्ता मी "सलाखों के पीछे" असतो. आणि तू मला टिफिनचा डबा घेऊन "सुनोऽऽ नेहा के पिताजीऽऽ आपके लिए खाना लायी हूँ" असं म्हणत तिथं आली असतीस. (दोघेही खळखळून हसतात)

इरा: मला खरंच असं वाटतंय् की अभिजीतनं असं का केलं? म्हणजे तो व्यवस्थित काम करत राहिला असता तरी चांगल्यापैकी पुढं गेला असता. का? का? असं त्यानं करावं? अगदी आपल्या जवळच्या मित्राचा बळी देण्यापर्यंत त्याची मजल का जावी?

चिन्मय: इरा लोभ, हाव म्हणून जो काय प्रकार आहे ना तो माणसाला अंध बनवतो. त्याची सदसद्विवेक बुद्धी—कॉन्शन्स—तो घालवून बसतो.

इरा: मला लहानपणी ऐकलेली किंवा वाचलेली गोष्ट आठवतेय्.

चिन्मय: कोणती गोष्ट?

इरा: एक भिकारी देवाकडे संपत्तीची मागणी करतो. देव प्रसन्न होऊन त्याला वर देतो पण सांगतो की जी मी सोन्याची नाणी देईन ती तू जमिनीवर पडू देऊ नकोस. ती जमिनीवर पडली तर त्यांची माती होईल. भिकारी फाटक्या झोळीत नाणी घेऊ लागतो. लोभानं आणखी, आणखी अशी मागणी करतो. शेवटी त्याची जीर्ण झोळी फाटून सगळ्या सोन्याची माती होते. लोभामुळं असंच काहीसं होऊन अभिजीतवर असली वेळ येऊ दे नको.

चिन्मय: अशीच एक दुसरी गोष्ट आहे ती याहीपेक्षा भयानक आहे.

इरा: ती कोणती?

(तेवढ्यात नेहा येते आणि त्यांच्या शेजारी बसते)

नेहा: बाबा, मी घेऊ थोडी बीअर? (इरा डोळे वटारते पण चिन्मय स्मित करतो.)

चिन्मय: येस, येस. व्हाय नॉट? माय डॉल हॅज नाउ ग्रोन अप…

इरा: चिन्मय, तू म्हणजे ना नेहाला अगदी लाडावून ठेवलंयस्…

चिन्मय: शी इज अ सेन्सिबल गर्ल. पण नेहा तूही ही गोष्ट ऐक.

नेहा: गोष्ट? हो ऐकते की. (एका ग्लासात बीअर ओतते आणि दुसऱ्या हातानं बशीतले काजू तोंडात टाकते.)

चिन्मय: ब्राझीलमध्ये अमेझॉनच्या जंगलात लोक माकडं कशी पकडतात माहित्येय्?

इरा आणि नेहा: (एकदम) नाही.

चिन्मय: एका अरुंद तोंडाच्या बरणीमध्ये शेंगदाणे, काजू असे नट्स ठेवून ती बरणी झाडाला बांधून ठेवतात. माकड बरणीत हात घालून मुठीत नट्स घेतं. मूठ मोठी असल्यानं बरणीबाहेर येऊ शकत नाही. मूठ सोडली तर हात बाहेर येईल पण दाणे मिळणार नाहीत. लोभानं माकड मूठ सोडत नाही आणि हात अडकून बसतो. पारधी शांतपणे येऊन माकडाला पकडून घेऊन जातात.

नेहा: येस, येस. म्हणजे मिळत असताना कुठं थांबायचं ते कळलं पाहिजे.

इरा: आमचा विषय अभिजीतबद्दल चालला होता. अभिजीतलाही कदाचित् कुठं थांबावं ते कळलं नसावं. लोभापायी त्यानं आपल्या जवळच्या मित्राचाही बळी देण्याची वेळ आणली.

चिन्मय: इरा, तुझ्या गोष्टीतला भिकारी संपत्तीच गमावून बसला. पण या गोष्टीतल्या माकडाप्रमाणे अभिजीत पकडला जाऊ नये म्हणजे मिळवली.

नेहा: तसं होऊ शकतं.

चिन्मय: म्हणजे?

नेहा: विक्रम आता पूर्णपणे ड्रग्जमधून बाहेर आलाय. मी त्याला तशी कंडिशनच घातली होती की माझी मैत्री हवी असेल तर त्यानं ड्रग्जपासून पूर्णपणे दूर राहिलं पाहिजे आणि स्वतःच्या पायावर उभं राहिलं पाहिजे.

इरा: मग?

नेहा: त्याला संगीताची खूप आवड आहे...

चिन्मय: (हसत) आता ही संगीता कोण?

नेहा: (चिन्मयला हलकासा धक्का देत) असं काय करता हो बाबा? त्याला म्युझिकची खूप आवड आहे आणि गॅजेट्स आणि सॉफ्टवेअरवर पण त्याची चांगली हुकूमत आहे.

इरा: पण तू अभिजीतवर गदा येऊ शकते असं काहीसं म्हणत होतीस ना?

नेहा: हं हो. विक्रमला समज देऊन पोलिसांनी सोडून दिलं होतं. पण बदल्यात त्यांनी कोण ड्रग्ज सप्लाय करतं वगैरे माहिती मागितली आणि "कोणीही तुला त्रास देणार नाही" अशी हमी दिली. त्या माहितीनुसार पोलिसांनी अनेकांना ताब्यात घेतलं. त्यात क्युअरनेटचे अधिकारीही गुंतलेले आहेत असं त्यांना समजलं. अर्थात् हे विक्रमला माहीत नव्हतं.

चिन्मय: पण पोलिसांनी चौकशी करूनदेखील अभिजीत त्यातून निसटला होता. इन फॅक्ट त्यानंच मला फुशारकीनं तसं सांगितलं होतं. अर्थात् त्यालाही वर्ष झालंय् आता.

नेहा: एक्झॅक्टली. ती गोष्ट वर्षापूर्वीची होती. त्यावेळी त्या प्रकरणात असलेल्या मंत्र्यानं आपलं बळ वापरून क्युअरनेटच्या एक्झिक्युटिव्हना वाचवलं.

इरा: मग आता काय झालं?

नेहा: आता निवडणुका आल्यायत. बहुधा सरकार बदलेल. सामाजिक संस्थांनी ड्रग्ज प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केल्येय्.

चिन्मय: टफ टाइम.

नेहा: तो मंत्री—निंबोरे पैसे चारून निवडून येण्याचा प्रयत्न करतोय् पण चान्सेस आर...

चिन्मय: दॅट ही विल लूझ...

नेहा: येस. तसं झालं तर अभिजीतकाकांवर संकट येऊ शकतं.

इरा: पण मग विक्रम?

नेहा: विक्रमला काही होणार नाही. ही इज क्लीन नाउ. आणि मला अभिजीतकाकांना काही तरी होईल असं वाटतंय् म्हणून मी त्याला स्वतःच्या पायावर उभं राहायला सांगितलं. सो ही विल हॅव नो ट्रक विथ अभिजीतकाका नाउ.

चिन्मय: (नेहाला जवळ घेऊन तिची पाठ थोपटतो) दॅट इज माय गर्ल... स्मार्ट.

इरा: पण अभिजीतबद्दल वाईट वाटतं.

चिन्मय: पण त्याला आपण काय करणार? काळे ढग की पांढरे ढग? चॉइस तुमचाच असतो फक्त. मी त्याला मित्र म्हणून सावध केलं होतं. पण तो बेफिकीर राहिला आणि उलट मलाच त्याच्या कंपूत सामील व्हायला सांगू लागला. सो अॅज यू—

नेहा: रीप. बरोबर आहे. जसं तुम्ही पेराल तसंच उगवणार.

चिन्मय: मला वाटतं अजूनही त्याला यातून बाहेर पडण्याची संधी आहे. त्यानं झालेलं सगळं पोलिसांना सांगावं. कदाचित् तो पूर्णपणे सुटणार नाही पण त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार होऊ शकेल.

इरा: चिन्मय, चिन्मय...

चिन्मय: काय?

इरा: तू त्याला फोन करून तसं सुचवशील का?

चिन्मय: इरा, ती वेळ आता निघून गेली आहे.

(तितक्यात जवळच्या मोबाइलची रिंग वाजते)

इरा: (नंबर बघून आश्चर्यचकित होते. मोबाइल चिन्मयला देते) घे तुझाच आहे. काय योगायोग आहे पाहा—अभिजीतचाच आहे.

चिन्मय: (फोनमध्ये ऐकून बोलतो) हो, हो… मी गेलोय् पूर्वीचं सगळं विसरून… पण ते कसं शक्य आहे आता? बेस्ट इज् यू शुड टॉक टु द कॉप्स… मग तूच ठरव काय ते… (फोन ठेवतो आणि नेहाकडे वळून बोलतो) तुझं म्हणणं अगदी खरं ठरतंय् बघ, माय डिअर. अभिजीतला संशय आहे की त्याच्या मागे पुन्हा पोलिसांचा ससेमिरा लागणार आहे. पोलिसांच्यातल्याच कुणीतरी त्याला ही माहिती पुरवलीय् म्हणे.

नेहा: मग काय सांगितलंस तू, बाबा?

इरा: हां, काय उपदेश केलास?

चिन्मय: काही नाही. मी त्याला पोलिसांशी को-ऑपरेट करायला सांगितलं.

नेहा: मला तर असं वाटतंय् की या सगळ्याचा कुठंतरी शेवट होणारेय्. फक्त तो वाईट होऊ नये म्हणजे मिळवली…

## अंक दुसरा

### प्रवेश ११

*(पुन्हा एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. बागेमध्ये नेहा आणि विक्रम एका बाकावर बसले आहेत.)*

विक्रम: नेहा, किती दिवसांनी भेटतो आहोत नाही आपण?

नेहा: दिवसांनी काय? महिन्यांनी. आणि तू महत्त्वाचं बोलायचंय् म्हणून गळ घातलीस ना म्हणून आल्येय्. ॲक्चुअली मलाही तुला भेटून काही सांगायचं होतंच...

विक्रम: मग सांग ना.

नेहा: नाही आधी तू सांग.

विक्रम: नाही आता तू सांगायचंस. कारण मी काही तरी सांगणार आहे—महत्त्वाचं—हे तुला आधीपासून माहीत आहे. पण तुला काय सांगायचंय् ते मला कंप्लीट सरप्राइज आहे. तेव्हा...

नेहा: ओके. ओके. सांगते मी. अरे, मला एक चांगली नोकरी मिळल्येय्. मी बी.एस्सी. करता करता कॉंप्युटर प्रोग्रॅमिंग शिकत होते ना तर मला एका लॅबनं रिसर्च करण्याकरता बोलावलंय्. इथंच आहे आणि पगारही चांगला आहे. बस्स आता रिझल्ट लागला की जॉइन व्हायला सांगितलंय्. माझं करीयर आणि बाबांबद्दल रिस्पेक्ट असल्यामुळं ईझी झालं.

विक्रम: कॉंग्रॅट्स. (नेहाचा हात हातात घेतो)

नेहा: थँक्स. आता तू सांग.

विक्रम: मीही बी.कॉम. होतोय् या वर्षी. पण त्यापेक्षाही मी—मी…

नेहा: अरे मी—मी काय करतोयस? बोल ना पुढं.

विक्रम: मी व्यवसाय करायचा ठरवलंय्.

नेहा: म्हणजे डॅडी…

विक्रम: (घाईघाईनं) नाही, नाही. डॅडींचा यात काही संबंध नाहीये. पण मीही मध्यंतरीच्या काळात साउंड रेकॉर्डिंगचाही कोर्स केला. माझी म्युझिकची आवड तुला माहीतच आहे. त्यामुळे…

नेहा: पण रेकॉर्डिंगचा व्यवसाय करायचा म्हणजे त्याला भांडवल लागणारच. ते कुठून आणणारेस?

विक्रम: पार्टनर पैसे गुंतवणार आहे.

नेहा: पार्टनर?

विक्रम: हं…

नेहा: कोण आहे ती?

विक्रम: ती नाहीये. 'तो' आहे. त्याचे वडील डॅडींना ओळखतात.

नेहा: हां म्हणजे…

विक्रम: अग नीट ऐकून तर घे. त्यांना मी सगळं सगळं सांगितलं. मी स्वतंत्रपणे व्यवसाय करू इच्छितो हे कळल्यावर त्यांनी त्यांच्या मुलाला बोलावलं. त्याचा स्टुडिओ आहे पण त्याला म्युझिकमधलं फारसं कळत नाही. आमचं छान ट्यूनिंग झालं. मी त्या स्टुडिओचा वर्किंग पार्टनर आहे.

नेहा: कदाचित् तुझ्या डॅडींबद्दल माहीत असल्यानं तुला मदत करायची इच्छा त्यांना झाली असेल.

विक्रम: असं का बोलतेस तू, नेहा. तुझ्या डॅडींना लॅबचे डायरेक्टर ओळखत असल्यानं तुला जॉब मिळाला असं मी म्हटलं तर आवडेल का तुला?

नेहा: सॉरी, सॉरी. माझी खात्री पटल्येय् की तू आता स्वतःच्या पायावर उभा राहतोयस् म्हणून. काँग्रॅट्स.

विक्रम: थँक यू. पण खरंच ना तुझी खात्री झाल्येय्?

नेहा: खरं, अगदी खरं.

विक्रम: (खिशातून कागदात गुंडाळलेलं बारीक पुडकं काढतो) मग आता याला हरकत नाहीये...

नेहा: कशाला?

विक्रम: (पुडक्यातून एक गुलाबाचं फूल काढतो आणि नेहापुढे गुढगा टेकून तिला ते नजर करतो) नेहा, आय लव्ह यू. तू माझ्या प्रेमाचा स्वीकार करून माझी जोडीदार होशील का?

नेहा: अंऽऽऽ विचार करून सांगते. (मुद्दाम काही काळ विक्रमला ताटकळत ठेवते)

विक्रम: आता माझा पुतळा होईल हं...

नेहा: हा होणारा पुतळा मला जोडीदार म्हणून मान्य आहे.

(दोघेही एकमेकांच्या मिठीत जातात.)

नेहा: ए, पण तुझ्या डॅडी-ममीचं काय?

विक्रम: त्यांचं काय?

नेहा: त्यांना हे पसंत पडेल का?

विक्रम: ममीला तर पसंत आहे. डॅडींचं म्हणशील तर त्यांची परिस्थिती फार बिकट झाल्येय्.

नेहा: का? काय झालं?

विक्रम: त्यांच्या मागं आता चौकशीचा भुंगा सुरू झालाय्. त्यांना झोप लागत नाही. मग झोपेच्या गोळ्या, ड्रिंक...

नेहा: अरे बाप रे!

विक्रम: पण त्यांचा काही या परिस्थितीत प्रश्न येईल असं वाटत नाही. इन एनी केस मी आता त्यांच्याबरोबर राहणार नाहीये.

नेहा: काय सांगतोयस काय? खरंच?

विक्रम: येस.

नेहा: पण त्यांना तुझी गरज भासली तर? खरं तर तू जवळ असणं जरुरी आहे.

विक्रम: ते मला कळतं पण नाइलाज आहे. त्यांच्याकडे पाहून आणि त्यांच्याजवळ राहून मी काम करणं अशक्य आहे. मात्र मी सांगितलंय् की मी गावातच अगदी जवळ आहे आणि कधीही गरज पडेल तेव्हा मी धावत येईन. I know it is a difficult decision but then I have to think about future.

नेहा: खरंय् तू म्हणतोयस् ते. लांब राहिलास तरी त्यांची काळजी घेणं तुझं कर्तव्य आहे.

विक्रम: खरं तर मी या आठवड्यातच माझ्या—आमच्या स्टुडिओच्या वरती तीन रूमचा फ्लॅट आहे तिथं राहायला जातोय्. ती बिल्डिंग पार्टनरच्याच मालकीची असल्यानं आम्ही ॲडजस्ट करणार आहोत. अग, आणि काम खूपच आलंय्.

नेहा: काम कशा प्रकारचं असतं?

विक्रम: आम्ही मिक्सिंग, डबिंग सगळं करतो पण महत्त्वाचं आणि क्रिएटिव्ह काम म्हणजे म्युझिक अ‍ॅरेंजिंग…

नेहा: म्हणजे गाण्याच्या मधे मधे जे तुकडे लागतात ते ना?

विक्रम: नुसतं तेच नाही तर अगदी पिक्चरमध्ये सीन्स असतात ना—कारचा पाठलाग, सकाळचा सीन—त्यांना सुद्धा जे बॅकग्राउंड पीसेस लागतात ते आम्ही देतो.

नेहा: इंटरेस्टिंग आहे. मला पण एक चांगली गोष्ट सांगायच्येय्.

विक्रम: कोणती?

नेहा: अरे, बाबांच्या काही शोधांना पेटंट मिळाल्येत.

विक्रम: कोणते शोध?

नेहा: विक्रम, क्युअरनेट सोडून बाबा डॉ. सुकुमारन् यांच्या फार्माटॉप कंपनीत गेले हे तुला माहीत आहेच. गेल्या एक दोन वर्षात त्यांनी काही नवीन औषधं शोधून काढली आहेत. युरोप-अमेरिकेतल्या कंपन्यांनी त्यांच्या औषधांची पेटंट विकत घेऊन उत्पादन करायचं ठरवलंय्. फार्माटॉपचा खूप फायदा होतोय् त्यामुळं.

विक्रम: अरे व्वा. म्हणजे तुझ्या बाबांचा पण खूप फायदा होईल.

नेहा: हो, पण ते आता फार्माटॉपही सोडतायत.

विक्रम: का? दुसऱ्या कंपनीत त्यांना अजून वरच्या पोस्टवर बोलावलं असेल.

नेहा: नाही.

विक्रम: मग?

नेहा: अरे आपल्या देशात खूप औषधी वनस्पती आहेत. त्यांचा नीट अभ्यास करून आधुनिक पद्धतीनं लाइफ सेव्हिंग औषधं निर्माण करण्याचा त्यांचा इरादा आहे.

विक्रम: धिस इज ग्रेट. नेहा, मला माझ्या सासऱ्यांचा अभिमान वाटतो.

नेहा: एऽऽऽ अजून आपलं लग्न झालेलं नाही हं.

विक्रम: ओके—होणारे सासरे—मग तर झालं. पण तुला आणखी एक सांगायचं होतं.

नेहा: काय?

विक्रम: एकूण परिस्थितीत जेव्हा आपण लग्न करू ते रजिस्टर पद्धतीनं अगदी साधेपणानं करू या—अगदी थोड्याच मित्रमंडळी आणि अगदी जवळच्य नातेवाइकांबरोबर.

नेहा: अगदी माझ्या मनातलं बोललास.

विक्रम: (अभिनयाच्या आविर्भावात) क्योंकि हमारे खयालात काफी मिलते-जुलते हैं…

नेहा: (गुणगुणते) पंछी बनूँ उडते फिरूँ मस्त गगनमें…

## <u>अंक दुसरा</u>

### प्रवेश १२

*(चिन्मय आणि इरा सोफ्यावर बसून गप्पा मारीत बीअर पीत बसले आहेत.)*

चिन्मय: दिवसभराच्या कामानंतर रिलॅक्स झालं की किती बरं वाटतं.

इरा: हो ते खरं आहे पण झोपताना पुन्हा तुझ्या डोक्यात औषधांचे आणि वेगवेगळ्या वनस्पतींचेच विचार घोळत असतात.

चिन्मय: (बीअरचा घोट घेत) अगदी बरोबर—पण तुला सांगू का? पाथब्रेकिंग विचार रात्री झोपतानाच डोकं शांत असताना निर्माण होतात.

इरा: पण आत्ता डोकं रिकामं ठेवा म्हणजे झोपताना क्रिएटिव्ह विचार येतील.

चिन्मय: काहीतरी वेगळं बोललं किंवा पाहिलं ना की डोक्यातले भुंगे नाहीसे होतात. तेव्हा आत्ता आपण काही तरी वेगळं बोलू या.

इरा: येस्स. अरे, आपल्या रोजच्या गडबडीत आपण जगात काय चाललंय् याच्यापासून किती दूर असतो नाही?

चिन्मय: अगदी बरोब्बर. अगदी मागच्याच आठवड्यात आपण घाईघाईनं मतदान करून आलो की नाही पण... (एकदम डोक्यावरून हात फिरवीत) अरेच्या, आजच निकाल जाहीर झाले असतील नाही?

इरा: अहो महाराज. निकाल सकाळीच जाहीर झालेत. आता राज्यात नवीन सरकार स्थापन होणारे.

चिन्मय: अग मग बघू या तरी. लाव लाव बघू टीव्ही. (इरा टीव्ही लावते)

इरा: अय्या. नवीन सरकारचा उद्याच शपथविधी. चौधरी मुख्यमंत्री होणार असं दिसतंय्.

चिन्मय: (ओरडतो) कोऽऽण? चौधरी?

इरा: हो. का? काय झालं? हा तर चांगला गृहस्थ दिसतोय्. देशी संशोधनाला चालना देणार म्हणतोय्. मग चांगलं आहे की. तुमच्या संशोधनाला सरकारी मदत मिळू शकेल.

(तेवढ्यात नेहा आत येते आणि ‘हुश्श्’ करीत सोफ्यावर बसते.)

नेहा: हे काय लावलंय्? ओहो. नवीन मंत्रिमंडळ… संशोधनाला चालना… अरे व्वा. छान, छान. आमच्या कंपनीसाठी चांगली बातमी आहे. लेट मी सेलिब्रेट टू! (एक ग्लास घेऊन येते आणि त्यात बीअर ओतते) चीअर्स! (चिन्मय आणि इरा ग्लास उंचावून ‘चीअर्स करतात’)

चिन्मय: पण या चौधरीमुळं एक प्रॉब्लेम होणार आहे.

इरा आणि नेहा (एकदम): प्रॉब्लेम? कुठला प्रॉब्लेम?

चिन्मय: नाही, नाही—आपल्याला नाही पण अभिजीतसाठी प्रॉब्लेम होऊ शकतो.

इरा: अभिजीतसाठी? तो कसा काय?

चिन्मय: ज्या मंत्र्यामुळं अभिजीत सहीसलामत सुटला त्या निंबोरे मंत्र्याची पूर्ण चौकशी करून त्याला आत टाकण्याची प्रतिज्ञा चौधरीनं केली

होती. नव्हे—ते त्याचं इलेक्शन प्रॉमिस होतं. आणि हा चौधरी फार शिस्तीचा माणूस आहे.

नेहा: ओ माय गॉड. विक्रमला धक्काच बसेल.

चिन्मय: हे बघ, नेहा. जो तो आपल्या कर्मानं आपापल्या डेस्टिनेशनला पोचत असतो. विक्रमला हे माहीत असायला हवं. आणि त्याला तू समजावून सांगायला हवंस. बिकॉज यू टू लव्ह ईच अदर…

नेहा: तसा तो आई-वडिलांपासून वेगळाच राहतोय्.

इरा: हो का?

नेहा: त्यानं म्युझिक स्टुडिओचा व्यवसाय सुरू केलाय् आपल्या पार्टनरसोबत. तो स्टुडिओलगतच्या अपार्टमेंटमध्ये राहतोय्. त्याच्या बाबांची मानसिक स्थिती चांगली नाहीय्. आपल्या कामावर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून तो वेगळा राहतोय्.

चिन्मय: ओ आय सी. पण मग त्यानं त्याच्या वडिलांना आधार…

नेहा: त्यानं सांगितलंय् की "मी जवळच आहे आणि कुठल्याही संकटाच्या प्रसंगी धावत येईन…"

इरा: म्हणजे खूपच बदललाय् विक्रम आता.

नेहा: येस.

विक्रम: अँड दि क्रेडिट गोज टु माय डार्लिंग डॉटर (ग्लास उंचावून बीअरचा घोट घेतो.).

## अंक दुसरा

### प्रवेश १३

*(काही महिने उलटून गेले आहेत. नेहा एकटीच घरात पुस्तक वाचत बसली आहे.)*

नेहा: (स्वतःशीच) सुट्टीच्या दिवशी जरा बरं असतं—आपल्या मनासारखं करता येतं. नाहीतरी माझं वाचन मागंच पडलं होतं…

(आतल्या खोलीतून इराचा आवाज)

इरा: नेहा, जरा मला इथं किचनमध्ये मदत करतेस का?

नेहा: (पुस्तक खाली ठेवून) झालं कल्याण! आता कसलं वाचन आणि कसलं काय… रविवारी सुद्धा अगदी काही मनाजोगतं करता येत नाही. (उठते तेवढ्यात जवळच असलेला तिचा मोबाइल वाजतो. ती तो कानाला लावते आणि जवळ जवळ ओरडतेच.) काऽऽय? व्हॉट आर यू टेलिंग मी? पण आज रविवार आहे ना?... मग?... अरे बाप रे… मी येतेच तिकडे लागलीच…

(हात पुसत पुसत इरा तिथं येते.)

इरा: काय ग नेहा? काय झालं? ओरडलीस का?

नेहा: अग काय सांगू तुला? विक्रमच्या बाबांना—अभिजीतकाकांना अटक करायला पोलिस आलेले आहेत त्यांच्या घरी. आणि आज रविवार त्यामुळं कोर्टाला सुट्टी. जामीन वगैरे मिळण्याची शक्यताच

नाही. सोमवार-मंगळवारपर्यंत त्यांना कोठडीत राहावं लागेल असं दिसतंय्. विक्रम हताश झालाय्. आता मी तिकडंच जात्येय्.

इरा: अरे बाप रे! हे बघ इरा. तू फोन करून कळव काय होतंय् ते सर्व.

नेहा: ओके. मी पळते. (जाते)

(इरा विमनस्कपणे इकडे-तिकडे करते. सुमारे अर्धा तास गेल्याचं रंगमंचावर सूचित. म्हणजे अर्ध्या तासानं इराचा मोबाइल वाजतो.)

इरा: (मोबाइल शोधते) अग बाई कुठं ठेवलाय् मी मोबाइल आता? (मोबाइल सापडतो. फोन कुणाचा ते पाहून बोलू लागते) हं, हं बोल नेहा. काय झालं. जरा मोठ्यानं बोल… आत रेंज येत नाही… हां आता येतंय्… काऽऽय? कस्टडीत नेण्याआधी काय झालं म्हणालीस? व्हॉट? हार्ट अटॅक? मग कुठल्या हॉस्पिटलात नेतायत? ओके, ओके… मी लागलीच चिन्मयला फोन करून बोलावून घेते आणि आम्ही येतोच तिकडे.

(घाई गडबडीत चिन्मयला फोन लावायचा प्रयत्न करते. पण सुरुवातीला लागत नाही. मग एकदाचा लागतो.)

चिन्मय, अरे अभिजीतला अटक झाल्येय् पण त्याला पोलीस नेत असताना हार्ट अटॅक आलाय्. तू कधी येतोयस् इथं? ओके. वीसेक मिनिटं लागतील? ठीक आहे मग आपण जाऊ हॉस्पिटलवर…

## <u>अंक दुसरा</u>

### प्रवेश १४

*(हॉस्पिटलमधील खोली. बेडवर अभिजीत पडलेला आहे. दोन खुर्च्यांवर चिन्मय आणि इरा बसलेले आहेत.)*

अभिजीत: (क्षीण आवाजात) चिन्मय, वेळेवर आलास. उशीर केला असतास तर काही खरं नव्हतं.

चिन्मय: अरे, दोन दिवसांनंतर तुझी भेट घ्यायला परवानगी दिल्येय् डॉक्टरांनी.

अभिजीत: त-तुला सम-मजलं न-नाही का म-मी काय म्हणत-तोय् ते? ही अ-आपली शेवट-टचीच भेट अस-सेल…

इरा: अरे अभिजीत, असं काही बोलू नकोस. डॉक्टर म्हणत होते की तू सुधारतोयस् म्हणून. एक-दोन दिवसात किंवा काही तासातच तू ठीक होशील.

चिन्मय: होय. अभिजीत तू लौकरच बरा होणारायस्… अरे आपण व्याही होणारोत.

अभिजीत: अ-आ—णि मी-मी त-तु-रुं-गा-त जा-णा-रे

इरा: असं नको रे बोलूस अभिजीत…

अभिजीत: प-पण ते खर-रं आहे ह-हो ना?

(बराच वेळ कोणीच बोलत नाही) अरे तु-म्ही बो-ला ना? मी ख-रं-च सां-ग-तो-य् ना?

चिन्मय: हे बघ ते सगळं वकील बघून घेतील.

अभिजीत: व-की-ल का-य क-र-णा-र? ….. चि-न्म-य, तू-च म्ह-णा-ला हो-ता-स ना?

चिन्मय: काय?

अभिजीत: काळे आणि पांढरे ढग… मी मी पां-ढ-ऱ्या ढ-गां-ना-च ध्ये-य मा-नलं… तु-तु-झं ऐ-क-लं ना-ही… ते क्ष-णि-क ऐ-श्व-र्य मि-ळ-वू-न दे-ता-त प-ण प-ण ख-रं स-मा-धा-न आ-णि सु-ख का-ळे ढ-ग-च दे-ता-त …

इरा: अभिजीत, तू काही बोलू नकोस आत्ता. तू आराम कर.

अभिजीत: ना-ही. म-ला बो-लू दे. शे-व-ट-चं… ब-रा झालो त-री तु-रुं-गा-त-च जावं ला-गे-ल… स-ग-ळी सं-प-त्ती, ऐ-श्व-र्य पू-र्ण-प-णे वा-या गे-लं. तू म्ह-ण-त हो-ता-स ना का-ळे ढ-ग आ-णि पां-ढ-रे ढ-ग? म-ला पां-ढ-ऱ्या ढ-गां-च्या व-र उं-च उं-च जा-य-चं हो-तं… आ-ठ-व-तं का तु-ला? आ-प-ण था-य-लं-ड-ला चा-ल-लो हो-तो… आ-ता मी त्या पां-ढ-ऱ्या ढ-गां-च्या-ही खू-प खू-प व-र जा-णा-रे-य्… अ-ग-दी खू-प व-र… आ-णि—आ-णि ये-णा-र-च ना-ही मी पु-न्हा प-र-त…

*(एकाएकी बोलायचं थांबतो आणि निपचित पडून राहतो.)*

चिन्मय: इरा, पटकन् बाहेर जाऊन डॉक्टरांना बोलव. बाहेर विशाखा, विक्रम आणि नेहा थांबलेत त्यांनाही इमर्जन्सीची कल्पना दे. मी इथंच थांबतो आणि अभिजीतशी बोलण्याचा प्रयत्न करतो.

(काही क्षणातच डॉक्टर येतात आणि तपासणी करतात.)

डॉक्टर: आय ॲम सॉरी. ही इज नो मोअर.

चिन्मय: ओ गॉड! शेवटी त्यानं आपलंच खरं केलं. अगदी आत्ताही त्यानं माझं ऐकलं नाही—तग धरली नाही. तसं—तसं तर त्यानं माझं कधीच ऐकलं नाही.

(डॉक्टर बाहेर जातात. विशाखा, नेहा आणि विक्रम आत येतात. चिन्मय विशाखा आणि विक्रमचा हात हातात घेतो.)

चिन्मय: विशाखा, आता मी कसं तुझं सांत्वन करू? नेहानं विक्रमला मार्गावर आणलं पण मी—मी अभिजीतला मार्गावर नाही आणू शकलो. आणि हे—हे असं झालं.

विशाखा: (मुसमुसत) अरे तु—झं का-काहीच चुकलं नाही. तू अनेकदा त्याला समजावून सांगितलंस. पण त्यानं ऐकलं नाही. मीही त्याच्या भरारीमुळं सुखावत होते आणि—आणि जेव्हा हे सगळं क-कसं चुकीच्या मार्गानं-मार्गानं चाललंय् ते कळलं तेव्हा खूप उशीर झाला होता. तू मलाच त्याचं मन वळवायला सा-सांगितलवतंस—आणि—आणि मी नाही ते करू शकले. मी हरले रे—मी हरले. (जोरात रडू लागते)

इरा: (विशाखाच्या पाठीवरून हात फिरवीत) विशाखा, मी तुझं दुःख समजू शकते. पण तुला आता सावरायला हवं. (नेहा आणि विक्रम यांना जवळ घेत) या दोघांसाठी तरी तुला सावरायला हवं.

*(विशाखा, नेहा, विक्रम आणि इरा एका मिठीत जातात. चिन्मय नेहा आणि विक्रम यांच्या पाठीवर हात ठेवतो.)*

**(पडदा)**

—०0०—

# काळे ढग-पांढरे ढग



व्यवसायाने अभियंते असलेले **श्रीनिवास शारंगपाणी** संशोधक / लेखक आहेत. त्यांच्या मराठी / इंग्रजी कादंबऱ्या, मराठी कथासंग्रहही प्रसिद्ध झालेले असून त्यांनी इंग्रजी-मराठी नाटकेही लिहिली आहेत. महान् गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या अकाली मृत्यूवरच्या त्यांच्या “डेथ ऑफ अ मॅड मॅथेमॅटिशियन” या इंग्रजी नाटकाचा (ते नाटक आवडल्यामुळे) स्वतंत्र थिएटर्स या नाट्यसंस्थेने हिंदीत अनुवाद करून घेऊन नाटक रंगमंचावर आणले. या प्रयोगांचे खूप कौतुक झाले. मूळ नाटकाचे मराठी रूपांतर आश्लेषा महाजन यांनी केले आणि ते नभोनाट्य स्वरूपात आकाशवाणीने आठ भागात प्रसारित केले. श्रीनिवास शारंगपाणी यांनी सहा मराठी नाटके आणि दोन इंग्रजी नाटके लिहिली आहेत. काळे ढग-पांढरे ढग हे सामाजिक नाटक महत्त्वाकांक्षी व्यक्ती कुठपर्यंत तडजोडी करतात आणि त्यांचे परिणाम काय होतात ते दाखवते.

श्रीनिवास शारंगपाणी.

७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,

बँक ऑफ इंडियासमोर,

पुणे-४११०३०

भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३

ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com